# अंकुश शिंगाडे

# संस्कार



## या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

# संस्कार

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# संस्कार

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# संस्कार

लेखक : अंकुश शिंगाडे
फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र
ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
**e**sahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: २४ एप्रिल २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



संस्कार नावाची कादंबरी वाचकांच्या हाती देतांना मला आनंद होत आहे. 'संस्कार' नावाची पुस्तक वाचकांना देतांना अतिशय आनंद होत आहे. ही पुस्तक त्या जिवांसाठी लिहिली. जे घटक आजवर उपेक्षीत राहिले. त्यांनी कधीच कोणाला काहीही मागीतलं नाही. कधीच कुरकूर केली नाही आणि मागतील तरी कोणाला? ती त्यांचीच पिल्लं होती.

मायबाप......मायबाप आपल्या लेकरांना उन्हातून सावलीत नेतात. लहानाचं मोठं करतात. त्यांनी आपल्या पायावर उभं राहावं, म्हणून राब राब राबतात ते कर्तव्य करतात आपलं. परंतू बदल्यात मुलं काय करतात. मुलं त्यांच्या म्हातारपणात त्यांना ज्यावेळेस आधाराची गरज असते. त्या वयात त्यांना घरातून हाकलून देतात. प्रसंगी मारहाण करतात. वृद्धाश्रमात जायची इच्छा नसूनही पाठवतात. तरीही मायबाप आपल्या मुलांना माफ करतात.

ही कहाणी यावरच आधारलेली आहे. राधा नावाची ती एक मुलगी. संसार गाडा रेकतांना तिला प्रचंड वेदना झाल्या. तरीही तिनं मुलांना जगवलं. त्यांना शिकवलं. संस्कार केले. परंतू तिच्या संस्कारात काहीतरी कमीपणा झाला

व ती मुलं वात्रट निघाली. त्यातच तिला वाटायचं की माझी मुलं सुधारावी. परंतू ती सुधारत नव्हती. याच घटकावर आधारलेली ही पुस्तक असून खरंच ती मुलं सुधारली का? त्यासाठी तिनं काय केलं? तिचं शेवटी काय झालं? ती कशी जगली? या सर्व प्रश्नांची उत्तरं ही पुस्तक वाचल्यावर सापडतात. संपुर्ण राधेच्या कर्तृत्वाचा प्रवास आहे यात. वयोवृद्धासाठी ही विशेष भेट आहे. आपण ही पुस्तक वाचावी व प्रतिसाद द्यावा एवढंच मागणं आहे.

धन्यवाद!.

आपला नम्र.

**अंकुश शिंगाडे,**

**नागपूर , ९३७३३५९४५०**

ही कादंबरी

जगभरातील

मात्यापित्यांना

सादर समर्पित

# संस्कार

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# संस्कार (कादंबरी)

आंब्याला मोहोर फुटला होता. त्याचा सुगंधही परीसरात दरवळत होता. तो सुगंध घेण्यासाठी दुरदुरुन पक्षी आले होते. ते सुगंध घेत होते. त्याचबरोबर त्यांचा आवाजही परीसरात पसरला होता. तसं पाहता आंब्याला यावर्षी जास्तच मोहोर फुटला होता. त्यामुळं कल्पना करता येत होती, ती म्हणजे यावर्षी आंब्याला जास्त आंबे येतील.

तिमा खोपटात बसला होता. त्याला चिंता होती ती आंब्याची. कारण दरवर्षी आंब्याला जास्तच मोहोर फुटायचा. परंतू कधी गारपीटीनं त्या आंब्याचा बार जायचा तर कधी वादळानं आंबे पडायचे. त्यामुळं तिमाला चिंता भाषणं साहजीक होती.

तिमाची गंमतच होती. ती आंब्याला फुटलेली हिरवी हिरवी पानं. त्यातच त्या पानातून येणारा राघू मैनेचा आवाज. त्याला त्या खोपटातही अगदी प्रसन्न वाटत होतं. परंतू त्या चिंतेनं तो उदास झाला होता.

ती तिमाची आंब्याची बाग. आज ती बाग अगदी बहरुन गेली होती. त्या बागेवर त्यानं वर्षभर मेहनत केली होती. रात्र रात्र जागून त्यानं पाणी टाकलं होतं बागेला. ती बाग........ त्या बागेबद्दल विचार करीत होता तो. अगदी लहानपणापासूनच त्यानं त्या बागेला अगदी लेकरागत वागवलं होतं. वाढवलंही होतं. खत टाकलं होतं. पाणीही दिलं होतं नव्हे तर मशागत केली होती. ती आंब्याची बाग. ती आंब्याची बाग. त्या आंब्याच्या बागेला सांभाळतांना नाकीनव आलं होतं आतापर्यंत. कधी खोडकिड्यांचा बंदोबस्त करावा लागला होता तर कधी माकडांचा. माकडंही कमी बदमाश नव्हती. ती माकडं आंब्याची कोवळी पानं खायला येत होती झाडावर आणि आता आंबे लागल्यावर ती माकडं कोवळया कै-या खायला येत असत. त्या कोवळया कै-यांपैकी फक्त दोनचार कै-याच तेवढ्या खात असत आणि बाकीच्या सगळया कै-या झाडावरुन खाली फेकून देत असत. याचाच अर्थ असा की त्या माकडापासून त्या आंब्याच्या कै-याचं भयंकर नुकसान होत असे.

तिमाला आठवत होती ती गोष्ट. जेव्हा ती झाडं लहान होती. त्या झाडाच्या लहानपणी रानडुकरं व रानगाई आंब्याच्या झाडात येवून बसत असत. त्याचं कारणही तसंच राहायचं. या आंब्याच्या बागेत थंडावा राहायचा. परंतू त्यामुळं अतोनात नुकसान व्हायचं. ती आंब्याची झाडं कोलमडून जायची त्यांच्या बसण्यानं. त्यातच उन्हाळा म्हटला तर झाडं कोमेजूनही जात होती. त्याला सतत दोनचार दिवसाआड पाणी लागायचं.

तिमाला सगळं आठवत होतं. आज तिमानं लावलेली आंब्याची झाडं मोठी झाली होती. त्या झाडाला आज मोहोर दिसत होता. ते पाहून अगदी हायसं वाटू लागलं होतं. अशातच त्याला गतवर्षीची गोष्ट आठवली. गतवर्षी ती आंब्याची बाग लहरलेली असतांना व त्या आंब्याच्या झाडाला लटपट आंबे लागलेले असतांना संपुुर्ण आंब्याची वाढ झाल्यानंतर तिमानं आज ठरवलं की उद्या आपण आंबे तोडणी करु. परंतू त्याला आंबे तोडता आले नव्हते. त्याच रात्री पाऊस आला व पाऊस आणि वादळानं अख्ख्या आंब्याचंच नुकसान करुन टाकलं होतं.

तिमाला दरवर्षीचा अनुभव होता. दरवर्षी आंब्याच्या झाडावर आंबे खाण्यासाठी माकडं यायची व ती माकडं आंब्याच्या कै-या कमी खायची, नुकसानच जास्त करायची. त्यामुळं त्यावर उपाय म्हणून तिमा फळ

धरतेवेळीच त्या कै-यांना प्लॉस्टीकचे वेष्टन लावत असे. आता त्या वेष्टनातून त्यानं माकडापासून पीक वाचवलं होतं

आंब्याच्या कै-यांना वेष्टन घातल्यानंतर तिमानं आपले आंबे माकडांपासून व त्याला पडणा-या डागापासून वाचवलं होतं. परंतू त्या प्लॉस्टीकच्या वेष्टनातून त्याला आपल्या बागेला गारापासून वाचवता येवूू शकत नव्हतं. तसंच वादळापासूनही वाचवता येत नव्हतं. गतवर्षीची तीच गोष्ट. गतवर्षी असंच वादळ आल्यानं मागील वर्षीचीच पुनरावृत्ती होईल की काय, असं त्याला वाटत होतं.

तिमानं याच भितीनं त्या आंब्याच्या झाडावर आलेले आंबे दुस-या दिवशी तोडून टाकण्याचा विचार केला. त्यानं विचार केला होता की यावर्षी जोमात आलेल्या आंब्याचं जोरदार उत्पादन घेवू. तसा विचार त्यानं गावक-यांजवळ बोलूनही दाखवला होता. परंतू तो त्याचा विचार होता. निसर्गाचा नव्हता.

तिमा दिवसभर शेतात राहात असे. सायंकाळी शेतावरुन घरी येत असे. घरी येताच निवांत झोपत असे. त्याला माहीत होतं की निसर्गचक्राला कोणीही रोखू शकत नाही. त्यामुळं आपण कितीही विचार केला की त्या चक्राला रोखू. तरीही रोखू शकत नाही. त्यामुळं त्याचा विचार तो करीत

नव्हता. कारण निसर्गचक्रानं कितीही नुकसान केलं◌ं तरी त्याला फूल ना फुलाची पाकळी अशा स्वरुपाचं उत्पादन मिळतच होतं. त्यामुळं तो त्या निसर्गचक्राची किंचीतही चिंता करीत नव्हता.

आज तिमानं शे◌ेतीत दिवसभर काम केलेलं होतं. तो दिवसभर काम करुन थकलेला होता. दिवसभर काम करुन थकलेला तिमा सायंकाळी घरी आला. उद्याची स्वप्न रंगवीत विचार करीत बसला. त्यानंतर उद्याची स्वप्न रंगवतच जेवन खावण करुन निवांतपणे झोपी गेला.

ती रात्र. ती रात्र तशीच निघून गेली होती. त्यातच पहाट उजळली. पहाटेचा कों◌ंबडा आरवला व वाटलं की सकाळ झाली. तसा तिमा उठला. त्याला लघुशंका लागली होती. तसा तो लघुशंकेला निघाला. त्याला त्या प्रभातकाळी लघुशंकेला जातांना थोडं अस्वस्थच वाटत होतं◌ं.

तिमा लघुशंकेला गेला. तसं अस्वस्थ वाटत असतांना. तेव्हा त्यानं कोणालाही सांगीतलं नाही. कारण ती सकाळची वेळ होती व शौचालय घरात नव्हतं.

ती अस्वस्थता.......त्यातच रात्रीचा तो दळभद्री विचार. त्यामुळं की काय, त्याला त्या पहाटेच्याच अंधा-या गर्भात अंधारी मारली आणि तो धाड्कन एका दगडावर आदळला.

तो दगड...... तो दगड त्याच्या मस्तकाला लागला. त्याचबरोबर रक्तपात झालं व रक्त वाहून जावू लागलं. तसं अतिरिक्त रक्त वाहून जाताच तो हळूहळू कोमात जावू लागला.

तिमा कोमात गेला होता. तसा तो पहाटेचा अंधारही समाप्त झाला होता. त्यातच गावखेड्यातील लोक, त्यांच्या घरी शौचालयाची व्यवस्था नसल्यानं तेही शौचासाठी बाहेर पडले. जातांना त्यांना तिमाचा तो बेशुद्ध झालेला देह दिसला. तशी ती बातमी वा-यासारखी गावात गेली. तशी त्याच्या घरीही. मग गावातील लोकंही अगदी घाईघाईनं तिमा ज्या ठिकाणी पडला होता. तिथं निघाले. तिथंच महाभयंकर गर्दी जमली होती. तसं कोणीतरी म्हणालं,

"अबे, हा तिम्या होय."

"आरं, हा मेला की काय रं."

तिमा मेल्यागतच होता. त्याला अति रक्त गेल्यानं होशच नव्हता. तसा तो बेशुद्ध असल्यानं तो मेल्यासारखाच वाटत होता. परंतू त्यातील एकजण म्हणाला,

"आरं, श्वास चालू हाये याचा."

"श्वास चालू हाये. मंग याले ताबडतोब दवाखान्यात हालवा लागते."

"आरं तं त्याची बायको. त्याच्या बायकोले बोलावणं पाठोलं का?"

"हो, पाठोलं."

"मंग आली का ते."

"येत आसन ते."

थोड्याच वेळाचा अवकाश. तिमाची पत्नी राधा रडतरडत व धावत धावत तिथं आली. ती रडतरडतच म्हणाली,

"काय झालं माह्या तिमास्नी?"

"काय नाय. जरा बेशुध झालंया लमचं."

"बेशुध झालंया. आरं बाई, आतं माह्यं कसं होणार. मी कशी जगणार." तिनं हंबरडा फोडला. तोच एक म्हातारी म्हणाली,

"अवं चूप बस. मेला कावो तो. रडते अशी आग्याबेंदरासारखी. अवो, तो जीवंत हाय. पडला असन अन् रगत गेलं असन लई, म्हून शान बेशुध झालया."

ती म्हातारी बोलत होती. तसे लोकं तिच्या तोंडाकडं भिरभिर पाहात होते. तशी ती परत म्हणाली,

"आरं भैताडांनो, असं का पायता मा थुतराकडं. आरं कोणीतरी उचला आन् घेवून चाला दवाखान्यात. तवाच होश येईन न वं."

म्हातारी बोलली. तशी जोमात हालचाल झाली. त्या गावखेड्यातील माणसांनी त्याला उचललं आणि शहरातील दवाखान्यात नेलं.

दवाखान्यात पै पै पैसा लागत होता. तिच्याजवळ पैसा नव्हता. त्यामुळेच उपचारासाठी तिला कर्जाऊ रक्कम उचलावी लागली. तो कर्जाऊ पैसा. तो पैसा व्याजावर व्याज वाढवत होता. परंतू त्याला आराम पडत नव्हता.

तिमा दवाखान्यात भर्ती होता. तसा त्याच्यावर उपचार सुरु होता. तो उपचार निःशुल्क नव्हता. त्या उपचाराचा पैसा लागत होता. तसं राधाबाईनं उपचारासाठी पैसा कर्जाऊ घेतला. परंतू तिमाच्या उपचारादरम्यान काहीच रिस्पॉन्स दिसत नसल्यानं व डा ॅक्टरांच्या सल्ल्यानुसार ऑपरेशन करावं

लागणार असल्यानं तिनं पैसा मिळविण्यासाठी विचारचक्र फिरविलीत. तसं तिला आठवलं की गावाकडं तिची सदाहरीत शेती असून त्या शेतीवर आंब्याचा बगीचा आहे व झाडाला आंबे लागले आहेत.

तिला तो आंब्याचा बगीचा आठवताच ती ताबडतोब गावाकडं आली. तशी ती ताबडतोब शेतावर गेली तर पाहते काय, आंब्याच्या झाडाला आंबे नव्हते. कोणीतरी भामट्यानं तिमा आणि तिमाची पत्नी रुग्णालयात आहेत व गावात त्या आंब्याच्या झाडावर लक्ष ठेवणारं कोणीही नाही हे पाहून संपुर्ण झाडावरील आंबेच तोडून चोरुन नेले होते. आज त्या आंब्याच्या झाडावर एकही आंबा नव्हता.

प्रारब्ध ते. जेव्हा नशीब फुटतं, ते चारही बाजूनं फुटत असतं. त्यातच संकटं एवढी येतात की रस्ताच सापडत नाही. राधावरही असंच संकट आलं होतं.

ते खाजगी रुग्णालयात. तिथं भरपूर पैसा लागत होता. भरपूर पैसा लागला होता. भरपूर पैसा लागणारही होता. डॉक्टर उसासा देत होते. म्हणत होते की श्वास सुरु आहे, येईलच होशात. परंतू तिमा काही होशात येत नव्हता. काही लोक बेशुद्ध माणसांच्या गोष्टी सांगत होते. म्हणत होते की लोकं बरेच दिवसपर्यंत होशात येत नाहीत. हे डॉक्टर खाजगी आहेत. पैसे

लुटतात. तुम्ही सरकारी रुग्णालयात हलवा. शेवटी अति पैसा लागतो, म्हणून त्याला खाजगी रुग्णालयातून सरकारी रुग्णालयात हलविण्यात आलं व त्याची अवस्था पाहून तिला डॉक्टरांनी सांगीतलं की तिनं आता निश्चींत राहावं. कारण त्याला केव्हा होश येईल याची काही शाश्वती नाही.

नितीनियमानं राधा निश्चींत झाली. ती गावाला गेली व आपली शेती करु लागली. आता महिन्यातून ती येत असे तिमाला भेटायला. तिमाच्या प्रकृतीची विचारपूस करत असे व डॉक्टरांना त्यांचे काही पैसे देवून ती परत गावाला रवाना होत असे.

कर्ज बरंच झालं होतं. व्याजावर व्याज चढत होतं. अतिरिक्त पैसा शिल्लक पडत नव्हता. शेतीही बरीचशी पीकत नव्हती. राधेला चिंता वाटत होती. ती चिंता होती पैशाची. शेवटी तिनं उपाय काढला. शेती व्याजात जाण्यापेक्षा आपण शेती विकावी.

राधेने तसा विचार केला. त्याचं दुसरंही कारण होतं. ते म्हणजे तिची मुलं. मुलांचाही शिक्षणाचा खर्च होतच होता. त्यामुळं राधा ही घायाळ हरणीसारखी झाली होती.

राधेला काही सुचत नव्हतं. तिची दिवसेंदिवस बिकट स्थिती वाढत चालली होती. त्यामुळंच तिनं निर्णय घेतला होता आपली शेती विकावी.

राधेनं घेतलेला निर्णय. तसं पाहता तिनं शेती विकण्याचा तसा विचार करताच तिची शेती विकल्या गेली व आलेल्या त्या पैशात राधेनं कर्ज दिलं व आपल्या लेकरांना घेवून ती शहरात आली. ज्या शहरात तिच्या पतीवर उपचार सुरु होता.

********************************

ते रुग्णालय.........ते रुग्णालय राधेला खायला धावत होते. कारण परिचारिका तिला फार त्रास देत होत्या. तिची ती बिलंदर मुलंही तिला त्रासच देत होती. त्यातच औषधीलाही पैसा लागतच होता. परंतू आता तेवढी समस्या नव्हती.

राधेच्या पतीवर उपचार सुरु होता. तशी राधा फुटपाथवर झोपत होती. आपल्या इवल्या इवल्या मुलांना वाढवत होती. त्यांना शिक्षणाचं बाळकडू पाजत होती.

राधेला दोन मुलं होती. एक मुलगी आणि दुसरा मुलगा. मुलगा मोठा होता. मुलगी लहान होती. परंतू मुलगी हुशार होती. तसं पाहता मुलगा

शिक्षण शिकत होता. त्याचं शिक्षण सुटलं होतं. कारण ते शहर तिच्यासाठी नवीन होतं.

ते नवीन शहर. तिनं रुग्णालयापाशीच बस्तान बसवलं होतं. तिथंच ती जवळच्या पैशानं अन्न शिजवीत होती. जवळ भरपूर पैसा होता. तशी भीतीही वाटत होती तिला. कधीकधी त्या रुग्णालयाजवळून भामटे फिरत. तिच्याकडे आगळ्यावेगळ्या नजरेनं पाहात. ती त्यावेळी घाबरायची. परंतू भीतीचा मनात किंचीतही लवलेश न बाळगता ती जगत होती.

तिला दोन प्रकारच्या काळज्या होत्या. पहिली काळजी होती तिच्या पतीची आणि दुसरी काळजी तिच्या मुलांची होती. तसं पाहता काळजीचं पहाडंच तिच्यावर तुटून पडलं होतं. अशातच एक दिवस चमत्कार होईल याची ती प्रतिक्षा पाहात होती नव्हे तर तिला त्याच दिवसाची आस होती.

असाही तो रुग्ण. आज तिच्या पतीला कोमात असतांना बरेच दिवस झाले होते. तो अजुनही होशात आला नव्हता. त्याबद्दल डा ॅक्टरही आश्चर्यचकीत झाले होते. तसं पाहता इतर रुग्णांना उपचारासाठी सरकार पैसे द्यायचे. परंतू ती सुविधा सरकारकडून अजुनही तिमाला लागू झाली नव्हती.

सरकारकडे एक प्रावधान होतं. ते प्रावधान म्हणजे कोणत्याही क्रिटीकल रुग्णांना सरकारकडून निःशुल्क मिळणारी मदत. डॉक्टरांना

तिच्या परिस्थितीची जाणीव होती. त्यामुळं डाॅक्टरांना तिची दया येत होती. त्यातच डाॅक्टरांनी तिची परिस्थिती लक्षात घेऊन तिला एक फाॅम भरायला लावला व आता तिच्या पतीवर उपचार सरकारकडून होवू लागला.

आज तिच्या पतीवरील उपचाराचा तिढा सुटला होता. थोडीशी चिंता होती. जी कधीच सुटणार नव्हती. ज्या चिंतेमुळे ती आजवर संकट झेलत आली होती. ती चिंता मिटताच तिनं आपला मोर्चा मुलांच्या शिक्षणाकडे वळवला. आता काहीही करुन तिला आपली मुलं शाळेत टाकायची होती. कारण तिला काम करायला कुठंतरी जायचं होतं. त्यामुळं तिला चिंता होती की ती जर कामाला गेलीच तर मुलं कुठं थांबणार. काय करणार? त्यांची सुरक्षा कशी करणार? याची चिंता तिला सतावत होती.

********************************

अलीकडे शिक्षणाला फार महत्व प्राप्त झाले आहे. अगदी जन्मापासून नाही तर गर्भापासून सुरु होणारे शिक्षण हे माणसाच्या चांगल्या

उभारणीसाठी प्रेरणादायक ठरु शकते. असं हे शिक्षण. डा ॅ. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचं दूधंही म्हटलं आहे.

शिक्षण आईच्या गर्भातही मिळत असते. असं म्हटल्यास लोकांना आश्चर्य वाटेल. परंतू ते सत्य आहे. आपण ऐकली आहे अभिमन्यूची गोष्ट. त्यानं गर्भातच चक्रव्यूह भेदण्याची कला हस्तगत केली होती. ती दंतकथा वाटते. परंतू आजही बरीचशी मुलं आईच्या गर्भातच शिकत असतात. तो बाळ गर्भात असतांना त्याची आई ही कशी वागली. तिनं कोणकोणत्या गोष्टी केल्या. तिनं परिस्थितीशी कोणती जुळवाजुळव केली. तसंच तिनं काय प्राशन केलं. यावरुन मनुष्याचे भावविश्व व स्वभाव तयार होत असतो. तेच शिक्षण असतं.

आज ख-या शिक्षणाचा -हास होत चालला आहे. मराठी माध्यमाच्याच नाहीत तर भाषेच्या प्रमाण शाळा ओस पडत चालल्या आहेत. काँन्व्हेंटचे प्रस्थ वाढत चालले आहे. भाषेच्या शाळेत मुले शिकायला मिळत नाहीत. त्याला सरकारही काही अंशी दोषी ठरत आहे.

ज्यांचा शिक्षणाच्या घडामोडीशी काहीही एक संबंध नसतो. फक्त शाळा संस्थाचालकांशी संबंध असतो. कारण तोच मालक असतो. पगार देत असतो. तो मालक सरकारी शिक्षकांना जेवढे वेतन मिळतं, तेवढंही देत

नाही. तरीही त्याला घाबरावं लागतं आणि शिक्षक घाबरतातच. त्याच्या मनानुसार वागावं लागतं. कारण आजच्या बेरोजगारीच्या काळात तो पोटासाठी अल्प का होईना, वेतन तर देतो. असा दृष्टीकोण अंगीकारुन शिक्षक घाबरत असतात संस्थाचालकांना. कोणी पेन्शनचा मुद्दा ऐरणीवर ठेवत नाहीत व आतल्या गोटातून राजकारण होतं.

कॉन्व्हेंटला सर्व सुविधा मिळतात. पण त्या सर्व सुविधा विद्यार्थ्यांना असतात. शिक्षकांच्या बाबतीत आश्वासनांचं भाकीत होतं.

आज महत्वपुर्ण मुद्दा हा की जे सरकारी नियुक्त शिक्षक आहेत. ज्याला काहीतरी वलय आहे. ज्यांच्यावर सतत अन्याय होत असतो. ज्याला शेंबड्यांचे शिक्षक अशी उपाधी देवून चिडवलं जातं. ज्याच्यामुळं खरंच विद्यार्थी शिकतात. जो आजच अशा शेंबड्या मुलांना शिकवायला लागला नाही तर ब-याच वर्षापासून विद्यार्थ्यांना शिकवतोय. त्या प्राथमिक वर्गाच्या शाळेत विद्यार्थी टाकले जात नाहीत व कॉन्व्हेंटला मुलं शिकवली जातात. का? तर तिथं इंग्रजीत शिक्षण मिळतं. मग प्राथमिक मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षक, शिक्षक नाहीत का? कॉन्व्हेंटचेच शिक्षक खरे शिक्षक असतात का? नाही. तेही खरे शिक्षकच. हाडाचे शिक्षक. तरीही हा भेदभाव. हाच भेदभाव असतो शाळेशाळेमध्ये. मग ती कॉन्व्हेंटची शाळा असो वा मराठी भाषेच्या शाळा. ते राजकारण आहे. परंतू आज खरी गोष्ट

म्हणजे आजच्या या कॉन्व्हेंटच्या उभारीमुळे गरीबांसाठी शिक्षण उरलेलं नाही. स्पर्धा निर्माण झाल्यामुळं गरीब व्यक्तीही आपल्या मुलांना कॉन्व्हेंटलाच टाकतो. प्रसंगी मनमानी कॉन्व्हेंटचे शुल्क भरतो नव्हे तर त्यासाठी कर्जही काढतो. त्यामुळं आज मराठीच नाही तर भाषेच्या शाळाही ओस पडत चालल्या आहेत. त्यामुळं मराठी किंवा भाषेच्या शाळांना मुले मिळविण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. मुले मिळत नसल्यानं आता या शिक्षकांसमोर पुढील काळात उपासमारीची वेळ तर येणार नाही. ही स्थिती निर्माण झाली आहे. तसंच ह्या शिक्षकांना पुढील काळात कदाचीत भिकारी बनून 'शिक्षण घ्या हो शिक्षण' म्हणत दारोदारी हिंडून मुलं गोळा करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील ही शक्यता नाकारता येत नाही. अलीकडे ही अवस्था पाहून सरकारच्या नितीचा अंदाज बांधला जात असून वरील प्रकारची स्थिती निर्माण होवू शकते. त्यासाठी वेळीच शिक्षकांनी सावध झालेलं बरं.

*****************************

राधा शिकली होती. उच्च शिक्षण झालं होतं तिचं. परंतू तिचा विवाह तिच्या मायबापानं तिमाशी केला होता. त्यांना तरी काय माहीत होतं की आपल्या मुलीवर असंही संकट येईल.

तिमा एक चांगला कास्तकार होता. तोही शिकलेलाच होता. घरी चांगली शेती होती. त्याला घरी कोणत्याच प्रकारचा कमीपणा नव्हता. तसा तो मायबापाचा एकुलता एक मुलगा होता.

तो शिकला होता. परंतू त्याला नोकरी न मिळाल्यानं त्यानं शेती करणं हा पर्याय निवडला होता. तसं पाहता शेती करण्यामागंही एक दृष्टीकोन होता. कुठंतरी त्यानं व्यापाराबाबत ऐकलं होतं. ते शिकले होते. परंतू त्यांची भाषा अनाडी होती.

व्यापारी बना असं म्हटल्यास लोकं म्हणतील की महोदय, आपण व्यापारी आहात का? व्यापार कराल तेव्हा समजेल. त्यांचं म्हणणंही बरोबर आहे. कारण व्यापार करणं काही सोपं काम नाही. व्यापार करणं कठीण काम आहे. त्यामुळं असा संदेश देतांना आतिशयोक्ती वाटते.

व्यापारी बना असा संदेश देतांना आतिशयोक्ती वाटू नये. कारण व्यापारानं माणसाचा खरा विकास होतो. माणसाची भरभराट होते. तो जीवनात पुढे जात असतो. जर व्यापार चांगला चालला तर........

कोणताही व्यापार हा सर्वांना लाभदायक असतो असे नाही. काही व्यापारात माणसं बुडतात. मग जवळ असणारी सर्व मालमत्ता विकून टाकावी लागते. बरं व्यापार हा चारही दिवस चालत नाही. कधी चालतो तर कधी नाही. कधी जास्त नुकसानदायक ठरतो व्यापार तर कधी कमी नुकसानदायक. फायद्याचा विचार केल्यास कधी जास्त फायदा करतो माणसाचा तर कधी कमी. तसेच व्यापार हा सदोदीत चालेलच असा नाही. म्हणून व्यापार करायला कोणीही धजत नाही. त्यामुळं त्याबाबत कोणीही म्हणतात की छोटीशी का असेना, नोकरी हवी.

नोकरी.......ज्याप्रमाणे व्यापारात जबाबदारी असते. तशीच जबाबदारी नोकरीतही असते. आपण नोकरीतील जबाबदारी लक्षात घेतो. परंतू व्यापारातील जबाबदारी लक्षात घेत नाही. म्हणूनच नेमके आपण व्यापारात बुडतो.

व्यापार करतांना जर नोकरीसारखं व्यापाराला सांभाळलं तर व्यापारातही माणसं यशस्वी होवू शकतात. जसे. नोकरीला जातांना वेळेवर जावे लागते. वेळ झाल्यानंतरच परत घरी जावं लागते. काम करावंच लागते. ते नाही केल्यास पैसे मिळत नाहीत. तसंच जास्तीच्या सुट्ट्या मारता येत नाहीत. वैगेरे बरेच नियम असतात नोकरीमध्ये. तसे नियम व्यापाराचेही

असतात. परंतू व्यापाराचे नियम आपण पाळत नाही. म्हणून व्यापारात आपलं नुकसान होत असतं.

व्यापाराचेही काही नियम आहेत. जसं आपण नोकरीत वेळेवर जातो. तसा व्यापार ज्या ठिकाणी असतो. तिथं वेळेवर जायला हवं. नोकरी ज्यावेळी सुटते. तसा व्यापारही बंद करण्याची वेळ असावी. तसंच ज्याप्रमाणे नोकरीला आपण दररोज जातो. थोड्याशाही जास्तच्या रजा घेत नाही. तशा व्यापारातही रजा घेवू नये. सततच्या रजेनं व्यापार बुडतो. हे आपल्याला माहीत आहे. तरीही आपण व्यापार करतांना त्यात आपल्या घरचाच धंदा असल्यागत आपण व्यापार करीत असतो. मग व्यापारात नुकसान होणार नाही तर काय आणि त्यानंतर आपला व्यापार बुडला की आपण आपल्या प्रारब्धाला दोषी ठरवत व्यापारात नुकसान होतं असं सर्रासपणे सांगत सुटतो व व्यापाराला बदनाम करतो.

मुळात व्यापाराची दिशा बदनामीकारक नाही. आपल्याला माहीत नाही की ज्यांनी ज्यांनी इमानीइतबारे व्यापार केला, तो तो घटक विकसीत झालेला आहे. आता इंग्लंडचंच उदाहरण घेवू. इंग्लंडमध्ये औद्योगीक क्रांती झाली हे आपल्याला माहीत आहे. या औद्योगीक क्रांतीतून व्यापार भरभराटीस आला व आलेला पैसा त्यांना गुंतवता यावा म्हणून त्यांनी बाजारपेठा शोधल्या गेल्या. त्या बाजारपेठेतमध्ये भारताचाही समावेश

आहे. आज याच व्यापारीक दृष्टीकोणातून भारतात आलेल्या इंग्रजांनी भारताला गुलाम करुन या भारतात राज्य केले. ही गुलामी केवळ आणि केवळ व्यापारात इंग्रजांनी केलेल्या प्रगतीतून लादलेली होती. प्रगत असलेल्या भारताला गुलाम करण्यासाठी व्यापार हेच प्रगत माध्यम होतं. आजही आपण पाहतो की जो कोणी व्यापार करतो तो सुखी आणि समृद्ध जीवन जगत असतो. जो व्यापार करतो, तो मालक बनतो व तो इतरांनाही रोजगार देतो व आपल्या व्यापारात ज्याला रोजगार देतो, त्याला गुलामागत वागवत असतो. हे व्यापाराचे गणित आहे आणि त्यात सत्यताही आहे. त्यातच व्यापाराचे सुत्र असे की नियमीत व्यापार करणे. ते सुत्र असा व्यापार करणारा व्यक्ती पाळतो. तोच इमानदार व्यापारी असतो. तो कधीच व्यापार बंद ठेवत नाही. तो व्यापार नियमीत चालवतो व नोकरदारांना जास्तीच्या सुट्ट्या देत नाही. याबाबत एक अनुभव.

एक व्यक्ती नोकरीवर होता. तो दुस-याच्या कारखान्यात काम करीत होता. त्याचे महिण्याचे सुरुवातीचे दिवस चांगले जायचे. परंतू जेव्हा महिना भरायचा, तेव्हा शेवटच्या काळात त्याला पैशाची समस्या यायची व तो घरखर्च भागविण्यासाठी आजुबाजूतून उसनवारी पैसे घ्यायचा. शेवटी त्यानं त्यावर विचार केला आणि निर्णय घेतला की आपण कोणतातरी व्यापार टाकावा. असे विचार करुन त्यानं व्यापार टाकला.

आज त्यानं व्यापार टाकला होता. तो नियमीत चालवत होता. आता त्याला कोणत्याही महिन्याला अडचण जात नव्हती. कोणत्याही स्वरुपाची समस्या येत नव्हती. कारण त्याचा व्यापार चांगला चालत होता. त्यातच एक दिवस त्यानं नोकरीही सोडली होती.

महत्वाचं सांगायचं म्हणजे व्यापारानं माणसाची भरभराट होते. जर तो इमानदारीनं चालवला तर..... माणसानं व्यापारी बनावं. व्यापार इमानदारीनं करावा. त्याचे जे नियम असतात, त्या नियमानं चालावं. सुसूत्रता पाळावी. जेणेकरुन व्यापार कधीच बुडणार नाही व तुम्हीही आत्मनिर्भर व्हाल नव्हे तर आपल्याबरोबर इतरांचेही पोट भरु शकाल हे निर्वीवाद सत्य आहे.

तिमालाही व्यापाराबाबत असंच वाटलं व बेरोजगारीवर मात करण्यासाठी त्यानं शेती हा पर्याय निवडला.

तिमानं शेती हा पर्याय निवडताच त्यावर आंब्याची बाग टाकली. तसा तो त्या आंब्याच्या बगीच्यावर दिवसरात्र मेहनत घेत असे.

सुरुवातीस आंब्याच्या बगीच्यानं तिमाला अगदी भरभरुन प्रतिसाद दिला. परंतू जसजसे दिवस गेले. तसंतसं त्या आंब्याच्या बागेनं आपला जलवा दाखवणं सुरु केलं व दरवर्षीप्रमाणेच नुकसान करणं सुरु केलं. यातच तो खंगला व विचाराअंती तो खाली पडला व कोमात गेला होता.

राधा तसा विचार करीत होती. तिनं ठरवलं की आपण व्यापार करायचा नाही. आपण नोकरी करायची आणि आपल्या मुलांना शिकवायचं.

त्याला मृत घोषीत केलं. त्यानंतर तिच्यावर पहाडच कोसळलं. कारण त्याच्या उपचारासाठी आधीच तिला शेती विकावी लागली होती नव्हे तर पै पै पैसा खर्च झाला होता. त्यातच त्या पैशाचं काही चीज झालं नव्हतं. त्यामुळं ती खचली होती मनातून. परंतू हिंमत खचली नव्हती ती. तिनं संघर्ष सुरुच ठेवला होता.

तिमा मरण पावला होता. त्याचबरोबर जबाबदारी वाढली होती तिच्यावरील. त्यातच तिनं ठरवलं की आता आपण आपल्या खेड्याकडे जायचं नाही. आता आपण शहरातच राहायचं. त्यापुर्वी तिनं ते प्रेत सरकारी दवाखान्यात दान दिलं. त्यानंतर हळूच तिनं एक कमरा पाहिला व ती त्या कम-यात किरायानं राहू लागली.

तिनं कमरा घेतला होता. त्याचबरोबर त्या कम-यात ती राहायला आली होती. गावचं घरंही सोडलं होतं. त्यानंतर तिनं मागं वळून पाहिलं नाही. ती शहरी जीवनात रमली व शहराच्या वातावरणात तिची भाषाही सुधारली.

गावचं घर सोडल्यानंतर राधा शहरात राहू लागली. ती तशी शिकलेलीच होती. मास्तरकीची पदवी तिनं आधीच घेवून ठेवली होती. तसा ती जॉब शोधू लागली. परंतू तिला जाब मिळत नव्हता. मात्र तिनं आपल्या मुलांना शाळेत टाकलं होतं.

ती नित्यनेमानं आता आपल्या मुलांना शाळेत पाठवीत असे. आपल्या मुलाच्या शाळेतच तिनं आपल्या मुलीला पहिल्या वर्गात टाकलं होतं.

ती शाळा पहिल्या वर्गापासून तर बारावी पर्यंत होती. त्या शाळेत सातवीनंतर आठवी ते बारावीचा माध्यमीक वर्ग जुळला होता. या शाळेत मोठमोठ्या मुली होत्या. त्या मुली चांगल्या नव्हत्या त्याला जबाबदार होते तेथील शिक्षक. हे शिक्षक मुळातच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत नसत. त्यामुळं मुली बिघडल्या होत्या. मायबापही त्या मुलींकडे लक्ष देत नसत.

ती शाळा चांगली नव्हती. तिथं सुरक्षा भिंत नव्हती. तसं पाहता त्या शाळेत बाहेरची तरुण मु◌ुलं येत व शाळेतील मुलींना छळत असत. त्यातच अगदी अल्प वयात या शाळेतील ब-याच मुलींनी प्रेमविवाह केले होते. त्यातच त्यातील ब-याचशा मुली सुखी नव्हत्या.

नवीन शैक्षणिक धोरण आलं होतं व त्या धोरणानुसार वय वर्ष सहा हे वर्ष नवीन प्रवेशासाठी निर्धारीत केलं गेलं होतं. कधी कधी राधा विचार

करायची की आपल्या मुलीचं नवीन शैक्षणिक धोरणानुसार एक वर्षाचं नुकसान झालं. खरं तर कॉन्व्हेंटचं प्रस्थ वाढलं, त्यामुळंच नुकसान झालं असा तिचा विचार होता. परंतू त्यावर तिच्याजवळ काही पर्याय नव्हता. तसं पाहता तिच्या पतीच्या आजारानं तिच्या मोठ्या मुलाचं अतोनात नुकसान झालं होतं. परंतू तिला ते नुकसान, नुकसानदायक वाटत नव्हतं. मुलींचे होणारे नुकसान तिला नुकसानदायक वाटत होते.

******************************

शाळेत जायचंय, वयोमर्यादा सहा. असं नवीन शैक्षणिक धोरण. नवीन शैक्षणिक धोरणाचा नवीन आकृतीबंध. या बंधानुसार शाळेचा पुर्वप्राथमिक स्तर नर्सरी, केजी वन व केजी टू तीन वर्षाचा अभ्यासक्रम, त्यानंतर पहिली ते पाचवी प्राथमिक, सहावी ते आठवी उच्च प्राथमिक, आठवी ते बारावी माध्यमिक असा स्तर निर्माण करण्यात आला व त्यानुसार वय वर्ष सहा हे वर्ष पहिल्या वर्गात प्रवेशासाठी निश्चीत करण्यात आलं. आता या बंधानुसार वयाची सहा वर्ष झालेली मुलं पहिलीत जाणार होती.

पहिल्या वर्गात प्रवेशाबाबत विचार करतांना एक इतिहास सांगणे गरजेचे. त्यासाठी इथून पंचेचाळीस ते पन्नास वर्ष मागचा इतिहास. साधारणपणे पन्नास वर्षापूर्वी पहिल्या वर्गात नाव दाखल करतांना मुलांना कानाला हात पुरवावा लागत असे. ज्या मुलांच्या कानाला हात पुरत असे. त्याला पहिल्या वर्गात घेतल्या जात असे आणि ज्यांचा हात कानाला पुरत नसे. त्याचा पहिल्या वर्गात प्रवेश निषिद्ध समजल्या जाई. ती पद्धत वय वर्ष सहा सारखीच होती. परंतू त्यात एक दोष होता. तो दोष म्हणजे काही काही मुलांचा कानाला हात सहा वर्ष पुर्ण होताच पुरत असे. काहींचा हात सात आणि आठ वर्ष पुर्ण होत असेल तरी पुरत नसे. यावरुन मुलांच्या शिक्षणाचं कानाच्या हात पुरण्यानुसार नुकसान झालं. काहींचं त्या मुलांच्या हुशारीनुसार नुकसान झालं.

जन्मतः काही मुलं हुशार असतात. तो मुलगा जरी वय वर्ष पाचचा असला तरी तर काही मुलं ही वयाची आठ दहा वर्षाची असली तरी ती बुद्धिमान नसतात. कारण प्रत्येकजणांचा मेंदू हा तसा तल्लख नसतो.

सरकारनं हाच विचार निश्चीत करुन पहिल्या वर्गात प्रवेशाबाबत वय वर्ष सहा निर्धारीत केले होते नवीन शैक्षणिक धोरणानुसार. कारण या वयात बहूतेक विद्यार्थ्यांचा मेंदू पुर्ण वाढ झालेला असतो असं सरकारचं मत होतं. अशा वयात जर त्याचा प्रवेश पहिलीत झाला तर तो पहिल्या वर्गातील ज्ञान

पुरेपूर आत्मसात करीत असतो हेही सरकारचंच मत होतं. यामुळं पहिलीसाठी सहा वर्ष पूर्ण निर्धारीत केले गेले आणि त्या वयापुर्वी त्या मुलाला बालवाडीत टाकावे वा नर्सरी केजी वन व केजी टू ला टाकावे असे निश्चीत केले गेले होते.

मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना पहिलीत टाकतांना वय वर्ष सहा हे बंधन पाळून जर त्याचा पहिलीत प्रवेश निश्चीत केल्या गेला तरीही विद्यार्थ्यांचं नुकसान झालंच. कारण काही काही मुलांचा मेंदू हा सहा वर्ष पुर्ण करण्यापूर्वीच पुर्ण वाढ झालेला असतो. असे असतांना मग वय वर्ष सहा हे पहिलीच्या वर्गात प्रवेशासाठी का निर्धारीत केले गेले असावे? हा उपस्थीत झालेला प्रश्न होता. त्याच कारणाचा विचार करतांना मुख्यतः कॉन्व्हेंटला जास्त महत्व नवीन शैक्षणिक धोरणात केल्या गेला. कॉन्व्हेंटला वय वर्ष सहा होण्यापूर्वी पहिलीत प्रवेश मिळत नव्हता. त्यापुर्वी तो मुलगा नर्सरी, केजी वन व केजी टू शिकत होता. त्याचाच विचार करुन सामान्य गरीबांच्या मुलांनाही ते कितीही हुशार असले तरी त्यांचा प्रवेश हा वय वर्ष सहा निश्चीत केल्या गेला व त्या मुलांचं नुकसान केलं गेलं होतं. हा पहिला हेतू सरकारनं साध्य केला होता तसाच दुसरा हेतू हा साध्य केला होता, तो म्हणजे कॉन्व्हेंटला मुलं मिळावी.

कॉन्व्हेंटला मुलं? हाही एक संभ्रमात टाकणारा प्रश्न होता. हो, संभ्रमातच टाकणारा प्रश्न. कॉन्व्हेंटला मुलं सहा वर्षांत पहिलीत जात. म्हणून सामान्य मुलांनीही सहा वर्ष पुर्ण वय झाल्यावर कॉन्व्हेंटला जावं नव्हे तर सरसकट लोकांनी मराठी भाषेतील गरीबांच्या शाळेत मुलांना न टाकता कॉन्व्हेंटच्या शाळेत प्रवेश घ्यावा. याचाच अर्थ अभिप्रेत असलेला होता की मराठी अनुदानीत असलेल्या सरकारी शाळा बुडाव्या व कॉन्व्हेंटच्याच शाळा चालाव्या. हा सरकारचा हेतू होता. यालाच म्हणत नवीन शैक्षणिक धोरण. हे नवीन शैक्षणिक धोरण सरकारनं अतिशय अभ्यासपूर्ण तयार केलं होतं व यातून मोठा डाव रचला गेल्याचं दिसून येत होतं. तो डाव वरअंगी विचार केल्यास दिसत नव्हता. सरकार या डावाअंतर्गत मराठीच्या अनुदानीत शाळा बंद करु पाहात होते. या नवीन शैक्षणिक धोरणानुसार अनुदानीत मराठीच्या शाळेत मुलं मिळणार नव्हती. तेव्हा सरकार सहजच म्हणू शकत होते की जिथं मुलंच नाहीत, तिथं अशा शाळा चालवून काय उपयोग. मग सहजच या शाळा सरकार बंद करु शकत होतं व त्याला कोणीच विरोध करु शकत नव्हता. तसेच सर्वांना कॉन्व्हेंटच्या शाळांना प्रवेश घ्यायला लावेल असंही वाटत होतं. त्यासाठीच हे स्लो पायजन होतं. हे हळूवारचं विष कोणाच्याही लक्षात येणारं विष नव्हतं. कारण सरकारला

माहीत होतं की या अनुदानीत शाळांना अनुदान द्यावं लागत असतं. तेथील वेतनही सरकारी खर्चातून चालत असतं.

अलीकडील हाच विषय लक्षात घेऊन सरकारनं २००५ मध्ये पहिला तासचा पत्ता फेकला. पेन्शन बंद केली. त्यानंतर हळूहळू लोकांना अंधारात ठेवून कॉन्व्हेंटच्या शाळा आणल्या. या शाळा एवढ्या वाटल्या आणि त्याची जाहीरात केली गेली की अलीकडील काळात मराठीच्या अनुदानीत शाळा मोडकळीस आल्या. कॉन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, कॉन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर कॉन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार

नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कुऱ्हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पदड्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.

राधेलाही तेच वाटत होतं. अजूनपर्यंत सरकारी शाळा बंद झाल्या नव्हत्या. परंतू त्या शाळेनं तिच्या मुलीचं एक वर्षाचं झालेलं नुकसान कधीच भरुन निघणारं नव्हतं.

राधेनं आपल्या मुलीला वय वर्ष सहा होताच शाळेत टाकलं. बाकीच्यांनी आपली मुलं कॉन्व्हेंटला टाकली होती. काहीजण आपली मुलं कॉन्व्हेंटलाच टाकत होते. जे पैसेवाले होते.

राधेजवळही पैसा नव्हता. तिला सरकारी नोकरी होती. ती नोकरी खाजगी अनुदानीत असल्यानं व सुरुवात असल्यानं वेतन नव्हतं. ती नोकरी सरकारी झाली नसल्यानं ती आपली मुलगी कॉंन्व्हेंटला टाकू शकत नव्हती.

सरकारी शाळा चालवायला मुलं लागतात. एका एका मुलांसाठी शिक्षक किती भटकंती करतात हे तिला माहीत असल्यानं तिनं आपली मुलगी सरकारी शाळेत आणि तेही मराठी माध्यमाच्याच शाळेत टाकली. त्याचबरोबर तिनं आपला मुलगाही त्याच शाळेत टाकला.

ती सरकारी शाळा. मुलं शिकत होती. त्याचबरोबर राधा आपल्या मुलांना शिकवीत होती. तशीच तिची दोन्ही मुलं शिकत होती. त्यातच तिला कामधंदाही नव्हता. पती मरण पावल्यानं तिची आबाळ होत होती. परंतू ती हिंमत हारली नाही.

ज्यावेळी तिचा पती मरण पावला, तेव्हा ती तरुणच होती. तिला कोणीही सल्ला देत की तिनं कोणी एखादा गरजू पाहून त्यांच्याशी विवाह करुन घ्यावा. परंतू तिला विचार होता आपल्या लेकराचा. त्यामुळं ती तसं करु शकत नव्हती.

दिवसामागून दिवस जात होते. तिची मुलं जास्त मोठी नव्हती. पतीपणाचा विरह जाणवत होता. तिला तिच्या पतीची फारच आठवण येत

असे. तसं पाहता तिला पतीची आठवण येताच ती रडतही असे. शेवटी तिनं ठरवलं की आपण विवाह करायचा. राधानं तसं ठरवताच तिनं एक तरुण पाहिला व त्याच्याशी बोलणं करुन तिनं आपला विवाह करुन टाकला.

काही दिवस गेले. तो पती तिला पैसे देत नसे खर्चासाठी. तिची आबाळ होत असे. कारण मुलांच्या शिक्षणाला पैसा लागत असे. त्यामुळंच तिनं ठरवल. आपण नोकरी करावी. त्यानंतर ती एका शाळेत शिक्षीका म्हणून लागली.

नवीन पती. त्याचा स्वभाव काही चांगला नव्हता. तसा तो सुरुवातीला चांगला वागला. तो तिच्या मुलांनाही चांगला वागवत असे. परंतू जसजसे दिवस गेले, तसतसा त्याचा स्वभाव बदलत गेला. त्या बदलत्या स्वभावानुसार तो पुढे दारुही प्यायला लागला व त्या दारुमुळं घरात भांडणंही व्हायला लागली. त्याचं कारणही तसंच होतं. ते कारण म्हणजे ती शिक्षीका असल्यानं चांगले चांगले लोक घरी येत. कारण घरी पैसा नसल्यानं ती शिक्षीका म्हणून एका शाळेत रुजू झाली होती.

राधेच्या या पतीचं नाव दशरथ होतं. तो दशरथ पुर्वी संशयी वृत्तीचा नव्हता. परंतू जसजसे कामानिमित्त लोकं तिच्या घरी यायचे. त्यामुळंच

त्याचा संशय वाढला व तो जास्त दारु प्यायला लागला. त्यातच त्या दारुमुळं तिच्या घरात रोजची भांडणं व्हायला लागली.

रोजची भांडणं. रोजच घरी दारु पिवून येणं. त्याचा परिणाम तिच्या मुलांवर होवू लागला. तसं पाहता त्या मुलांना तिचा दुसरा पती एक वडील म्हणून पसंत नव्हता. तिनं केलेला तो विवाह. त्या विवाहामुळं तिचं सारच नुकसान होत होतं. विवाह करण्यापूर्वी तिनं विचार केला होता की आपण विवाह केल्यास आपल्याला आधार होईल. परंतू ती गोष्ट फोल ठरली होती.

विवाह..... विवाह हा आधारासाठी केला जातो. राधानंही विवाह आधारासाठीच केला होता. तिलाही वाटत होतं की विवाह केल्यावर तिला दशरथची मदत होईल. तो पैसापाणीही कमवून आणेल. परंतू तिचा तसा विचार करणं हे मुर्खपणाचं लक्षण ठरलं होतं. दशरथ हा ऐतखावू प्रवृत्तीचा होता. त्यामुळं तिनं केलेला विवाह हा विवाहबंधन पाळणारा नव्हता. तो काही मुलांना सांभाळून घेत नव्हता.

त्यांची सतत होणारी भांडणं, त्यामुळं त्या भांडणानं तिची मुलं बिघडत चालली होती. तो फरक पडत चालला होता तिच्या मुलांवर. त्यामुळं आपल्या मुलाचं काय करावं आणि काय नाही अशी परिस्थिती व घालमेल तिच्या मनाची निर्माण झाली होती.

राधा तेव्हापर्यत गप्प होती, जेव्हापर्यंत तिच्यानं सगळया गोष्टी सहन झाल्या. परंतू त्या संपुर्ण गोष्टी जेव्हा सहन झाल्या नाहीत. तेव्हा तिनं आपली आपबीती आपल्या मुख्याध्यापकाला सांगीतली व मुख्याध्यापकांना विनंती केली की त्यांनी तरी तिला मदत करुन तिच्या बिघडणा-या मुलांना सुधारावं.

परिस्थिती गांभीर्याची होती. काय करावं सुचत नव्हतं. परंतू त्या शाळेतील मुख्याध्यापक चांगले होते. चांगल्या विचाराचे होते. त्यांना परिस्थितीचं भान होतं. तसे ते विचार करीत होते, ती मुलं बिघडू नयेत याचा. तसं पाहता त्या शाळेत कंपाऊंड नसल्यानं बाहेरची जी मुलं येत. त्यामुळं एकंदर शाळेची व्यवस्था हाताबाहेर गेली होती. त्या व्यवस्थेला पुन्हा वळणावर आणणं भाग होतं.

मुख्याध्यापक......त्या मुख्याध्यापकासमोर केवळ ती त्या राधाची दोनच मुलं नव्हती तर अख्खी शाळा होती. त्यामुळं केवळ ती राधाची दोनच मुलं नाही तर त्यांना अख्खी शाळा सुधारणे भाग होते. त्यामुळं ते विचार करीत होते.

ते विचार. ते विचार करता करता त्यांना त्यावर मार्ग उपलब्ध झाला. त्यांनी एक पत्र बनवलं व त्या पत्रानुसार त्यांनी त्या शाळेतील बाहेरून मुलं येण्याची तक्रार पोलीस ठाण्यात टाकली.

पोलिसांना पत्र प्राप्त झालं होतं. त्यानुसार होणा-या शाळेतील मधल्या सुट्टीत पोलीस शाळेत चक्कर मारु लागले. त्यातच पोलीस दिसताच बाहेरची शाळेत येणारी मुलं बंद झाली. त्यामुळं शाळेतील वातावरण बाहेरच्या मुलांना अनुकूल राहिलं नाही. आता उरलं होतं शाळेतील मुलांमध्ये सुसंस्कारित वातावरण निर्माण करणं. त्यावर मुख्याध्यापक योजना बनवीत होते. त्यासाठीही मुख्याध्यापक विचार करीत होते.

मुख्याध्यापक विचार करीत होते. यातही एक मार्ग सापडला. ते एका एका वर्गात जायला लागले. मुख्याध्यापक वर्गात जायला लागले. ते सुसंस्काराचे बीज वर्गात पेरु लागले. त्यांच्या बिघडण्याचे गणित विद्यार्थ्यांना सांगू लागले. हळूहळू ते संस्कार विद्यार्थ्यांत फुलू लागले. त्यातच बाकीचीच मुलं नाही तर राधाचीही मुलं संस्कारीत बनू लागली. राधाही आपल्या वर्गातील मुलांना संस्कारीत करु लागली. मात्र ती आपल्याच मुलांना संस्कारीत करु शकत नव्हती.

राधाची मुलं शाळेत गप्प बसत होती. परंतू तीच मुलं घरी मात्र आईचं ऐकत नसत. कारण त्यांचा त्यांच्या आईनं केलेला दुसरा पती हा काही चांगल्या संस्काराचा नव्हता. तसं कोणीतरी सांगीतलं की तिनं त्याचं तोंड बांधावं. जेणेकरुन तो काही बोलणार नाही. शेवटी तोंड बांधून घेणं हा काही चांगला प्रकार नव्हता. तो एक अंधश्रद्धेचा प्रकार होता.

ती एक काही जादू होती. त्या काळ्या जादूनुसार माणसाचं वशीकरण केलं जायचं. तसं पाहता या वशीकरणात माणसाला काही वस्तू चारल्या जात असत. मग माणूस ती वस्तू खाताच वशमध्ये होवून जात असे. तो दुस-या माणसाच्या मनानुसार चालत असे. त्यांच्या तोंडाला तोंड देत नसे.

राधा एक शिकलेली महिला होती. तिचा अशा भ्रामक प्रकारावर विश्वास नव्हता. परंतू माणसाची निकड. ती माणसाची निकड माणसाला अशा ठिकाणी घेवून जाते. त्यानंतर ज्या गोष्टी माणसं करु पाहात नाहीत. त्याही गोष्टी माणसं करायला लागतात. राधाच्याही बाबतीत तेच घडलं होतं.

राधा हुशार होती. तिला आठवत होता तिच्या उपासमारीचा काळ. ज्यावेळी तिचा पती मरण पावला होता. तेव्हा तिच्याजवळ पैसा नव्हता.

जवळ नोकरीही नव्हती. गाठीला दोन पोरं होती. परंतू जवळ पैसा नसल्यानं, त्यामुळं मुलं आणि आपलं पोट कसं पालवावं याची चिंता तिला होती.

तिचा एक मित्र होता. जो आज राजकारणात होता. त्याच्याही काही शाळा होत्या. चाहे तर तो तिला कुठेही नोकरी मिळवून देवू शकत होता. परंतू त्यानं तिला काही नोकरी दिली नाही. त्यामुळं आज तिला नेत्यांचा राग येत होता. त्याचं नाव शंकरप्रसाद होतं.

तिची रोजच होणारी उपासमार. तशातच ती त्या मित्राकडे गेली. त्याला आपलं दुखणं खुपणं सांगीतलं. परंतू तिच्या मित्रानं तिच्या दुःखावर लक्ष केंद्रीत केलं नाही. तो बालपणीचा खास मित्र होता. त्यामुळं तिला विचार येत होता की जो आज राजकारणात मोठ्या हुद्द्यावर आहे. जो काल रिक्षा चालवत होता व नेत्यांच्या सतरंज्या उचलल्या होत्या त्यानं. परंतू अचानक त्याला तिकीट मिळाली व जो आज मोठा झाला होता. आज त्याचेजवळ भरपूर पैसा आहे. त्याच्या काही शाळाही आहेत. चाहे तर तो एका झटक्यात आपल्याला नोकरी लावू शकत होता. परंतू त्यानं तसं केलं नाही.

आज ती सुखी होती काहीशी. परंतू नेत्यांबाबत तिच्या मनात चांगलाच आकस भरला होता. याचा अर्थ सर्वच नेते वाईट होते असा नाही.

परंतू तिला ते आवडत नव्हते. तिनं शितावरुन भाताची परीक्षा केली होती. त्यामुळं ती म्हणत असे कशाला हवेत राजकीय नेते. तसं पाहता तिचं म्हणणंही बरोबरच होतं.

अलीकडे सिलेंडरची भाववाढ होत होती. ही भाववाढ प्रदुषण मुक्त असलेल्या देशाला अडचणीची ठरत होती. यावर वेळीच पावलं उचलली गेली नाहीत तर उद्या प्रत्येक गृहिणी स्वयंपाक शेगडीवर करेल व प्रदुषण मुक्त देशाची कल्पना साकार होणार नाही. असं तिला वाटत होतं.

सध्या महागाई वाढतच वाढत चालली होती. ती महागाई केवळ सामान्य लोकांनाच छळत नाही तर गरीबांनाही छळत आहे असं तिला वाटत होतं. तशीच ती महागाई घरातील गृहिणींनाही छळत आहे असंही तिला वाटत होतं.

*******************************

तिचे विचार रास्त होते. तिच्या विचारानुसार गृहिणी......गृहिणी घरी स्वयंपाक करतात. त्या कशा स्वयंपाक करतात, हे न सांगितलेलं बरं. कारण त्यांना जो त्रास होतो, त्या त्रासाचं वर्णनच करता येणं शक्य नाही.

हं, आता कोणी म्हणतील की गृहिणींना कोणता त्रास होतो? आयतं मिळते ना सिलेंडर स्वयंपाक घरात. तसेच नवरोबा सर्वच वस्तू घरात आणून देतात ना वरचेवर. तसंच आता राशनही राशनदुकानातून नि:शुल्क मिळतं. मग कोणता त्रास होतो बरे? यावर विचार मांडतांना एवढंच सांगणार की त्रास होतो. महाभयंकर त्रास होतो. परंतू जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे याप्रमाणे गृहिणींना जो त्रास होतो, तो आपल्याला दिसत नाही.

अलीकडे सर्वांना राशन दुकानातून गहू आणि तांदूळ फुकटात मिळत आहे. याचा अर्थ आपल्याला आवळा मिळत आहे. बदल्यात पोवळा काढून घेतल्यागत मुख्य म्हणजे स्वयंपाकाचा सिलिंडर महाग होत आहे. तो सिलिंडर गरीबांनाही कमी पैशात मिळत नाही. सबसिडी नाहीच्या बरोबर आहे. ही सिलिंडरची महागाई सांगीतली तर लोकं म्हणतील की तांदूळ गहू फुकटात मिळत आहे, तरी कुरकूर. ही कुरकूर संपणारच नाही सर्वच वस्तू फुकटात दिल्या तरी. परंतू मला हे म्हणायचं आहे की ह्या सर्व वस्तू फुकटात मिळतात. त्या मिळतात कोणाला? जर याचा रितसर सर्वे केला तर तो तांदूळ, गहू धनिकांना मिळत आहे. जो निःशुल्क मिळणारा तांदूळ, गहू घराकडे नेवून तो व्यापारांना कमी भावात विकला जातो. तसंच राशनकार्डवाल्यांचा सर्वे केल्यास असे बरेचसे कार्डधारक मिळतील की जे गरीब नाहीत. तसंच अशी बरीचशी मंडळी मिळतील की जे गरीब आहेत.

परंतू त्यांचेकडे राशनकार्ड नाही. कारण ते मुळात हुशारच नाहीत. हुशार कोण असतो? याचा जर विचार केला तर धनीक हाच घटक जास्त हुशार आहे, जो या योजनांचा लाभ घेतो. गरीब नाही.

सिलेंडर बाबत सांगायचं झाल्यास मुख्य बाब ही सांगावी लागेल की ती अन्याय सहन करणारी बाई, ज्या घरात पती दारुडा आहे. तो दारुवर अतोनात पैसा खर्च करतो. त्यामुळं त्याच्या घरी सिलिंडर तर असतो. परंतू तो भरायला पैसा नसतो. तो पैसा व्यसनात जातो. अहो, या काळात अशा घरातील माणूस व्यसनापायी घरातील सामान विकतो. त्याच्या पत्नीनं ठेवलेले पैसे चोरतो. त्या घरात ती स्री सिलेंडर घ्यायला पैसा कुठून आणेल? मग ती स्री सिलेंडरचा हंडा तसाच ठेवून कमी पैशात असलेल्या काड्या वा भुसा आणते व आपला परीवार कसा तरी जगवते. खरं तर त्या घरी सिलेंडर निःशुल्क द्यायला हवं. निदान निःशुल्क मिळणारा गहू, तांदूळ निःशुल्क शिजवता यावा व कसंतरी चटणीमीठावर अशा गृहिणींना आपल्या लेकरांना जगवता यावं हा उद्देश. परंतू सरकार ते देत नाही. कारण तो व्यक्ती व्यसनापायी सिलेंडर विकणार नाही कशावरून?

अलीकडे सिलेंडरच दिवसेंदिवस महाग होत चाललेलं आहे. तो सिलेंडर साधी पूर्णतः गरीब असलेली स्री घेवू शकत नाही. त्यामुळं 'धूर मुक्त

देश' वा 'प्रदूषणमुक्त देश' ही जी देशाची वा प्रगतीशील भारताची संकल्पना आहे, ती फोल ठरत चालली आहे.

दरवेळी भाववाढ होत होती. त्यात सिलेंडरचीही भाववाढ होत होती. तसं पाहता पैसा हा कोणत्या कोणत्या गृहिणी स्वतः कमवीत नसल्यानं त्यांचेजवळ राहात नव्हता. त्यामुळं त्या सिलेंडरला पडणारे जास्त दाम देवून सिलेंडर घेवू शकत नव्हत्या स्त्रिया. पर्यायानं सांगायचं झाल्यास चूलच फुंकावी लागत होती. याचाच अर्थ असा की प्रदूषणमुक्त वा धूर मुक्त देशाची कल्पना जी मांडली जात होती. त्या कल्पनेला फाटा फुटत होता. यावर महत्वाचं सांगायचं झाल्यास ती सिलेंडर कंपन्यांनी यावर ठोस पावले उचलून सरकारला सुचीत करावं आणि त्यावर योग्य असा निर्णय घेवून सिलेंडरच्या किमती कमी कराव्यात असं म्हणत होती. तसंच सिलेंडर सर्व गृहिणींना वापरता येईल. तसंच धूर मुक्त भारत वा प्रदुषण मुक्त देशाची कल्पना साकार होईल असंही सांगत होती. परंतू तिचं कोण ऐकणार होतं. ना ती कोणती नेता होती ना कोणती पत्रकार. मात्र इतर गृहिणींप्रमाणेच तिलाही त्रासच होत होता. कारण ती त्यावेळेस नोकरीला नव्हती.

नेत्यांबाबत राग होताच. तसं तिनं एकदा वर्तमानपत्रात बातमी वाचली. एका प्रभागातील दोनशे चेंबरची झाकणं चोरीला. त्या शहराला वालीच नसल्याचा हवाला. मुद्दा गंभीर असल्यासारखा वाटत होता. कारण शहराला

नगरसेवक नव्हता. खरंच या प्रकरणावरून जाणवत होतं की शहराला नगरसेवक असावा. तो विषयच मुळात गत एक वर्षापासून नगरसेवक नसल्यानं गंभीर करुन टाकला होता.

विषय हा होता की शहराला नगरसेवक असावा की नसावा? यात शहराला नगरसेवक असावा अशी बाजू मांडली तर खरंच नगरसेवकाच्या कामावर ताशेरे ओढावे लागत होते. मग नगरसेवकाच्या कामाचा आढावा घ्यावा लागत होता. आता नगरसेवकाच्या कामाचा आढावा घेतल्यास तो कोणते काम करतो हेही पाहावे लागणार होते.

बरेचसे नगरसेवक असे असतात की ते निवडून आले की शो पीस म्हणून वागत असतात. जेव्हा जनता त्याचेजवळ जात असते, तेव्हा ते चक्क सांगतात की मला काही तू निवडून दिलेलं नाही. मी पैशाच्या भरवशावर निवडून आलेलो आहे. काही काही नगरसेवक असे असतात की ते प्रभाग किंवा वार्डात कोणतेच काम करीत नाहीत. त्यांच्या वार्डात किंवा प्रभागात गेल्यास ना बरोबर रस्ते राहात. ना बरोबर पाणी मिळत. ना कोणत्या सुविधा. तरीही त्याला सरकारी सुविधा लागू होत असतात. त्या सुविधा जनतेच्या पैशानं भागवल्या जात असतात. यात जनतेचा पैसा विनाकारणचा नष्ट होत असतो. त्यामुळं अशा नगरसेवकासाठी नगरसेवक म्हणून का निवडून आणावं असा प्रश्न निर्माण होतो.

ते राधाचं शहर. त्या शहराचं उदाहरण द्यायचं झाल्यास त्या शहराला एक वर्षापासून नगरसेवक नव्हता. तरीही कारभार व्यवस्थीत सुरु होता. एका चेंबरच्या झाकणाच्या चोरीची गोष्ट सोडली तर कोणाची कशाचीच कुरकूर नव्हती. सगळं शांततेत सुरु होतं. कारण सरकारी कर्मचारी असलेला महानगरपालिका आयुक्त व्यवस्थीत काम करीत होता आणि तो करणारच होता. कारण तो सरकारी कर्मचारी होता. हं, कुठं कधी कमीजास्त होत होतं. नगरसेवकही असतांना कमीजास्त होतच होतं ना ? इथं तर देशाची अशी स्थिती होती की देशात नगरसेवक नाही तर आमदार, खासदार, मुख्यमंत्री व पंतप्रधान असतांना देशात मोठमोठं साहित्य चोरीला जात होते. नगरसेवक नाही तर सारे आमदार, खासदार मालामाल होत होते. त्यांचा पुर्वइतिहास पाहिला तर असं जाणवत होतं की तो व्यक्ती किती गरीब होता आणि पद मिळताच किती पुढे गेला. मग एवढा पैसा कुठून आणला? याची शहानिशा केल्यास कळायला लागत होतं की त्यानं देशात मोठा घोटाळा केला. मग हा मिळवलेला पैसा हा चोरीचाच होता. परंतू त्याची चौकशी होत नव्हती. केली तर साधीच चौकशी होत होती. तसं पाहता सत्तारुढ पक्षाची चौकशी कोण करणार? परंतू ते जेव्हा पदावरून उतरत. तेव्हा मात्र एक एक मासा गळाला लागल्यागत सारे सापडत असत. याच स्वरुपानं देशातील अनेक घोटाळे पुढे आले होते. तसेच असे बरेच घोटाळे होते की

जे आजही उजेडात आले नव्हते. त्यावर लक्ष कोण घालणार. हे देशातील मोठमोठे घोटाळे होते. स्थानीक नगरसेवकाच्या पातळीवरही बरेच घोटाळे होते. परंतू ते उजेडात आलेच नव्हते. कोणी उजेडात आणत नव्हते. कारण सर्वजण आपल्याला काय करायचं अशी बघ्याची भुमिका घेत गप्प बसत असत.

राजकारण्यांचं काही सांगता येत नव्हतं. ते केव्हा कोणाला संपवतील व कोणाला पुढं आणतील. ते काही सांगता येत नव्हतं. संपवतील याचा अर्थ राजकारणात मुरवतील असा आहे. देशाचा विचार केल्यास देशात शंभर प्रतिशत बेईमान होते. एक प्रतिशत इमानदार. देशात अरब लोकसंख्येत या टक्क्याचा विचार केल्यास इमानदारांची संख्या कोटीच्या घरात होती. ज्यांच्यावर देश सुरु होता. ते इमानदार कोणताच घोटाळा करीत नव्हते. देश त्या इमानदारावरच टिकून होता. तसंच देशात असेही काही लोकं होते की जे स्वतःच वस्तू चोरत आणि इतरांना बदनाम करत. असेच लोकं राजकारणातून आपला राजकीय स्वार्थ साधत असत. आपण केलेले घोटाळे जनतेसमोर येवू नये. म्हणून ताबडतोब पक्षबदल केले जात.

नगरसेवक, आमदार, खासदार, पंतप्रधान व मुख्यमंत्री हे सर्वच राजकीय घटक दबाव आणणारे घटक होते. हे घटक काम करणा-या घटकांवर त्यानं काम करावं. चांगलं काम करावं. म्हणून दबाव आणत

असत. कोणतंही काम चांगलं वा वाईट करुन घेणं हे त्यांच्या हातात होतं. घोटाळे केव्हा होत? जेव्हा हे घटक असे काम करतांना त्यात स्वार्थ आणत तेव्हा. याबाबत राधेला वाटायचं की देश चालवायला नगरसेवक, खासदार, आमदाराची गरज नाही. मुख्यमंत्री व पंतप्रधानाची गरज थोडीशी राहू शकते खंबीर नेतृत्वासाठी. कारण मुख्यमंत्री राज्य चालवतात व पंतप्रधान देश. ते नेतृत्व देशातील सरकारी कर्मचा-यांमार्फत देश चालवू शकतात. मग कशाला हवेत नगरसेवक व आमदार, खासदार? त्यांना ठेवूच नये. कारण त्यांना उदरनिर्वाहासाठी देण्यात येणा-या वेतनासाठी खर्च होणारा पैसा हा जनतेचा असतो. तो तेवढा खर्च होणार नाही व जो पैसा वाचेल. तो देश विकासाच्या कामात येईल. हं, त्यातही एक यंत्रणा असावी. ती म्हणजे या सरकारी कर्मचा-यांवर लक्ष ठेवणारी. ती स्वतंत्र्य यंत्रणा असावी. त्या यंत्रनेनं कोणाच्याही दबावात काम करु नये. त्या यंत्रणेनं फक्त चौकशी करावी वा महाभियोगासारख्या याही देशात प्रक्रिया राबवून सरकारी कर्मचा-यांना पदावरून बरखास्त करावे. तसेच त्याची ताबडतोब चौकशी करुन तो दोषी आढळल्यास त्याची एकंदर संपुर्ण संपत्ती जप्त करावी. अशी जर प्रक्रिया राबवली तर देशातील भ्रष्टाचारही कमी करता येईल व देशाचा सर्वतोपरी विकासही करता येईल.

राधेचं म्हणणं बरोबरच होतं. परंतू आम्हाला तसा देशाचा विकास हवा नव्हता. आम्हाला आमचा विकास हवा होता. आम्हाला आमच्या देशातील पैसा आमच्या स्वतःसाठी गोळा करुन ठेवायचा होता. आमच्या सात पिढ्या सुखात जाव्या यासाठी हवा होता तो पैसा. कारण आमच्यात स्वार्थ कुटकूट भरला होता. हा स्वार्थीपणा सांभाळण्यासाठी आम्हाला मोठमोठी पदं हवी होती.

विशेष सांगायचं म्हणजे देशात सरकारी यंत्रणा होती आणि त्यावर लक्ष केंद्रित करणारी विशेष अशी यंत्रणाही. त्या यंत्रणेलाच आमदार, खासदार वा नगरसेवक वा सरपंच रचना म्हणता येईल. जिला पंचायत राज यंत्रणा म्हणतात. परंतू ही यंत्रणा आज घडीला कुचकामी ठरत चालली होती. कारण ही यंत्रणा आज आपला स्वार्थ पाहात होती व आपलाच विकास करीत होती. आज असा एकही आमदार, खासदार दिसत नव्हता की ज्यांच्याकडे गडगंज संपत्ती नाही. तिही संपत्ती कोटी आणि अरबोंच्या घरात होती. काहींची संपत्ती विदेशात होती. देशातील करंन्सी बदलली. परंतू त्या बदलल्या करन्सीचा कोणताच फरक अशा विदेशी बँकातील देशीय लोकांच्या पैशावर पडलेला नव्हता. म्हणूनच तो पैसा सुरक्षीत राहिला. म्हणूनच राधेला वाटत होतं की आमदार, खासदार वा नगरसेवक नसावा. त्यामुळं देशातील विनाकारणचा उध्वस्त होणारा पैसा वाचतो. परंतू हे जरी

खरं असलं तरी ज्याच्यावर आपलं प्रेम असतं. तो जवळचा माणूस आपलं काम करतांना नक्कीच नियुक्त असावा. त्यालाच आमदार, खासदार वा नगरसेवक म्हणता येईल. परंतू ज्यांच्यावर आपण प्रेम करतो. तो आमदार, खासदार नगरसेवक घटक इमानदार असावा. त्यानं अशा प्रेम करणा-या घटकाच्या विचारांची हत्या करु नये. जनतेच्या विचारांचा त्यांनी आदर करावा. नाहीतर आता असे आमदार, खासदार वा नगरसेवक आम्ही पाहतो की जे कोणतीही व्यक्ती त्यांच्याकडे गेल्यास त्याला धुत्कारुन लावतात. हा माझ्या पक्षाचा व तो दुस-या पक्षाचा असे म्हणत भेदभाव करतात. भेदभावात्मक वातावरण तयार करतात. तसेच विनाकारणचे घोटाळे करतात. जो जनतेचा पैसा असतो. त्या जनतेनं अतिशय काबाडकष्ट करुन व रक्ताचं पाणी करुन कर भरलेलं असतं. असं जर कोणताही आमदार, खासदार वा नगरसेवक वा कोणत्याही राजकीय पक्षातील नेते करीत असतील तर ते नसलेले बरे. हे तेवढंच खरं आहे. तसंच कोणावरही 'कशाला हवेत राजकीय नेते' असं म्हणण्याची वेळ येणार नाही. असंच नेत्यांनी वागायला हवं. असं जनता मानत होती.

राधा नवीन विचारांची होती. तिला परंपरा ह्या भाकडकथाच वाटत होत्या. ज्यावेळेस ती दुकानात जात असे आणि त्या दुकानातून जेव्हा आवश्यक वस्तू तिला मिळत नसत आणि ज्यावेळेस अशा वस्तू घेतांना

परंपरा आड येत. तेव्हा मात्र तिचा तिळपापड व्हायचा. ती त्या गोष्टीला विरोध करीत असे.

आज विज्ञानयुग होतं. अशा विज्ञानयुगात अंधश्रद्धेला थारा नव्हता. काल चंद्र, सुर्याला देव मानणारा माणूस आज त्याला चंद्र, सुर्य म्हणजे काय हे समजायला लागलं होतं. अशातच काही काही अंधश्रद्धा कालबाह्य ठरत चालल्या होत्या.

अंधश्रद्धेचा विषय मांडतांना एका दुकानाची गोष्ट. एका दुकानात गोष्टी चालल्या होत्या. त्या अंधश्रद्धेच्याच गोष्टी होत्या. दुकानदार ग्राहकाला त्याच्या दुकानात विक्रीला असलेल्या धूपबत्तीचं महत्व पटवून देत होता. म्हणत होता की आपण धूपबत्तीच घ्यायला हवी. कारण देवाला धूपडत्तीच चालतं.

धूपबत्ती.......या धुपबत्तीवरुन संवाद. सवांदात आठवतं की ज्या वस्तू मृत माणसांशी संबंध ठेवतात. अशा वस्तू आपण देवासाठी वापरु नयेत. जसे. वेळू कधीच मृत माणसांच्या शरणावर जाळला जात नाही. अपवाद आज त्यालाही जाळतात. म्हणून वेळूची काडी टाकून बनवलेली अगरबत्ती आपण देवघरात जाळता कामा नये. तसं पाहता वेळूचं झाड वंशवृद्धीचं प्रतिक आहे. असंही मानण्यात येतं.

कदाचीत वरील म्हणणं बरोबर असू शकते. कारण वेळूच्या झाडाला आपण जर पाहिलं असेल तर ते झाड पसरत असतं. लहान लहान अंकूर अगदी जमीनीवरुनच फुटत असतात. खाली जमिनीपासूनच ते झाड पसरत जातं. म्हणूनच त्याला जाळू नये हा संदर्भ.

अंधश्रद्धेच्याबद्दल सांगताना व त्याचा मृत आत्म्याशी संबंध जोडतांना काही अंधश्रद्धा. रात्र झाली की दुकानातून सुई किंवा टोकदार वस्तू विकता येत नाही. कारण असा समज आहे की या सुईनं किंवा टोकदार वस्तूनं मृत माणसाचं शरीर शिवलं जातं. तसंच मृत शरीराचं रात्री शवविच्छेदन करता येत नाही. कारण असं दिलं जातं की रात्री मृत शरीरातील आत्म्ये सक्रीय होतात. रात्री कुंकूही विकता येत नाही. कारण कुंकू हे सौभाग्याचं लक्षण समजलं जातं. रात्री कुंकू विकणं म्हणजे सौभाग्य विकणं होय असं मानण्यात येतं. तरीही आज परिस्थिती अशी आहे की ब-याचशा जत्रेच्या ठिकाणी कुंकू रात्रीला विकतात. कारण तो विकणं हा व्यवसाय आहे. तो विकल्याशिवाय पर्याय नाही. त्यातून बराच नफा कमवता येतो. अशा ब-याच अंधश्रद्धा आहेत. जसं हळद विकता येत नाही. तिही सौभाग्याचं लक्षण आहे. परंतू आज ती एक खाण्याचा पदार्थ असल्यानं लोकं हळदीला विकतातच.

महत्वाचं म्हणजे असल्या अंधश्रद्धा. खरं तर या अंधश्रद्धांना लोकांनी तिलांजली द्यायला हवी आजच्या विज्ञानयुगात. असं राधेला वाटत होतं. कारण आपलीच कामं अडत असतात. जशी मांजर वा कुत्रा आडवा गेल्यास एखादा व्यक्ती तो जाण्याचा रस्ता कोणी पार करेपर्यंत आजही रस्ता पार करीत नाही. त्यामुळ आपल्याला जिथं कुठं महत्वाच्या ठिकाणी जायचं असेल तर तिथं जाता येत नाही. प्रसंगी आपल्याला आपल्या अशा वागण्यानं बोलणं खावं लागते. नुकसानही सहन करावं लागतं.

आजही काही अंधश्रद्धा लाभाच्या मानल्या जातात तर काही अंधश्रद्धा ह्या नुकसानदायक मानल्या जातात. साप दिसणे अशुभ व मुंगूस दिसणे शुभ मानलं जातं. कोणी घुबड दिसण्याला शुभ तर कोणी अशुभ मानतात. अमूक अमूक तोटके केल्यानं लक्ष्मी येते असंही प्रसवलं जातं. खरंच या असल्या अंधश्रद्धा पाळल्यानं लक्ष्मी जर आली असती तर सर्वच लोकं करोडपती बनले असते. कोणीही गरीब उरले नसते.

विशेष सांगायचं म्हणजे या असल्या अंधश्रद्धा......या अंधश्रद्धांना परंपरा म्हणाव्या की भाकडकथा? या अंधश्रद्धा पाळाव्या की पाळू नये? या अंधश्रद्धा पाळल्यानं खरंच फायदा होतो की नुकसान होतं? आदि अनेक प्रश्न आहेत. या अंधश्रद्धा पाळल्यानं जर फायदा होत असेल तर अवश्य

पाळाव्या. अन्यथा आजच्या विज्ञानयुगात त्या पाळण्याची गरज नाही. तरीही लोकं त्या पाळत असतात त्याचं आश्चर्य वाटतं.

महत्वपुर्ण गोष्ट ही की अंधश्रद्धा ह्या माणसाला अंधारात नेवून टाकतात. त्यातच आपला विकास खुंटवतात. असा राधेचा विचार. त्यामुळंच ती म्हणत असे की आज विज्ञानयुग आहे. विज्ञानानं सारंच सिद्ध केलं. आज आपल्याला ओळखता येतं सत्य असत्य. देव, दानवाची प्रतिकृती आपल्याला ओळखता येते व आजच्या काळात कोण कोणाला कोणत्या अंधश्रद्धा प्रसवून मुर्ख बनवतो तेही ओळखता येतं. म्हणून त्या पाळू नयेत व कोणाच्याही मायाजाळात जावू नये. जेणेकरुन आपण फसू व त्यातून निघू शकणार नाही. विशेष सांगायचं म्हणजे अंधश्रद्धा ह्या परंपरा नाहीत तर त्या भाकडकथाच आहेत.

राधा ही एक शिक्षीका होती. त्यातच तिला का◌ॅपी करणं आवडत नव्हतं. यावर्षी सरकारनं एक नवीन उपक्रम हाती घेतला होता का◌ॅपीमुक्त अभियानाचा. विद्यार्थ्यांनी का◌ॅपी करु नये म्हणून हा उद्देश होता सरकारचा.

महाराष्ट्रात का◌ॅपीयुक्त अभियान सुरु होतं. त्या अनुषंगानं परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार थांबविण्याचा हा प्रकार. ते प्रकार थांबविण्यासाठी

शालेय शिक्षण व क्रिडा विभागानं पत्र काढलं होतं. त्यानुसार यावर्षी देशात कोणीही काॅपी करु नये. राज्य काॅपीमुक्त व्हावं. मुलं आत्मनिर्भर व्हावी ह्या उद्देशानं या काॅपीमुक्त अभियानाची निर्मीती करण्यात आली व त्यातूनच पुन्हा एकदा विद्यार्थ्याच्या मनात भीतीदायक वातावरण निर्माण झालं असं काहीजण म्हणत असलेले दिसत होतं.

काॅपीमुक्त अभियान. ही आधीपासूनच काळाची गरज होती. काॅपी पुर्वीपासूनच केली जात असे. त्यातच अशा काॅपीतून पुर्वी बरीचशी मुलं घरी बसली. तरी काॅपी बंद झाली नाही. काही ठिकाणी वादही झाले. त्यातूनच परीक्षा राबवितांना पोलिसांची मदत घ्यावी लागत असे. आता प्रत्येक शाळेत असे गैरप्रकार होवू नये. म्हणून पोलीस पाठवले जात.

पुर्वीपासूनच काॅपी हा प्रकार होता. तो या प्रकारानुसार लोकं शाळेचे काही मजले चढून खिडकीत बसलेल्या मुलांना काॅपी पुरवत. यात त्या शाळेत जेही शिक्षक त्या केंद्रावर राहात. त्यात शिक्षकांचा समावेश असायचा. कारण ही काॅपीबहाद्दर मंडळी अशा शिक्षकांना धमक्या देत. त्यांचा रस्ता अडवीत. त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देत. ही वास्तविकता होती. परंतू आपली बदनामी होवू नये. म्हणून ती प्रकरणं उजेडात आली नाही व सर्रास काॅप्या चालवल्या जावू लागल्या.

काॅपी अभियानातंर्गत काॅपी पकडण्यासाठी कधी भरारी पथक यायचं. हे भरारी पथक काॅपी पकडायचं. त्यातच पकडलेल्या मुलाला पेपरपासून वंचित ठेवायचं. तसं त्या पथकाचं चालायचं. त्यामुळं काहीशी मुलं घाबरायची. परंतू काही घाबरत नव्हती. काही मुलं ते भरारी पथक गेलं की जैसे थे स्थिती निर्माण करीत. त्यांना वाटत असे की भरारी पथक गेलं. आता कोणीच काही करणार नाही. त्यानंतर पुन्हा काॅपीबहाद्दर सक्रीय होत. काही काही शाळा तर संगनमत करुन काॅप्या फळयावर लिहून देत असत.

आज तसं नव्हतं. आज फळयावर चक्कं काही काही शाळेत लिहून देतात म्हणून त्यावर उपाय काढण्यासाठीच बैठी पथकाची नेमणूक करण्यात आली होती. हे बैठी पथक शाळेतच बसत असे. ते पथक केव्हा धाड मारेल आणि केव्हा नाही याची शाश्वती नसे. सारं केंद्रच कडक करुन टाकलं होतं या माध्यमातून. त्यातच एखादा मॅनेज होवू शकतो म्हणून त्या ठिकाणी दोन, तीन लोकांची नियुक्ती केली होती. त्यांना पुर्ण अधिकार दिले होते. काॅपीमुक्त अभियान चांगलं राबविण्यात यावं म्हणून. यामुळं प्रत्येकच केंद्र कॉपीमुक्त माध्यमातून चांगलं चाललं होतं. परंतू यातही काही दोष होते. ज्यांची नियुक्ती झाली, त्यापैकी काही निवृत्त कर्मचारी होते. त्यांनी हजेरीच लावलेली नव्हती. तसंच काही पायानं वा आजारानं अपंग होते. काहींना

साध्या पाय-याही चढता येत नव्हत्या. ती मंडळी फक्त शोभाच वाढविणारी होती. मग अशानं कॉपीमुक्त अभियान कसं राबवावं यावर प्रश्नचिन्हं होतं. हा प्रयोग होता मंत्रालयाचा. कारण हे पहिलं वर्ष होतं. पुढं मात्र कडक राहणार. कारवाई होणार आणि त्यासोबतच विद्यार्थ्यांचं जीवनही बरबाद होणार अशी चिन्हं दिसत होती. त्याची ही सुरुवात वाटत होती.

मुळात याबाबत सांगायचं म्हणजे एकीकडे मानसीक परिणाम होतो विद्यार्थ्यी जीवनावर म्हणून आठवीपर्यंत नापास करु नका म्हणणारा अभ्यासक्रम. त्या अभ्यासक्रमानं आठवीपर्यंतच्या वर्गापर्यंत भीती नष्ट केली होती आणि दुसरीकडं दहावीच्या केंद्रावर बैठी पथकाची नियुक्ती करुन पुन्हा त्याच विद्यार्थ्यांत भीती निर्माण करुन त्या विद्यार्थ्यांने कॉपी करु नये हे प्रतिपादन केले होते. यावरुन अभ्यासक्रम राबविणा-या घटकाला नेमकं काय साकार करायचे आहे ते कळत नव्हतं. एकीकडं आठवीपर्यंत फारच लाड केलं गेलं होतं विद्यार्थ्यांचं आणि तिकडे दहावीच्या परीक्षेत एकाएकी राग. यात जर विद्यार्थ्यांत या रागामुळं वा धाकामुळं नेमकं काही झाल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थीत झाला होता. तसाच तो प्रश्न संभ्रमात टाकणारा होता. कारण अलीकडील काळात बोलण्यावरही बंदी घातली गेली होती. मात्र सर्वात महत्वाचं म्हणजे कोणी सांगितलं वा न सांगितलं तरी चालेल, त्यामुळंच विद्यार्थ्यांना जर आपल्या जीवनात

यशस्वी व्हायचं असेल तर त्यांनी कॉपी करु नये. अभ्यास करावा व निर्भीडपणे पेपर सोडवावा. विद्यार्थ्यांचा अभ्यासच आजच्या काळात त्यांना तारेल यात शंका नव्हती. कारण हे अभियान केवळ कॉपीमुक्त अभियान नव्हते तर तारांकित अभियान होते.

राधा एक महिला होती. अत्याचार ग्रस्त महिला. तिच्या जणू प्रारब्धातच असं लिहिलेलं असेल असं जाणवत होतं. आज तिच्या देशात संपन्नता होती. महिलांना संपन्नता प्रदान केली होती देशानं. परंतू नशिबानं कुठं संपन्नता दिली होती तिला. विधाता आजही तिच्याशी भेदभाव करीत होता. त्यातच तिला वाटत होतं की देशानं संपन्नता प्रदान केली आहे. कायद्यानुसार देश संपन्नता प्रदान करु शकते. पण निसर्गानं तिला संपन्नता प्रदान केलेली नाही असं तिला वाटत होतं. कारण पहिला पती चांगला असूनही मरण पावला होता तर दुसरा दारुडा निघाला होता. तो तिला समानताही देत नव्हता.

दरवर्षी देशात महिला दिन साजरा व्हायचा. या महिला दिनी सुधारणेवर विचार केल्या जायचा. हा दिवस महिलांच्या दृष्टीकोणातून सन्मानाचा दिवस असायचा. या दिवशी महिला राजरोषपणे आपल्याबरोबर झालेला अत्याचार आठवत व तसा त्यांच्यावर अत्याचार होवू नये. म्हणून कार्य करण्याची शपथ घेत.

महिलादिन हा महिला संकल्पनेवर आधारित होता. दरवर्षीच जागोजागी हा महिलादिन साजरा व्हायचा. तसा तिच्या शाळेतही तो महिलादिन साजरा होत असे दरवर्षीच. तशी तिही अनुभव संपन्नच होती. याही वर्षी ती हिरीरीने विचार मांडणार होती. तसं तिला दरवर्षीच कार्यक्रमात पाहुणी म्हणून बसवतच होते. याहीवर्षी पाहुणी म्हणून तिला बसवलंच होतं.

तो कार्यक्रम. त्या कार्यक्रमात सर्वांनी विचार मांडले. तसा तिचा क्रमांक आला व ती बोलकी झाली.

महिलादिनानिमीत्यानं विचार मांडतांना मला एक विचार हाही मनात येतो. खरं तर तो संभ्रमाचा विचार आहे. कारण आज महिलांकडे पाहिलं तर महिला सक्षम आहे. त्याची उदाहरणं द्यायची झाल्यास नक्कीच देता येतील. कारण आज कैसर विल्यमसारखी महिला अंतराळात पोहोचलेली आहे. प्रतिभा पाटील सारखी महिला देशाच्या राष्ट्रपती बनल्या आहेत. किरण बेदी सारखी महिला राजकारणात सक्रिय झाली आहे. तसंच इंदिरा गांधींसारखी महिला भारताची पंतप्रधान झाली आहे. तसेच सोनिया गांधीसारखी महिला काँग्रेसची अध्यक्षा. अशी कितीतरी उदाहरणं देता येतील महिलांच्या सक्षमीकरणांची. यावरुन वाटतं की खरंच महिला सक्षम आहे.

आजचा काळही असाच महिलांच्या सक्षमीकरणाला अनुकूल आहे. आज महिलांनी आपला स्वतःचा विकासच केला नाही तर ती आयतोब्या असलेल्या व स्वतःला पुरुष समजणा-या माणसाला पोषते. आजही ठोंब्यासारखा बलदंड असलेला पुरुष हातपाय गळल्यागत महिलांसमोर गुलामागत वागतो व आजही घरातील स्नुषा चांगल्या निघाव्या, म्हणून विधात्याकडे साकडे घालणा-या भरपूर सासवा जगात आपल्याला पाहायला मिळत आहेत. आजही महिला, पुरुषांना आपल्या पत्नीच्या हातचे कळसुत्री बाहुले म्हणून घरात वागवतांना दिसत आहेत. संसार करतांना त्यात पुरुषांना राबवितांना दिसत आहेत. त्यामुळं महिला सक्षमच वाटते.

कालचं ठीक आहे की महिला सक्षम नव्हती. तिला साधा शिक्षणाचा अधिकार नव्हता. सतत तिच्यावर अत्याचार होत होता. बलात्कार तर वारंवार व्हायचा. घरात, दारात आणि बाहेरही. पुर्वीच्या काळातील महिलांवरील अत्याचाराबाबत सांगायचं झाल्यास पुर्वी बालविवाह व्हायचा. वधू कमी वयाची व वर जास्त वयाचा. यात वर वयानं कितीतरी मोठा असल्यानं मरुन जायचा. मग त्या घरात त्या वधूची साडेसाती सुरु व्हायची. साडेसाती म्हणजे एकाच घरातील सारी मंडळी या तरुण असलेल्या विधवेवर अत्याचार करीत सुटायची. तो बलात्कारच असायचा.

परंतू त्यावर आवाजही उठवता येत नव्हता महिलांना. कारण ती सक्षम नव्हती. तसेच कायदेही तसे सक्षम नव्हते. विधवा विवाह बंदी होती.

आज काळ बदलला आहे. महिलांना शिकता येतं. उच्च शिक्षण घेता येतं. महिलांना आपला बालविवाह रोकता येतो. त्यांना विधवा विवाह करण्याची अनुमती आहे. विनाघुंघट कुठेही जाता येतं. कुठंही केव्हाहीपर्यंत विहार करता येतं. एवढंच नाही तर एक पती असतांना तो जर बरोबर वागत नसेल तर वेळप्रसंगी बदलवता येतो. अर्थात घटस्फोट घेऊन दुसरा विवाह करता येतो. कारण त्यांना कायद्याच्या संरक्षणाचं कवच आहे. मग असे असतांना त्या महिला स्वतःला का कमकुवत समजतात तेच कळत नाही. त्याचं कारण आहे येथील संस्कृती. आपली संस्कृती महान आहे. त्या संस्कृतीला विशिष्ट असं वलय आहे. महिलांबाबतीत सांगायचं म्हणजे ही संस्कृती सक्षम आहे महिला बाबतीत. या भारतीय स्री संस्कृतीला त्यांचा पुर्वइतिहास माहित आहे. तो पुर्वइतिहास म्हणजे दुर्गा, काली अवतारांची. त्यातच त्यांना हेही माहीत आहे की या संस्कृतीनं गार्गी, मैत्रेयीच्या रुपात शास्त्रार्थही केला होता व त्या महिला संस्कृतीनं पुरुषांच्या बरोबरीला खांद्याशी खांदा लावला होता. महिला कमकुवत नाहीच आणि कोणीही तिला कमकुवत समजून घेवून भूल करु नये. ती कमकुवत सारखी वागते तेही आपल्यासाठीच. तिलाही वाटते की हा देश माझा आहे. माझ्या देशाचा

अपमान होईल मी जर अशी संस्कृतीला धरुन वागले नाही तर. हाच हेतू ठेवून महिला वर्ग वागत होता काल. आजही वागतो. परंतू त्या महिला वर्गाच्या तशा वागण्याचा फायदा हा मध्यंतरीच्या पुरुष जातीनं घेतला व त्यांच्यावर विशेष अशी बंधनं घातली व त्यांना गुलामागत वागवलं. यात त्यांनी पुर्ण संस्कृती स्त्रियांना सोपवून दिली. त्यांनी काय खावं, काय प्यावं याबाबतही बंधनं घातली. डोक्यावर पदर असावा. लुगडंच घालावं अशी बंधनं.

आज ब-याच महिला पुढे गेल्या आहेत. राजकारण, अर्थकारण व देशाची धुरा सांभाळत आहेत. आज महिलांनी ओळखलं आहे की आपण जर आवाज उचलला नाही आणि असेच दबत राहिलो तर येथील पुरुष वर्ग आपल्यावर विनाकारणचा अत्याचार करतो. म्हणून त्या सक्षम बनल्या आहेत. आजही ज्या घरी मुली विवाह करुन जातात. त्या घरी मुली आपल्या मनानुसार नवरोबाला वागायला लावतात. जर नवरोबा तसे वागत नसतील तर त्यांना इंगाही दाखवायला त्या मागे राहात नाहीत किंवा पाहात नाहीत. जर नवरोबा व सासूसासरे चांगले असतील तर मुली चांगल्या वागतात. सांस्कृतीक परंपरेनं वागतात. परंतू जर नवरोबा चांगले नसतील तर मात्र अशावेळी त्या संस्कृत्यांनाही गहाण टाकतात. त्यानंतर कोणी

नावबोटं ठेवो की अजून काही. त्या घाबरत नाहीत. त्या मुली डोक्यावर पल्लूही ठेवत नाहीत. कोणतीच व्रतवैकल्ये पाळत नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही की महिला ही आज कमकुवत नाही. तिला कोणीही कमकुवत समजू नये. ती कालही कमकुवत नव्हती. कालही ती दुर्गा रुपात वावरुन माजलेल्या महिषासूराचा विध्वंस करीत होती. आजही ती अशाच माजलेल्या महिषासूराचा विध्वंस करण्यास सक्षम आहे. तरीपण आजही अशा काही स्त्रिया आपण पाहतो की त्यांना पाहिलं की महिला कमकुवत जाणवते. अशा महिला आजही देशात ब-याच आहेत की ज्या आजही अत्याचार सहन करतांना दिसतात. आजही त्यांच्या डोक्यावर पदर दिसतो. घुंघटही दिसतो. आजही त्या महिलांवर घरादारात अत्याचार होत असतो. त्यांना मनमोकळे पणानं वागता येत नाही. ब-याच स्त्रियांना आजही कुठेही केव्हाही मनमोकळे पणानं फिरता येत नाही. सतत भिती आणि भितीच तसंच भितीदायक वातावरणही दिसतं. त्यांच्या आचरणातून आजही त्यांचं दुय्यम स्थान दिसून येतं.

आज महिला दिन आहे. महत्वाचं म्हणजे आजपासून तरी महिलांनाही चांगलं वागवावं. त्यांनाही सामाजिकता प्रदान करावी. त्या मान ठेवतात म्हणून त्यांच्याकडून जबरदस्तीनं प्रथांचं पालन करुन घेवू नये. तेव्हाच महिलादिनाचं सार्थक होईल एवढंच सांगावेसे वाटते

राधा शाळेत शिकवीत होती. मुलांना संस्कारीत करीत होती. त्यांच्यात संस्कार फुलवीत होती. परंतू तिच्या घरी मात्र अंधार होता. ती दुस-यांना बोध देत होती. परंतू तिचा संसार फाटका होता. तिचं एक बोट दुस-याकडं होतं. परंतू तिचे चारही बोटं तिच्याकडेच होती. हे तिलाही माहीत होतं. त्याबद्दल तिला पश्चाताप होत होता. तिला वाटत होतं की त्या गोष्टी जर दुस-यांना माहीत झाल्या तर ते काय म्हणतील. परंतू हे तिचं प्रारब्ध होतं. ज्या प्रारब्धावर ती पश्चाताप करीत होती.

तिचा पती.......तिचा पती निव्वळ दारुच पीत नव्हता तर तो तिला मारतही होता. एकदाचा तो दिवस. त्या दिवशी तिचा पती दशरथशी तिचं भांडण झालं होतं त्यानं तिच्या मुलांसमोरच तिला मारलं होतं. तशी ती पुष्कळ व्यथीत झाली व तिनं ठरवलं, आपण त्याला सोडावं. कारण तो तिचा पगार. परंतू तिचा पती दारु पीत असल्यानं तो तिचा पगार तिला पुरत नव्हता. अशातच मुलं मोठीही झाली नव्हती, इतक्यात तिला वाटत होतं की जर तिनं तिला सोडून दिलं नाही तर उद्या त्याचेच कुसंस्कार त्या मुलांवर पडतील व ती दोन्ही मुलं बिघडतील. शेवटी तिचा तो विचार. तिनं ब-या बोलानं त्याला सोडलं आणि ती आपल्या मुलांना घेवून वेगळी राहू लागली.

ती दारु........ त्या दारुला तिच्या पतीचे पैसे पुरत नव्हते. त्यातच आता ती घरात नव्हती. त्यामुळंच तो आणखीनच एकाकी झाला होता. तो आता अख्खा दारुच्या आहारी गेला होता. तो आता दिवसरात्र दारु पिवून असायचा. त्यातच त्याची प्रकृती ढासळली व त्या अवस्थेत त्याची सेवा करायला कोणीच नसल्यानं एक दिवस तो मरण पावला.

राधेला ती गोष्ट माहीत पडली. तशी ती आली. तिनं त्या प्रेताकडे पाहिलं. तसं ते प्रेत न्याहाळताच तिला आढळलं की त्याच्या डोळयावर मुंग्या लागलेल्या असून त्या मुंग्यांनी त्याचा एक डोळा खावून टाकलेला आहे.

कसाही का असेना. आपलाच पती होता. असा विचार करीत तिनं त्या पतीची अंतिम यात्रा पार पाडली व ती मोकळी झाली. आता ती आपल्या दोन्ही मुलांना शिकवू लागली. तशी ते शिक्षण शिकवतांना तिला पतीविरहाचाही त्रास होवू लागला.

तिचं ते तरुणपण तिला छळत होतं. पती सोबतचे तीनचार वर्ष आनंदात गेले होते. पहिला पती चांगला होता. परंतू दुसरा. दुसरा काही चांगला नव्हता. पहिल्या पतीनं तिला शेतीतून पैसा मिळवून दिला होता. दुसरा दारुडा होता. परंतू दुस-या पतीचं शहरात घर होतं. पैसा ब-यापैकी

होता. तसं पाहता एका खाजगी शाळेत नोकरीही. परंतू संस्कार.........संस्काराची वानवा होती तिच्याघरी. तिची मुलं कशानं बिघडत होती ते तिलाही माहीत नव्हतं.

तिचे दोन्ही पती मरण पावले. परंतू ती काही त्यावेळेस म्हातारी नव्हती. तरुणपणा छळत होता. तिसरा विवाह करावासा वाटायचा. परंतू कसा करणार. तिसरा पती टिकेलच असं कशावरुन. शिवाय मुलांचा प्रश्न. तशी ती विचार करायची. ती विचार करायची की तिसरा पती. आपले तर दोन्ही पती मरण पावलेत. एक पती आपल्या प्रारब्धानं गेला आणि दुसरा पती दारुनं. आपल्या प्रारब्धातच पतीचं सुख नसेल. जर आपण तिसरा पती केला आणि तोही मरण पावला तर......किंवा तिसरा पती हाही चांगला नाही निघाला तर......आपण विचार केला होता की दुसरा पती आधार होईल. परंतू आपला विचार हा फोल ठरला. संस्काराच्या दृष्टीकोणातून विवाह केला दुसरा. परंतू आपली निराशा झाली. आपल्या दुस-या पतीनं आपल्या मुलांना सांभाळण्याऐवजी कुसंस्कारी वागत होता तो. आता आपण विवाहच करु नये. कधीच करु नये विवाह. परंतू हे तरुणपण. ह्या तरुणपणाला कसं रोकावं. हे तरुणपण जे छळत असतं पदोपदी. त्या तरुणपणाची वाट कशी लावावी.

तिचा तो विचार. तो विचारच रास्त होता. कारण तिचं ते तरुणपण छळत होतं तिला. परंतू ती आपलं तरुणपण दाबत होती. ते दाबणं आवश्यक होतं. कारण तिची मुलं आज लहानाची मोठी होत होती.

आज तिची ती मुलं लहानाची मोठी होत होती. परंतू ती लहानाची मोठी होत असली तरी ती लहान होती. त्यातच तिनं त्या मुलांच्या वाढत्या वयाची चिंता केली नाही. तिला वाटलं की ती अजून लहान आहेत. म्हणून की काय, ती बेधुंदसारखी वागत राहिली. ती आता व्यवहार स्वतःच करायला लागली. कारण तिच्याकडे कोणताच उपाय नव्हता. ती मनमोकळेपणानं वागू लागली. ज्याला लोकांनी दुषणं ठेवलीत. तिला तिचं तरुणपण छळत होतं, तरीही तिनं आपल्या इच्छा तृप्त करण्यासाठी वाममार्ग पसंत केला नाही. पत्करला नाही. त्यातच ती गैरमार्गाचा अवलंब करु लागली असती तर दोष तिचा असता. सुरुवातीला तिला अडचण गेली स्वतंत्र्य वागत असतांना. काही गोष्टी लपूनछपून केल्या. परंतू काही दिवसानंतर ती अभयासारखी अगदी बिनधास्त वागू लागली. बिनधास्त फिरु लागली. व्यवहारीकतेसाठी माणसांशी बोलू लागली. परंतू ते पुरुषांसोबत बोलणे तिच्या मुलांना खटकू लागले. ती लहानगी मुलं तिला टोचू टोचू बोलू लागली. परंतू तिच्याजवळ उपाय नव्हता. त्याचा परिणाम तिच्या मुलांच्या वागणूकीवर झाला. ती मुलं त्यांची आई व्याभीचार करते

असं समजू लागली. ते पाहून ती तिची मुलंच बिघडतील असा अंदाज येणा-या ब-याच लोकांनी तिला समजावून पाहिलं. परंतू तिच्याजवळ पर्याय नव्हता. त्यामुळेच ती काही ऐकत नव्हती. त्यामुळं लोकांनी तिला समजावणं बंद केलं. आता ती अगदी लोकांचं न ऐकता बिनधास्तपणे उघडरितीनं वागू लागली. आता जेव्हा जेव्हा तिला तिच्या कामासाठी व्यवहाराचा प्रसंग असे. तेव्हा तेव्हा ती आपल्या कामासाठी पुरुषांशी बोलतच असे व आपली कामं पुर्ण करीत असे. त्यातच त्याचा परिणाम तिच्या मुलांच्या बिघडण्यावर होवू लागला होता.

मुलं लहानाची मोठी होवू लागली होती. तशी ती मुलं आपल्या आईला व्याभीचारी असण्याच्या दृष्टीकोणातून पाहू लागली. त्यातच ती मुलं त्या पारदर्शी व्यवहाराला तो व्याभीचार समजून बिघडू लागली होती. त्यांच्यात संस्कार उरले‌ नव्हते.

वाढती मुलं. ती वाढती मुलं आता काही तिचं ऐकत नव्हती. ते पाहून तिनं आपल्या मुख्याध्यापकांना सांगीतलं व इच्छा व्यक्त केली की त्यांनी त्यांना समजवावं. त्यानंतर तिच्या मुलांना तिच्या मुख्याध्यापकानं समजावलं होतं. तशी ती काही काळासाठी चूप बसली होती. परंतू ती जेव्हा त्यांच्या वयात आली होती. तेव्हा मात्र ती मुलं तिचं ऐकायला तयार नव्हती. ती आपल्या आईचंच नाही तर कोणाचंच ऐकत नव्हती. तसं पाहता त्यांना

कितीही समजावलं कोणी तरी ती ऐकायला तयार नव्हती. त्यांना त्यांच्या आईनंच बिघडवलं आहे असं ती मानत होती. ती मुलं आता वाढत्या वयाबरोबर त्यांच्या आईनं त्यांना समजदारीच्या दोन गोष्टी सांगतल्यास तिलाच खडेबोल ऐकवत होती.

राधा केवळ दोन मुलांची आईच नव्हती तर ती एक शिक्षीकाही होती. काही दिवस जाताच तिच्यासमोर चित्र उभं राहिलं की तिची मुलं बिघडतात आहे. तेव्हा तिनं त्यावर विचार केला. विचार केला की या बिघडण्यावर आळा कसा घालावा. विचाराअंती तिला समजलं की आपण मुलांना विचारात न घेता माणसांशी कामासाठी बोलणे केले. त्याचा परिणाम हा झाला की आपली मोठी होत असलेली मुलं बिघडत चालली. आपण चांगले कर्म केले. परंतू आपल्या कर्माचा परिणाम मोठ्या होत असलेल्या मुलांवर झाला. ती बिघडली. आता मुलं मोठी झालेली आहेत. तेव्हा आपण सुधरायला हवं. आपण आता कोणत्याच माणसांशी बोलू नये आजपासून. तसा विचार आला होता तिला. त्यानंतर मुलांसाठी का असेना, तिनं आपलं मुक्त स्वातंत्र्य गोठवलं.

माणूस पुर्वी झाडावर राहात असे. तो माकड रुपात होता. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारायचा. केव्हाही झोपेतून उठायचा. केव्हाही झोपायचा. केव्हाही जेवायचा आणि केव्हाही प्रसाधन करायचा.

त्याचे काहीच नियम नव्हते. परंतू तो जेव्हा झाडावरून खाली आला, तेव्हा त्यानं काही नियम बनवले. कारण त्याला त्या नियमांची गरज पडली. मग पुढे शाळेचीही गरज पडली. त्यातच शाळेसाठी काही नियम ठरविण्यात आले. त्यालाच शालेय दृष्टीकोणातून शिस्त म्हटलं गेलं.

शाळेची शिस्त. शाळेची शिस्त राखायलाच हवी. कारण ती शिस्त जर राखली गेली नाही तर शाळा ही शाळा उरणार नाही. तिची अवस्था एखाद्या स्मशानागत होईल.

अलीकडील काळात शाळेतील मुलं शिस्तीत वागत असतात. ती मुलं ड्रेस कोडचा पोशाख घालत असतात. त्यात व्यवस्थीत टाॅय बांधत असतात. प्रेसचे कपडे घालत असतात. चांगले स्वच्छ कपडे घालत असतात. परंतू काही काही मुलं अलीकडील काळात बिघडत चालली आहेत. मुलं शिस्तीने वागत नाहीत. शाळेला पोषक असलेल्या गोष्टी मुलं करीत नाहीत. जसे. चांगली वागणूक ठेवणे. यात दररोज घालत असलेले पोशाख न घालता चित्रविचित्र पोशाख घालणे. तसेच अभ्यास न करणे. वात्रट सारखं वागणे. मुलींना टाँगटिंग करणे. मारापीटी करणे.

महत्वपुर्ण गोष्ट ही की यात मुलं अशी जेव्हा वागायला लागतात. तेव्हा त्यात दोष त्या शाळेतील शिक्षकांचा असू शकतो. ती मुलं

बिघडल्यासारखी वागतात. कारण शिक्षक त्या प्रकारचे मार्गदर्शन मुलांना त्यांच्या वागण्यावर करीत नसतात. ते प्रामाणिकपणाने वागायला शिकवीत नसतात.

मुलं जेव्हा तरुण होतात. ते त्यांचं बिघडण्याचं वय असतं. या काळात मुलांना त्यांच्या तरुण वयाचं आकर्षण असतं. त्यावेळेस त्यांना इतर मुलं ही अधिक आवडत असतात. ती मुलं वयात आली की प्रेम करायला लागतात. त्यामुळंच शिस्त बिघडत असते. या अवस्थेत अशी मुलं साध्या केसभुषेतूनही बिघडत आहे हे लक्षात येतं. जशी भांगाची वेगवेगळी केससज्जा वापरणे. यात मुली कपाळावर केसाचा फुगा काढतात तर मुलं डोक्याच्या मध्यभागात केसांचा कोंबड्यासारखा तुरा ठेवतात. त्यानंतर त्यांचे कपडेही स्टा ॅयलिशच असतात. कपड्यांचा विचार केल्यास कधी कधी शाळा आहे असा विसर पडतो त्यांना. ते हापपँटवरुन पँटवर येतात. कधी कधी रंगीबेरंगी कपडे घालून येतात. पायातही ड्रेसकोडचा बूट वा साधी चप्पल घालण्याऐवजी स्टा ॅयलिश बूट तोही वेगवेगळया स्वरुपाचा घालत असतात. यातही समजा शाळेत शिक्षक रागावतात. म्हणून ही मुलं शाळा सुटल्यावर शाळेच्या बाहेर जावून शाळेचा ड्रेस उतरवून रंगीत कपडे परिधान करतात. त्यावेळी त्यांचा उद्देश असतो शाळेतील मुलींना आकर्षीत करणे.

शाळेतील अशी मुलं........या मुलांना वेळीच सावध केलं नाही तर ही मुलं अल्प व परिपक्व न झालेल्या अवस्थेला समजून न घेता त्याच काळात पळून जातात अगदीच शिकायच्या व उमेदीच्या वयात. तसं पळून जातांना ते मायबापांनाही सांगत नाहीत. असं पळून गेल्यावर ते संसारात पडतात. परंतू असं संसारात पडल्यावर जसजसे दिवसं जातात ना. तसतसा त्यांना बारा आण्याचा भाव समजतो व प्रसंगी तो भाव समजल्यावर अशी मुलं अशा संसारचक्रातून विभक्त होतात नव्हे तर व्हायला पाहतात. यामध्ये मुलं सुटतात. कारण त्यांना मूल वेठीस धरत नाही वा मुलांची पाहिजे त्या प्रमाणात जबाबदारी नसते. त्यामुळं त्यांचं काहीच नुकसान होत नाही. परंतू मुलीचं अतोनात नुकसान होत असतं. त्या मुली अशा पळून गेल्यावर आणि संसारात रमल्यावर गरोदर होतात. मुलांना जन्म देतात. त्यानंतर मुलांच्या संगोपनाची त्यांच्यावर जबाबदारी असते. त्यांना असलेली ती मुलं त्या टाकून जावू शकत नाहीत. मग आत्महत्येचे विचार येतात. परंतू तेही करता येत नाही. कारण मुलांची जबाबदारी. काही आत्महत्या करतात. मुलांना मारुन. काही आत्महत्या करतात मुलं नसतांना. कारण त्यावेळी त्यांना आधार द्यायला कोणीही नसतात. मायबाप तर नाहीच नाही.

शाळेत शिस्त असावी. शाळेत शिस्त नसेल तर बरीच मुलं बिघडू शकतात यात शंका नाही. तसेच ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट की ज्याअंशी

शाळेत शिस्त असते. तेथील मुलंही बिघडत असतात. मग जिथं शिस्त नसेल, तेथील मुलं किती बिघडतील.

महत्वाचं सांगायचं म्हणजे शाळेत शिस्त असावी. शिस्त असल्याशिवाय शाळा व्यवस्थीत चालत नाही आणि शाळा व्यवस्थीत चालविल्याशिवाय शिस्तही लागत नाही. ह्या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याचे दोन भाग आहेत. म्हणून शिस्त लावणे महत्वाचे व शाळेची शिस्त ही राखायलाच हवी. त्याशिवाय मुलांमध्ये संस्काराचं बीजारोपण करता येणार नाही. विद्यार्थ्यांत संस्कार फुलवता येणार नाही. तसेच त्याशिवाय अल्प काळात मुलांच्या पळून जाण्यावरही बंदी घालता येणार नाही आणि त्यांच्या आत्महत्याही थांबवता येणार नाही. खरं तर आपण अशी शिस्त प्रत्येक शाळेत ठेवणं गरजेचं आहे. त्याशिवाय शाळेला शाळा असं नामाभिमान देता येणार नाही. हे तेवढंच खरं.

राधेची मुलं सुधारली नाहीत. कारण आता वेळ निघून गेली होती. ती मोठी झाली होती आपल्या आईला व्याभीचारी समजत समजत. मुलगा तर सर्रासपणे आईसमोरच मुली फिरवीत होता आणि मुलीनं तर आपलं जीवनच उध्वस्त केलं होतं अगदी अल्प वयात. तिनं अगदी अल्प वयात पळून जावून विवाह केला होता. मुलगाही अगदीच अल्प वयात नशेच्या आहारी गेला होता.

********************************

राधाची ती बिघडलेली मुलं. राधाची ती बिघडलेली मुलं. राधा एक शिक्षीका. संस्कार करणारी महिला. परंतू त्या राधेनं कामासाठी मदत घेतल्यानं व तसे मनमोकळेपणानं वागण्यानं कुसंस्कार फुलले होते तिच्या बाळात. त्यात तिचा दोष नव्हता तर तिच्या प्रारब्धाचा दोष होता. तिनं व्याभीचार केलाही नव्हता. परंतू तिच्यावर तसा दोष लादून ते लांच्छन जाणूनबुजून लावलं गेलं तिच्यावर. ती पुरुषांशी मदत घेणं तिची मजबूरी होती. तिला पती नव्हता. एक पती मरण पावल्यावर दुसरा केला. परंतू तोही काही फार काळ टिकला नाही. त्यानंतर तिनं तिसरा पती त्याच शंकेनं केला नाही तर तो पती न करता ती आपली कामं करीत राहिली. जी कामं केवळ एकट्या स्रीजातीनं करणं अवघड होती. राहिली इतर माणसांकडून कामं करुन घेण्याची शंका. मुलं समजायची की आई अशी पुरुषांचीच मदत का घेत असेल कामासाठी. स्त्रियांची मदत का घेत नसेल. परंतू ती लहान होती. त्यांना त्या गोष्टी कळत नव्हत्या. पुरुषांची कामं पुरुषच करु शकतात. स्री नाही हे लहानग्या वयात त्यांना माहीत नव्हतं. त्यामुळंच जे कृत्य तिची मुलं

पाहात होती नव्हे तर त्यापासून नवा बोध घेत होती. त्यांनी त्या तिच्या वागण्याच्या कृत्यापासून सुधारण्याऐवजी ती बिघडली होती.

आज ती मुलं बिघडत चालली नव्हती तर बिघडलीच होती. त्यातच आज तिला पश्चाताप वाटत होता नव्हे तर ती त्या प्रारब्धावर रडत होती. आज ती पश्चाताप करीत होती. परंतू आज तिला पश्चाताप करुन काही उपयोग नव्हता. ती मुलं. त्या मुलांचं नाव गोविंद आणि विणा होतं.

विणानं आपल्या आईचं पाहून अगदीच अल्प वयात केलेला विवाह. त्यातच काही दिवस बरे गेले. परंतू काही दिवस जाताच विणाच्या पतीनं तिच्यावर अत्याचार करणं सुरु केलं. तो घरात वेगवेगळी माणसं आणत असे.

ती माणसं.......ती माणसं काही चांगल्या स्वभावाची नव्हती. ती माणसं सुरुवातीस चांगली वाटत होती. परंतू काही दिवसानं त्यांचा रंग दिसला. ती माणसं दारु प्यायची व त्यालाही पाजायची. तो मात्र तिला त्या माणसांसमोर राबवायचा. पाणी आणायला लावायचा. नाश्ता द्यायला लावायचा. त्याचा भयंकर राग यायचा तिला. तशी ती माणसं गेली की ती त्याला जेव्हा असं करु नये म्हणून समजंवायची. तेव्हा तो भयंकर मारायचा. कुठेही मारायचा आणि ती त्याचा मार सहन करायची.

राधा चांगली होती. चांगल्या स्वभावाची होती. तिनं दोन पती केले होते. त्यानंतर मदतही घेतली परपुरुषांची आपल्या दैनंदिन कामासाठी. परंतू तिनं त्यांचेसोबत व्याभीचार केला नाही. एखाद्या सती सावित्रीसारखी वागली ती. मग तिची मुलं, तिच्यावर कोणतीही शंका घेवो. त्यानंतर तिच्या मुलांना शंका आल्यावर व ती वात्रटसारखी वागायला लागल्यावर तिनं आपल्या मुलांना एक दिवस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतू मुलांनी तिचं काहीएक ऐकून घेतलं नाही व समजावूनही घेतलं नाही.

विणाला मुळात सुख नव्हतंच. तिच्या प्रेमाचा पती हा कामालाही जात नव्हता. अशातच तिला एक पुत्ररत्न प्राप्त झालं होतं. ती मुलगी होती. त्या पुत्रीचीही आबाळ होत होती. विणा कामालाही निघाली असती. परंतू तिचं ते मूल लहान होतं.

घरची उपासमार व त्या परीवाराची होत असलेली आबाळ पाहून दारुच्या व नशेच्या आहारी गेलेल्या तिच्या पतीनं एक दिवस आपल्या मित्राकडून दारु पिवून व पैसे घेवून तिच्या कम-यात पाठवलं. तसं तिच्या ते लक्षात आलं व तिनं त्या मित्राचा प्रतिकार केला व त्याच्या त्या मित्राला कम-याच्या बाहेर काढलं. ती गोष्ट लक्षात येताच व त्याला आपल्या पतीनं पाठवल्याचं लक्षात येताच ती चिडली. तिला तिचा भूतकाळ आठवला. तिची आई सांगत असलेल्या सा-या गोष्टी आठवल्या. त्यातच आपल्या

आईनं आपल्या दारुड्या बापाला का सोडलं असावं तेही लक्षात आलं. तेच संस्कार होते तिच्या आईनं तिला सांगीतलेले आणि हेही लक्षात आलं की आपण उगाचंच आपल्या आईला दुषणं दिलीत. आई आईच असते असं जाणवलं. आपण भविष्यात फार मोठी चुक केली तेही लक्षात आलं. मग पश्चातापाचा सूर गवसला. त्यातच तिला रडूही कोसळलं. आता तिला वाटायला लागलं की आपल्या आईला भेटावं. तिची माफी मागावी.

तो दिवस.....तिनं त्या दिवशी तिच्या पतीनं तिच्या कम-यात पाठवलेल्या तिच्या पतीच्या वात्रट वागण्याचा प्रतिकार केला. परंतू त्यानंतर ते प्रकरण विरले नाही. दुस-या दिवशी सायंकाळीही पुन्हा तेच घडलं. यावेळेस मात्र तिला प्रतिकार करता आला नाही व ती आता तिच्याच पतीमुळं पाशवी अत्याचाराची शिकार बनली.

ती पश्चाताप करीत होती. तिला आईच्या घरी जावंसं वाटत होतं. परंतू कसं जाणार. कोणत्या तोंडानं जाणार. आपली आई काय म्हणणार. आपण तर पळून आलोय.

तिला तिचाच विचार येत होता. काय करावं सुचत नव्हतं. आता तर रोजच अत्याचार होत होता. सहन न होणारा. जीवन जगणं असह्य झालं होतं. जणू त्यानं तिला वेश्याच बनवून ठेवलं होतं.

ती त्या पतीच्या जोखडातून बाहेर पडू पाहात होती. परंतू तिला तसं बाहेरही आता पडता येत नव्हतं. हा आईचे न ऐकल्याचा परिणाम होता. ज्या आईवर तिनं लांच्छन लावलं होतं. त्या आईचं पाप लागल्यागत घडत होतं.

आई महान असते. प्रत्येकाची आई महान, तेवढीच महत्वाची असते. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. आई म्हटलं तर आई या शब्दातच महान अर्थ दडलेला आहे. आ म्हणजे आधार देणारी व ई म्हणजे ईमानदारी शिकविणारी.

आ चा अर्थ आधार देणे असा लावल्यास खरंच आई आधार देते का? असा प्रश्न पडतो. त्याचं उत्तर होय असंच आहे. आई ही आपल्या बाळाला बापापेक्षा जास्त प्रमाणात आधार देत असते. ती सर्वप्रथम आपल्या बाळाला स्वगर्भात नऊ महिने ठेवते. अन्न पाणी पुरवते. त्याचं नवही महिने संरक्षण करते. त्याला त्रास होवू देत नाही. चांगलं संगोपन करते. त्यानंतर ते बाळ जेव्हा गर्भातून बाहेर पडतं. तेव्हा मात्र तिच आई उन्हातून सावलीत नेल्यागत त्याचं गर्भाबाहेरही संगोपन करते. अगदी त्याचा विवाह होईपर्यंत. एवढंच नाही तर विवाह झाल्यानंतरही ती जेव्हापर्यंत आपले डोळे मिटत नाही. तेव्हापर्यंत आपली आई आपल्याला सांभाळून घेत असते. मग आपल्या कितीही मोठ्या चुका असल्या तरी आपली आई त्या पदरात घेवून

आपल्याला माफ करते. हा झाला आधाराचा विषय. आता ई चा विषय. ई या विषयानुसार प्रत्येकच आई ही प्रत्येकाला ईमानदारी शिकवीत असते नव्हे ती ईमानदारीने जगायला लावते.

आपण कितवंही तिचं मुल असलो तरी ती आपल्याला वाढवितांना भेदभाव करीत नाही. ती सर्वांनाच प्रेमानं वाढवते आणि आपली आई जेव्हा जन्म देते ना. तेव्हा तिच्या मनात राग नसतोच आपल्या जन्माबद्दल. आपण तिचं कितवंही मुल असलो तरी. प्रचंड आनंद असतो. त्या आनंदासाठीच ती अतिशय वेदना सहन करते प्रसववेळी आणि आपल्याला जन्म देत असते.

आई आपल्याला आधार देते एखाद्या वृक्षाच्या बुंध्यासारखी. बदल्यात आपण तिला काय देतो. आपण तिला राग द्वेषाची शिकार बनवतो. आपण तरुण झालो की आपल्या वागण्यात प्रचंड चीड निर्माण होते. वाटतं की आपल्या आईनं आपल्याला जन्माला घालून फार मोठी चूक केली. अशावेळेला आपल्या घरात आलेली व जिची ओळख नव्हती, ती मुलगी आपल्याला सर्वस्व वाटायला लागते. मग तिनं जर म्हटलं की तुमची आई जास्त वटवट करते, तिला वृद्धाश्रमात टाकतो नव्हे तर आपण आपल्याच आईला तिचे सर्व उपकार विसरून वृद्धाश्रमात टाकायला तयार होतो. ही आपली वास्तविकता होय. आपण मानावं की आपली पत्नी

आपले सर्वस्व आहे. आपल्या आईनंतर तिच जगण्याचं साधन आहे. आपल्याला जीवनात जगण्यासाठी व आपल्या जीवनात विरंगुळा आणण्यासाठी आपली पत्नी आपली माता बनून आपल्या जीवनात बहार आणत असते. याचा अर्थ असा नाही की आपण आपल्या आईला आपल्या पत्नीच्या म्हणण्यानुसार वृद्धाश्रमात टाकावे. आपण आपल्या पत्नीच्या म्हणण्यानुसार तिला वृद्धाश्रमात टाकूच नये.

आपली आई ही आपली आई असते. इतरांच्या मातेला कितीही आपण आई म्हटलं आणि कितीही तिच्यावर प्रेम केलं तरी ती आपली आई होवूच शकत नाही. ती कधी ना कधी रंग दाखवतेच. कधी एखाद्या वेळी महाभयंकर संकट आपल्यावर आलं की आपल्या आईला जेवढे दुःख होईल, तेवढे दुःख मानलेल्या आईला होणार नाही. तसंच कोणालाही कोणतीही आई विकत मिळूच शकत नाही. सर्वकाही मिळू शकेल.

आपल्या आईला ईमानदारी आवडते. तसंच कोणत्याही आईला तिचा मुलगा चोर वा गुंडा बनावा असं वाटत नाही. तिचा मुलगा जर असा गुंडा वा चोर बनला तर तिला भयंकर राग येतो. तसंच जर तिचा मुलगा चोर वा गुंडा बनलाच तर तिला जे दुःख होतं. ते दुःख ती विषद करु शकत नाही वा तिला ते दुःख व्यक्त करता येत नाही. याचाच अर्थ असा की आपल्या ब-यावाईट वागण्यावर आपल्या आईचं दुःख वा सुख अवलंबून असतं. मग

असं जर आहे तर तिला आपण दुःख का द्यावं? तिचे उपचार असतात आपल्यावर. मग तिला वृद्धाश्रमात का टाकावं? आपल्याला आई जर आवडते, मग आपण गुंड वा चोर का बनावं?

आपली आई आपल्याला जगवते. मग ती प्रसंगी आपल्याला जगविण्यासाठी कोणतंही काम करते. याचा अर्थ असा नाही की ती व्याभीचार करते. ती आपल्याला चोर, बदमाश बनवते? ती आपल्याला योग्य वळण लावत नाही. ती आपल्याला जगविण्यासाठी प्रसंगी चोर, बदमाश बनूही शकते कदाचीत. परंतू ती आपल्याला चोर, बदमाश बनायला शिकवीत नाही. असे असतांना आपण तिच्यापासून चांगला बोध घ्यावा. आपल्या स्वतःत संस्काराचं बीजारोपण करावं. आपल्या आईच्या इच्छा पुर्ण कराव्यात. ती आपल्याला आधार देते लहानपणापासूनच. आपल्यासाठीच कर्तव्य करते. मग आपणही तिच्या कर्तव्याचे देणे लागतो. आपण तिला त्रास देवू नये. तिला वृद्धाश्रमात टाकू नये. तिला वृद्धापकाळी आधार द्यावा. तिच्याकडून ईमानदारी शिकावी व आपलं स्वतःचं कल्याण करुन घ्यावं. हं, पत्नीची गोष्ट अवश्य मानावी. जी आईविरोधी नसेल. जर आपली पत्नी आपल्या आईच्या विरोधात गोष्ट करीत असेल तर त्या गोष्टी ऐकू नये. तिला समजावून सांगावे. यातच तुमचं भलं आहे. तसंच पत्नी बनणा-या महिलेनंही एक गोष्ट लक्षात घ्यावी. ती म्हणजे आपला पती जर

आपल्या आईबापाचा उद्धार करीत असेल तर ते ऐकू नये. कारण आपले मायबाप व आपल्या पतीचे मायबाप देवच असतात. त्या दोघांमिळून आपला संसार बनत असतो. तसेच आपला संसार फुलत असतो.

महत्वाचं सांगायचं म्हणजे आपली आई महान असते शिवरायांना घडविणारी. आईनंही तसंच सांगायला हवं की संपुर्ण हिंदवी स्वराज्य निर्माण होईल. याचा अर्थ असा की आईनंही बाळाच्याही कल्याणाचा विचार करावा. तसं ती करतेच. तसंच त्या बाळानंही तिचं जीवन उध्वस्त करण्याचा विचार करु नये.

आज आपल्याला घराघरात पाहायला मिळत असतं सासू सुनेचं भांडण. का होतं? कारण प्रत्येक जण स्वतःला थोर समजतं. सासूला वाटते की मी महान आहे. कारण मी जन्म दिला माझ्या मुलाला व मी लहानाचं मोठं केलं. मग मुलानं माझंच ऐकावं. परंतू मुलगा जेव्हा ऐकत नाही. तेव्हा भ्रमनिरास होतो, निराशा येते व भांडण होतं. कारण मुलगा घरात येणा-या नव्या नवरीचं म्हणजे पत्नीचं ऐकत असतो. तसंच पत्नीलाही वाटत असते की तिच्या पतीनं तिचंच ऐकावं. कारण ती त्याला सांभाळणार आहे शेवटपर्यंत. तिनं त्याला सर्वस्व बहाल केलं आहे. एखाद्या पुरस्कारासारखं. ते पती असलेला व्यक्ती जेव्हा ऐकत नाही. तेव्हाही भ्रमनिरास होते पत्नी. पदरी निराशाच येते. मग सूर निघतो. कशाला केलं लग्न? आपल्या

आईलाच ठेवायला हवं होतं. अशावेळेस भांडण होतं. ते भांडण विकोपाला जातं. त्यातूनच घटस्फोटाची प्रकरणं उभी राहतात, मुलगा जर आईचं ऐकत असेल तर. नाही तर आई वृद्धाश्रमात जाते मुलगा जर पत्नीचं ऐकत असेल तर. सर्व इगोचा प्रश्न. माझंच ऐका. मलाच मोठं स्थान द्या म्हणून भांडण. यात सासू आणि सून एकाच नाण्याच्या दोन बाजू. दोघांनीही एकमेकांशी जुळवून घ्यायला हवं. परंतू तसं होत नाही. म्हणून वाद येतो.

विशेष सांगायचं म्हणजे घरात येणा-या सुननं आपण मोठे असल्याचा आव आणू नये व त्यावरुन त्यानुसार भांडण करु नये. तिनं हे लक्षात घ्यावं की आपणही उद्या सासू बनू. तेव्हा परमेश्वर आपल्याकडून असाच बदला घेईल. कारण जशास तसं ही आजची पद्धत आहे. जी परमेशालाही आवडते. तो तसाच निकाल देतो याबाबत बरीच प्रकरणं घडली आहेत. आज इथंच करावं लागतं आणि इथंच भरावं लागतं. तसंच सासूनंही लक्षात घ्यावं की आपल्याला आता म्हातारपण येणार. आपले हालहाल होणार. त्यात आपली सूनच आपल्याला सांभाळणार. तेव्हा आपण जास्त वटवट करु नये. म्हातारपण चांगलं जायला हवं. असा जेव्हा विचार सर्वजण करतील. तेव्हाच सासू सुनाचे नातेपण टिकेल. वाद होणार नाहीत व आईपणालाही तेवढीच किंमत येईल. प्रत्येकाची आई महान असते आणि

तेवढीच महत्वाचीही. तसःच पत्नीही महान असते आणि तेवढीच महत्वाची हे तेवढंच खरं.

आई आई होती. तिच्या कर्तृत्वाचा पश्चाताप आता विणाला होत होता. परंतू आता पश्चाताप करुन काही उपयोग नव्हता.

विणा सारखी ती चिंतेत राहात असे. तिला सतत वाटत होतं की या जोखडातून निघावं. ती निघालीही असती. परंतू तिला एक लेकरु होतं. त्यामुळं तिला मर्यादा होत्या व बंधनही होतं. ती संधीचीच वाट पाहात होती. तशी एक दिवस तिला संधी चालून आली. त्या दिवशी तिचा पती घरी नव्हता. संधी मिळताच ती घराच्या बाहेर पडली. ती रस्त्यावर आली. त्याचबरोबर ती तो रस्ता चालू लागली.

तो भयाण रस्ता. त्या रस्त्यानं जातांना तिला काही सुचत नव्हतं. कुठं जावू तेही समजत नव्हतं. कारण ना त्या शहरात तिचे नातेवाईक होते ना कोणी ओळखत होतं तिला. ना तिच्या कोणी ओळखीचे. शिवाय भीती होती की जर आपण आपल्या पतीला दिसलो तर.......तर आपला पती आपल्याला घेवून जाणार व त्यानंतर आपण कधीच मरेपर्यंत त्याच्या जोखडातून बाहेर पडणार नाही.

भर उन्हाळ्याचे ते दिवस. विणा चालत होती ती वाट. तिला ते उन्हाचे चटके झोंबत होते. पायात चप्पलही नव्हती तिच्या. पाय भाजत होते. जवळ पैसाही नव्हता. त्यातच ती जीव मुठीत घेवून जिकडे पाय जातील, तिकडे चालत होती. तिचं काहीच ठरलं नव्हतं कुठे जायचं.

विणा चालत होती ती वाट. तसा तिला विचार आला. जायचं कुठं? आपले तर नातेवाईक नाही या शहरात ना कोणी ओळखत आपल्याला. ना कोणी ओळखीचे. काय करावं सुचत नव्हतं. कुठं जावं तेही सुचत नव्हतं. तसं कडेवरचं तिचं बाळ रडायला लागलं. त्याचबरोबर ती एका झाडाच्या सावलीत बसली. तिनं त्याला दूध पाजलं. परंतू ते बाळही दूध घेईना. कारण तिच्यात दूधच नव्हतं. दूध पाजण्याचं त्राण नव्हतं.

ती फार थकलेली होती. तिच्यात चालण्याचं त्राणही नव्हतं. ती फार चालली असल्यानं तिला फारच भूक लागली होती आणि तहानही. तसा ती विचार करीत होती. डोक्याला ताण देत होती. जावं कुठं?

क्षणात विचार करता करता तिला तिच्या आईचं घर आठवलं. आपण आपल्या आईच्या घरी जावं. परंतू विचार आला की आपण आपल्या आईच्या घरी जावं तरी कसं? आपली आई काय म्हणणार? आपण तर पळून आलोय? आपल्याला आपली आई येवू देईल काय? स्विकारेल का

आपल्याला? वैगेरे प्रश्न तिच्या मनात आले होते. तशी तिला भूक फारच लागली असल्यानं ती एका दुकानात गेली.

ते दुकान...... भूक फारच लागली असल्यानं तिनं त्या दुकानात खायचं मागायचं ठरवलं. तशी लाज फारच वाटत होती. परंतू तरीही त्या दुकानात तिनं काही खायला मागीतलं. तसं काखेत तिचं लहान बाळही होतं. तिनं खायला मागताच तो दुकानदार म्हणाला,

"निंग येथून. चांगली हट्टीकट्टी दिसतेस. अन् आली मागाले."

ते शब्द...... ते शब्द जहरासमान भासत होते. परंतू उपाय नव्हता. तिच्या पोटात कावळे ओरडत असल्यानं तिनं त्या दुकानदारासमोर हातच पसरलेले होते. तशी ती म्हणाली,

"बाबू, थोडसं दे खायला. लेकरु रडतंय."

ती एका शिक्षीकेची मुलगी. तिच्या घरी काही कमी नव्हतं. तरीही तिची ही अवस्था. ती विचार करण्यालायक गोष्ट होती. परंतू यात कोण सांगणार. तिथं संस्काराची कमी होती. विणानं दुकानदाराला गयावया केला. त्यातच तशी तिची केविलवाणी अवस्था पाहून दुकानदाराला तिची दया आली. तसं त्यानं तिला भाकरीचा तुकडा दिला.

तो भाकरीचा तुकडा. ती त्या भुकेपुढं तो तुकडा कमी पडला. ते चित्र तो दुकानदार पाहातच होता. तो स्वभावानं चांगला होता. तशी त्यानं तिची भूक पाहून आणखी तिला भाकर दिली व विचारलं,

"अगं, तू तं जवान हायेस. अशी भीक का मांगतेस?"

ते शब्द. तसं तिच्या डोळयातून अश्रू आलेत. तशी ती आपली कर्मकहाणी त्या दुकानदाराला सांगू लागली. त्यातच शेवटी ती म्हणाली,

"मी फार मोठी चूक केली. आता मला माझ्या आईची माफी मागाविशी वाटते. तिच्या घरीही जावंसं वाटते. परंतू भीती वाटते की आई काय म्हणणार."

"का? ती तुझीच आई आहे ना?"

"होय, ती माझीच आई. का बरं?"

"तुझीच आई ना. मग भीती कशाची? अगं, आई बाळाच्या सर्व चुका माफ करते. तिही मोठ्यात मोठी. तिलाच आई म्हणतात. तू जा आपल्या आईच्या घरी अगदी निःसंकोच होवून. सांग कुठं आहे तुझं घर?"

तिनं घराचा पत्ता सांगीतला. तसा तो म्हणाला,

"तुझं घर तर फार लांब. मी तुला एकटीला जावू देणार नाही. मला काहीही समज तू. घाबरु नकोस. मीच तुला पोहचवून देणार."

ती भुकेली होती. तशी घायाळही. त्यातच थकलेली. कोणावर विश्वास ठेवावा असं तिला वाटत होतं. तसं पाहता तिला भीतीही वाटत होती तिच्या पतीची. त्यापेक्षा या दुकानदारावर विश्वास ठेवलेला बरा. कारण आपण तरुण. दिवसा ठीक आहे. पण आपण रात्रीला कुठे जाणार? वैगेरे प्रश्न तिच्या मनात येत होते. तसा तिनं होकार दिला. त्यानंतर ती त्यावर काहीच बोलली नाही. तसं त्यानं तिचं जेवन होवू दिलं. त्यानंतर त्यानं तिला गाडीवर बसवलं व तो तिला घेवून तिच्या आईच्या घरी निघाला. थोड्याच वेळात घर आलं. तसे ते आत गेले.

विणानं आत प्रवेश करताच तिला तिची आई दिसली. तिची नजरेला नजर भिडली. तशी विणानं आपली नजर खाली केली होती. तशी आई म्हणाली,

"बाळ, ये. जवळ ये."

आईनं म्हटलेले शब्द. तशी तिची सून म्हणाली,

"घ्या आत. तोंड काळं करुन आल्यावरही."

आईनं त्या सुनेच्या तोंडचे शब्द ऐकले. परंतू ती शांत होती. तसे तिला ते शब्द रोजच ऐकावे लागायचे. आज प्रत्यक्ष ती पुढ्यात होती. त्यामुळं तर तिच्या सुनेला जास्तच ताव आला होता.

ते शब्द जसे तिच्या आईनं ऐकले. तसे ते शब्द त्या दुकानदारानंही. परंतू तोही गप्प होता. त्याला बरं वाटत नव्हतं. काही वेळ तो थांबला. तसा तो परत निघाला. परंतू जाता जाता म्हणाला,

"जर तिला काही आणखी समस्या आलीच तर तिनं त्याला सांगावं आणि विश्वास करावा. आपला समजावं व केव्हाही निःसंकोच यावं समस्येचं निराकरण करायला."

तिनं होकार दिला होता. तसा त्याचा पत्ता व फोन नंबर घेतला व त्याला रवाना केलं आणि ती तो गेल्यावर हुंदका देत आपल्या आईच्या खांद्यावर मान ठेवून रडू लागली.

************************

ते उन्हाळ्याचे दिवस होते. ती राधाची सून फारच बोलत होती तिला. त्यातच तिच्या मुलीलाही बोलत होती. त्यामुळं राधेला जगावंसं वाटत नव्हतं. परंतू मरावंसंही वाटत नव्हतं. आता तर तिची मुलगी जवळ आली होती. तिचा मुलगा निव्वळ दारुच पिवून झोपला राहायचा. त्याला कुटूंबाशी काही घेणंदेणं नव्हतं.

राधेची मजबूरी होती की ती तिथं राहात होती. राधा दुसरीकडं आपल्या पेन्शनच्या जोरावर राहायलाही गेली असती. परंतू तिला भीती होती की तिची सून कदाचीत तिच्या मुलाला मारुन टाकेल. एकतर मुलगी पळून कुठं गेली ते तिला माहीत नव्हतं आणि आता मुलगाही. त्यामुळं ती घाबरत होती त्या गोष्टीला. म्हणून ती नाईलाजानं आपल्या सुनेचे बोलणे सहन करीत होती. परंतू त्याला सोडून गेली नाही. तिला आता पेन्शन सुरु होती. तिची सून काही कामाला जात नव्हती. ना तिचा मुलगाही. सगळं कुटूंब तिच्याच पेन्शनवर अवलंबून होतं. तरीही तिला विनाकारणच्या गोष्टी ऐकाव्या लागत.

तिची मुलगी राहायला आली. तेव्हापासून ते तिच्या सुनेचे वात्रट बोलणे राधेसह तिच्या मुलीला म्हणजे विणालाही ऐकावे लागायचे. डोकं खराब व्हायचं. राहावंसं वाटायचं नव्हतं. कारण ते तिचं बोलणं व तिची टाँगटिंग ऐकण्यासारखी नसायची.

एक दिवस विणा व तिच्या भावजंचं कडाक्याचं भांडण झालं होतं. त्याच टाँगटिंगवरुन. तशी ती घरी नसतांना विणा आईला म्हणाली,

"आई, तू तुला तर पेन्शन आहे. तू कशाला राहते यांच्या जवळ?"

"कुठं राहू? "

"आपण वेगळे राहू. तुला तर पेन्शन आहे. तू

चांगली खावून पिवून तू मजेलायक राहू शकतेस. मला तिचं बोलणं सहन होत नाही."

आईनं ते बोलणं ऐकलं. तशी ती म्हणाली,

"नाही बाळ. जर मी याला सोडून गेलीच तर ही तुझी भावजंय तुझ्या भावाला मारुन टाकेल आणि दुसरा विवाह करुन मोकळी होईल. आपलं घरही जाईल आणि तुझा भाऊही."

"मग मीच जाणार तिला सोडून आणि तुलाही."

"कुठं जाणार? त्या नराधमाकडे. ज्यानं तुझा दररोजचा सौदा केला. विचारही केला नाही की तू त्याची पत्नी आहेस. अन् दुसरा विचार हाही नाही आला त्याला की त्याला एक मुलगी आहे."

"परंतू आई, मी तुझ्याकडे तरी केव्हापर्यंत राहू? ती लग्नानंतर कोणतीच मुलगी आपल्या आईकडे जास्त दिवस राहू शकत नाही ना."

"मग कुठे जाणार? "

"बघेन मी."

तिचं ते बोलणं. कुणाच्या तरी हिंमतीवर सुरु होतं.

"नेमकी कुठं जाणार? जरा कल्पना तर सांग. मागेही असंच केलं होतं तू आणि तो तसा निघालाय."

"हो ना आई. परंतू जुवा तर खेळावाच लागतो की नाही स्रीजातीला. तू नाही का खेळलाय जुवा. माझे वडील मरण पावल्यावर तू विवाह केला होता ना दुसरा. परंतू तो चांगला निघाला होता का? नाही ना. अगदी तसाच जुवा खेळणार मी. परंतू आता हुशारीनं खेळणार. त्यावेळेसारखी फसणार नाही मी आता. अन् तुझ्याकडं तरी केव्हापर्यंत राहणार. तू जीवंत राहशील तेव्हापर्यंत ना. तू मरण पावल्यावर राहू देतील का हे लोक आपल्याबरोबर. तेव्हा आपण आपला आधार शोधलेला बरा."

"लेकी आता मला खरं खरं सांग. तो राजबिंडा आहे तरी कोण?"

"आई, तोच तो. ज्यानं मला पहिल्यांदा इथं आणून दिलं. खरं तर त्याची ओळख नव्हतीच माझी. परंतू पहिल्या वेळेस त्यानं मी भुकेली असतांना मला जेवन तर चारलं. परंतू त्यानं मला आणून दिलं इमानदारीनं इथं. तो किती चांगला असेल."

"परंतू पहिल्या भेटीत असा विश्वास ठेवू नये."

"आई, माझी पहिलीच भेट नाही. मी बरेचदा भेटलो त्याला. त्याला पारखलं मी. आणखी काय सांगू. "

"पण बाळ कधी कधी आपले डोळे धोका देतात आपल्याला. म्हणून जरा सांभाळून."

"आई, सांभाळूनच आहे मी आणि पहिल्या वेळेसही अगदी सांभाळूनच होते. परंतू कोणीच काही नशीब धुवून पाहात नाहीत, तसंच माझ्या जीवनाचं झालं. तो मोठा आणाभाका टाकत होता. परंतू त्यानं मला फसवलं. मी फसले. परंतू आता अजून हा शेवटचा डाव खेळून पाहते."

"ठीक आहे. परंतू त्याला माझ्याकडे भेटावयास आणल्यावरच बरं का?"

"ठीक आहे." ती म्हणाली व तेथून ती निघून गेली.

तिचं प्रेम सुरु होतं जोरात. ती बोलत होती त्याचेशी. सुरुवातीस मनोरंजन म्हणून, तर नंतर करमत नव्हतं म्हणून. काही दिवस जाताच तिच्या बोलण्यातून तिचं आणि त्याचं प्रेम निर्माण झालं होतं. ती त्याला आपल्या घरची कहाणी सांगत असे.

तोच दुकानदार आज तिचा मित्र बनला होता. दोघांचंही चांगलंच पटत होतं. ते फिरायलाही जात होते एकमेकांसोबत.

तो दुकानदार. त्याचं नाव राज होतं. राज हा विणेच्या प्रेमात पडला होता. तिलाही तो आवडतच होता. त्यातच त्यानं तिच्या मनात प्रेमाचं भूत शिरवलं होतं. तिच्या मनात प्रेमाचं प्रेमअंकूर फुलवलं होतं.

आईला हेही प्रेम माहीत नव्हतं. परंतू यावेळेस तिला वाटत होतं की आपण हे प्रेम आपल्या आईला माहीत करावं. परंतू तिची हिंमत होत नव्हती. अशावेळेस आईच म्हणाली की तिचं जर त्याचेवर प्रेम असेल तर तिनं त्याला भेटायला बोलवावं. मग ती विचार करेल.

आईचं ते बोलणं. तसं तिनं त्याला फोन लावला. ती म्हणाली,

"माझ्या आईनं बोलावलंय भेटायला. येशील का?"

"होय, येईल." तिकडनं आवाज आला.

आईनं बोलावलंय. त्याच्या मनात विचार होता. तो आतून घाबरला होता. कदाचीत तिची आई त्याला झापणार तर नाही. तरीही हिंमत करुन तो राधेला भेटायला तयार झाला. राज तिच्या आईला भेटायला आला. त्याचा आदरसत्कार तिच्या आईनं चांगला केला व म्हटलं,

"महाशय, हिला एक मुलगीही आहे. तरीही तू विवाह करतोस? काय कारण आहे?"

"माझी एक आई आहे म्हातारी. तिची सेवा हा माझा परमधर्म आहे. मला तिची सेवा करायची आहे. मला वाटते की ही तिची सेवा करु शकेल."

"हे कशावरुन वाटते?"

"माझा विश्वास आहे आणि तुमच्या मुलीनं बरंच भोगलं आहे तुमचं न ऐकता. तिला पश्चाताप होतोय कधीकधी. मी पाहिलं आहे अनुभवलं आहे."

"परंतू तुम्हाला माहीत नाही की ती पळून गेली होती."

"त्याचा परिणाम दिसलाच तिला."

"मग आताच करेल कशावरुन?"

"संस्कार. तुमचे संस्कार."

"संस्कार? याचा अर्थ?"

"अहो, तुम्ही शिक्षीका आहात आणि एका शिक्षकाची मुलं कधी वाह्यात निघू शकतात याचा प्रश्नच उद्भवत नाही. तो शिक्षक घरीच नाही. बाहेर संस्कारच फुलवीत असतो यात शंका नाही."

"माझी दोन्ही मुलं वाईट कशी निघाली? कारण सांगाल का?"

"हे बघा, याचं कारण ऐका. जो शिंपी असतो, त्यांच्या कपड्यांना थिगळच असतं. जो चांभार असतो, त्यांच्या पायात चपला फाटल्याच

असतात. ज्यांचं मोठं भोजनालय असतं. तो कधीही शिळंच खात असतो. जो खाती असतो, त्याचं घर गळतच असतं सदैव. आपण शिक्षीका होत्या संस्कार देणा-या. मग आपल्या घरी संस्कार कसा दिसेल? दिसणारच नाही."

"तरीही माझी मुलगी मागतो म्हणता. एकीकडे शिक्षकांच्या मुलात संस्कार नाही राहात असंही समजता अन् दुसरीकडं संस्कार असतो असं मानता. हे कितपत बरोबर आहे."

"मी असं कुठं म्हटलं?"

"मग?"

"उदाहरण दिलं मी. तसं होतं असं नाही म्हटलं. होवू शकते असं म्हटलं. उदाहरणं दिली. परंतू एक सांगू?"

"सांगा."

"तसं पाहता ब-याच शिक्षकांच्या घरी संस्कार दिसतोच. आपणही संस्कारी असालच यात शंका नाही."

"मग माझी मुलं?"

"अं, तो एक अपवाद राहू शकतो."

"याचा अर्थ माझी मुलगी करेल तुमच्या आईची सेवा? असं वाटतंय तुम्हाला?"

"होय. नक्कीच करेल. मला वाटते."

"तुम्हाला तिच्या सर्व गोष्टी माहीत आहेत का?"

"होय."

"तरीही तुम्हाला तिच्याशी विवाह करायचा आहे?"

"होय. फक्त तुमचा आशिर्वाद हवा."

"तर ठीक आहे. तुम्ही जर तिचे सारेच प्रा ॅब्लेम सांभाळून घ्यायला तयार आहात तर मी तुम्हाला मुलगी द्यायला तयार आहे."

राजनं त्या गोष्टी ऐकल्या. तसा त्यानं पुनर्विवाहही केला. तिनंही त्याची सेवा केली. त्यावेळेस तिची मुलगी लहान होती. तिनं ती मुलगीही त्याच्याच नावावर शाळेत टाकली. त्यांचा सुखी संसार सुरु झाला होता.

******************************

विणाचा संसार व्यवस्थीत चालला होता. ती त्याच्या आईचीही सेवा करु लागली होती. परंतू तिच्या भावाचा संसार चांगला नव्हता. तो मात्र आजही दारुच्या नशेत राहायचा. ते पाहून राधा आजही पश्चातापच करीत

होती. त्यात संस्काराचा दोष नव्हता. दोष होता तिच्या प्रारब्धाचा. तिच्या प्रारब्धातच तसं लिहिलं होतं.

राधा म्हातारी झाली होती. तिनं आपल्या अख्ख्या जीवनात कुणाचं काही वाईट केलं नव्हतं. परंतू तिचं म्हातारपण तिला वेडावून टाकत होतं.

तिला वाटत होतं की ती निवृत्त झाल्यावर तिचे जीवन सुखात जाईल. परंतू तिचं जीवन सुखकारक नव्हतं. तिच्या पालोपावली काटे होते. जणू गुलाबाला असतात तसे. तिनं संस्कार पेरले होते आपल्या विद्यार्थ्यांत. परंतू तिचा मुलगा चांगल्या विचाराचा न निघाल्यानं तिची आबाळ होत होती.

तिची स्नुषा.......तिची स्नुषा तिला नाना त-हेची बोलणं बोलत होती. तिचे वाभाडे काढत होती. त्यामुळं वाटत होतं की आपण कुठंतरी त्याला सोडून निघून जावं.

एकदाचा तो दिवस. त्या दिवशी अशाच काहीतरी कारणानं तिचं आणि तिच्या स्नुषेचं भांडण झालं. तसं सुनंनं तिला म्हटलं की घरातून निघून जा. त्यातच तिला तिच्या मुलानं मारहाणही केली होती.

तो वैताग.......तो वैताग सहन करण्यासारखा नव्हता. फक्त दोनवेळच्या जेवणासाठी तिला ते सगळं सहन करावं लागत होतं. तसा त्या

दिवशी तिनं विचार केला व ठरवलं की आता काहीही झालं तरी आपण या मुलाकडं राहायचं नाही. आपण बाहेर पडायचं. रस्त्यावर राहायचं.

राधा घराच्या बाहेर पडली. ती रस्त्यावर आली. तसं तिनं ठरवलं की आपण या शहरात राहू नये. आपल्याला या शहरात ओळखतात.

राधाचा तो विचार. राधानं तसा विचार करताच तिनं शहर सोडलं. ती आता दुस-या शहरात रवाना झाली. तशी ती दुस-या शहरात जातात तिथं ती भिका-यासारखी रस्त्यावर राहू लागली.

राधा निघून गेली होती घरातून. तिचं जीवन दुःखदायी बनलं होतं. तसं पाहता राधा जरी आधीच्या काळात शिक्षीका असली तरी आज रस्त्यावर राहात होती. तसा तिला तो रस्ता खायला धावत होता. तसा एक दिवस उजळला. त्या देशानं निर्णय घेतला.

त्या देशानं विचार केला होता आणि निर्णय घेतला की आपण आपल्या देशातील भिक्षावृत्ती दूर करावी. तसा देशानं विचार करताच त्यांनी रस्त्यावरील भिकारी पकडणं सुरु केलं. त्याच भिका-यांमध्ये भरपूर लोकं सापडले होते. त्यात एक कलावंतही होता.

कलावंत........त्यानं आपल्या संपूर्ण जीवनात अगली उद्बोधन केलं होतं. तो शाहीर होता पट्टीचा. त्यालाही एक मुलगा होता. परंतू त्याचीही सून

चांगली नसल्यानं तिनं त्याला हाकलून दिलं होतं. तोही भीकच मागत होता रस्त्यावर. दुसरी एक महिला होती. तिची मोठी इमारत होती. तिचा मुलगा चांगल्या नोकरीवर होता. परंतू तो मुलगा नोकरीवर गेल्यावर तिची सून तिला भीक मागायला लावत असे. म्हणत असे की तिनं एका दिवशीच्या मजूरीचे पैसे भीकेतून गोळा करावे. त्या पैशाचा आकडाही दिला होता. तो आकडा होता तिनशे रुपये. तेवढे पैसे जर भीकेतून गोळा झाले नाही तर त्या म्हातारीला जेवनच मिळत नव्हतं. अशी तिची दुर्दशा.

काही भिकारी पत्नीच्या अत्याचाराचे शिकारी होते. एक भिकारी सरकारी नोकरी करणारा होता. परंतू पत्नीच्या अत्याचाराला कंटाळून त्यानं नोकरी सोडली होती व तो भिकारी बनला होता. आज त्या भिका-यात ती राधाही होती. जी पूर्वाश्रमीची शिक्षीका होती.

ते भिकारी. त्या भिका-यांना पकडताच सर्वांना त्यांच्या पुर्वाश्रमीचा इतिहास विचारण्यात आला. तो इतिहासच मुळात रक्तरंजीत हैता. सारेच भिकारी रडत रडत सांगत होते. कोणी शरमही बाळगत होते. तसा राधेचा नंबर आला.

राधाला सुरुवातीला सांगायला लाज वाटत होती. तसा एकजण अधिकारी म्हणाला,

"यामध्ये लाज कशाची? ही आपल्यावर घडलेली परिस्थीती. आपण थोडच घडवलं आपलं प्रारब्ध आणि सांगितल्यानंतर मन हलकं होतं म्हणतात."

त्यांनी म्हटलेले शब्द. त्यानुसार ती सांगू लागली आपल्या जीवनाच्या व्यथा.

"मी शिक्षीका. माझी दोन मुलं. मला दोन पतीही झाले. पहिला पती फारच छान होता. परंतू तो दैवात नव्हता व एका अपघात प्रसंगानं तो मरण पावला. त्यावेळी मुलं लहान होती.

मी कोणतंही वाकडं पाऊल उचललं नाही असं मला वाटतंय. परंतू माझं एक चुकलं. माझी मुलं लहान होती. त्या मुलांना आधार हवा. म्हणून मी दुसरा विवाह केला. परंतू तो विवाह मला नुकसानदायक ठरला.

मी विवाह केला खरा आधार म्हणून. परंतू तीच चूक झाली. घोडचूकच समजा. तो पती आधाराचा ठरला नाही. उलट त्यानं मलाच लुटलूट लुटलं. पक्का दारुडा होता तो. तोही नंतर मरण पावला. त्यानंतर मी एकाकी जीवन जगत आले.

मी मुलांवर संस्कार केले. त्यात काहीच कमी पडू दिलं नाही. परंतू माझी मुलं कशी बिघडली ते आजही कळलेलं नाही. मुलगा आहे. परंतू तो

दारुतच धुन राहतो. मुलगी आहे. तिही अल्प वयातच पळून गेली होती. परंतू जेव्हा तिथं जिवावरचा प्रसंग बेतला, तेव्हा परत आली होती ती. मागील वर्षीच तिचा दुसरा विवाह केला मी. मग मी मोकळी झाले. सून सारखी झगडतेय. मुलगा काहीच म्हणत नाही. म्हणून सोडलंय घर."

"घर सोडायचं मुख्य कारण?"

"त्या दिवशी कडाक्याचं भांडण झालं होतं. सून म्हणत होती घरातून निघून जा आणि मुलानं मारलं या म्हातारपणात मला व हात धरुन बाहेर काढलं. मग मी कशी राहू? मी निघाले बाहेर. रस्त्यावर आले मी व तुम्ही जेव्हा पकडलं मला. तेव्हा आले मी इथं."

त्या अधिका-यानं तिची कहाणी ऐकली. तो भावूक झाला होता. तसं पाहता ती सर्व भिकारी मंडळी. त्यात बरेचसे वृद्धच होते. कोणी कोणतं कारण सांगत होता. कोणी कोणतं. तशातच त्यांना अधिका-यानं विचारलं की जर त्यांना घरी सोडून दिलं तर, ते जातील का? त्यावर एकच सूर उमटला की त्यांना कुठेही पाठवा. हवं तर मोठ्यात मोठी शिक्षा द्या. परंतू ते पुन्हा काही परत आपल्या मुलांकडे जाणार नाही.

काही वेळ गेला. ते वृद्ध तसेच बसून होते. त्यानंतर त्यांच्याविषयी लिहून घेण्यात आलं. त्यानंतर त्यांची रवानगी एका आश्रमात करण्यात आली. जे वृद्धाश्रम होतं.

तो भिका-यांचा विशेष आश्रम होता नव्हे तर वृद्धाश्रमच. या आश्रमात त्यांना निव्वळ बसण्याचंच काम नव्हतं तर त्यांच्या मनानुसार त्यांना वेगवेगळया जिनसा बनवाव्या लागत. त्याचं विशेष प्रशिक्षण दिलं गेलं त्या सर्वांना. या आश्रमात सर्वांसोबत राधेचे दिवस अगदी आनंदात जात होते. या आश्रमात बनणा-या वस्तू या आकर्षक असत व या वस्तूंना परदेशात मोठी मागणी असायची. कारण त्या वस्तू सुबक असायच्या. त्या आश्रमातील सर्वांचे जीवन अगदी आनंदात जात होते. त्यासोबतच राधेचंही जीवन आनंदात जात होते. कुणालाच घरपरीवाराची आठवण येत नव्हती.

ते आश्रम खास त्या भिका-यांसाठीच बनविण्यात आलं होतं. तसं पाहता त्यांच्या सतत काम करण्यातून त्यांचं मनोरंजनही होत असे आणि दिवसाचा वेळ कसा निघून जातो हे कळतही नसे.

******************************

राधा घरातून निघून जाताच घराला घरपण राहिलेलं नव्हतं. तिचा मुलगा आधीपासूनच पीत असल्यानं घरात आधीच पैसा नव्हता. तसं पाहता राधेच्या पेन्शनवरच अख्ख्या घराची भिस्त होती. त्यातच राधा घरातून निघून गेल्यानं ती भिस्त खचली होती. दोन मुलं होती तिच्या मुलाला. त्या मुलांना अन्न, वस्त्र निवारा देणं गरजेचं होतं. त्यामुळंच कधी न कामाला जाणारी तिची सून कामावर जात होती. आता तिला सासूची आठवण येत होती. कारण सासू असेपर्यंत कधीच तिला कामावर जावे लागले नव्हते. परंतू आता उपाय नव्हता.

राधेचा मुलगा काहीच काम करीत नव्हता. त्यातच तो घरातील भांडे विकून टाकायचा दारुसाठी. त्यामुळं त्याची पत्नी चिंतेत राहायची. आता पुढे अशांशी संसार करुन काय उपयोग म्हणून तिही विभक्त होण्याच्या मार्गावर होती. परंतू बंधन होतं. बंधन म्हणजे तिची मुलं होती. ज्यांच्यासाठी बापाचाही आधार महत्वपुर्ण वाटत होता.

विणा आपल्या संसारात खुश होती. तिचा दुसरा पती चांगला होता. तो तिच्यावर जिवापाड प्रेम करायचा. तिही आपल्या सासूची नित्यनेमानं सेवा करायची. हे कार्य करता करता तिला वेळही मिळत नव्हता. त्यामुळेच ती आपल्या आईकडे आली नव्हती. काही दिवसानं तिची सासू

आजारपणानं मरण पावली व तिला मोकळीक मिळाली. तशी तिला एक दिवस तिच्या भावाची आठवण आली. तशी आईही आठवायला लागली.

आपली आई कशी असेल याची चिंता असलेली विणा लवकरच आपल्या पतीला घेवून आपल्या आईला भेटावयास आपल्या नंदकडे रवाना झाली.

ते नंदेचं घर. ननद काही घरी नव्हती. मुलं घरी होते. भाऊही घरी नव्हता आणि आई! आईचा भिंतीवर फोटो लावला होता.

आईचा भिंतीवर फोटो! याचा अर्थ आई मरण पावलेली असणार. परंतू आई जर मरण पावली तर या लोकांनी आपल्याला सांगीतलं का नसेल? तो प्रश्न संभ्रमात टाकणारा होता. तसा थोड्या वेळात तिचा भाऊ आला तोही दारु पिवून. त्याला होशच नव्हता बोलण्याचा. त्यानं बहिणीकड पाहिलं. तसं त्यानं म्हटलं.

"केव्हा आली?"

"मगाशीच."

"वहिणी कुठाय?"

"वहिणी कामाला गेलीच."

"अन् तू?"

"बोलायचं काम नाही. "

ते भावाचं बोलणं. वडील भाऊ. ती तरी कशी बोलणार. तशी सायंकाळ होतच आली होती. तशी तिची वहिणी घरी आली. तिनं हातपाय धुतले.

तिच्या वहिणीचं नाव मिरा होतं. मिरा आत आली. तसं तिनं विणाला पाहिलं. तशी ती म्हणाली,

"केव्हा आली विणाताई?"

"मगाशीच."

"कशा आहात?"

"ठीक आहे." विणाचं बोलणं. तशी विणा परत म्हणाली.

"आणि हा. हा सुधरलाच नाही म्हणावं. "

"हो ना विणाताई. आता सुधरवा आपल्या भावाला. मी तर सांगू सांगू थकले."

"हो का?"

"होय आणि एवढंच नाही, आजकाल हे महाशय घरची भांडीही विकायला लागलेय."

"मग मोठं विपरीत काम आहे तर. " विणा म्हणाली.

"मिरा वहिणी, एक विचारु. "

"विचारा. "

"आई दिसत नाही. कदाचीत गावाला तर गेली नाही कोणत्या?"

"हो गावालाच गेली. यांचं असं वागणं पाहून निघून गेली घरातून. रागात बोलले हे. घरातून निघून जा म्हणून. मग निघून गेल्या त्या. त्यानंतर मी सर्व ठिकाणी शोधलं. परंतू मला मामीजी कुठंच सापडल्या नाही."

"अरे, असं कसं झालं म्हणावं आणि ही गोष्ट आपण साधी मलाही सांगीतली नाही. माझ्यापासून सुद्धा लपवून ठेवली ही गोष्ट."

"यात तुमच्या भावाचा दोष. तुमच्याच भावाला विचारा."

विणा चूप बसली. तसा थोड्या वेळानं तिचा भाऊ उठला. त्याची दारु उतरली होती. त्यानं हातपाय धुतले. मग इकडल्या तिकडल्या गोष्टी केल्या. तशी त्याला संधी पाहून विणा म्हणाली,

"आई कुठाय?"

"मला काय माहीत?"

"म्हणजे?"

"घरातून निघून गेली. कुठं गेली मला काय माहीत?"

"परंतू साधं मला कळवायला हवं होतं, तेही कळवलं नाही?"

"तिला शोधण्याच्या चक्करमुळं विसरलो मी."

"अरे पण कधीतरी."

"आठवण नाही आली."

"कशी येणार. दारुमुळं वेळ तरी मिळतो का?" मधातच मिरा म्हणाली.

ती बोलत होती ते शब्द आणि तो निगरगट्ट ऐकत होता. तशी पाॅलिसी झोडत तिची वहिणी म्हणाली,

"विणाताई, आता जावू द्या. आता ती आहे की नाही जीवंत ते. झाली गोष्ट पार पडली. आता बोलून काय उपयोग. जावू द्या आता. दुस-या गोष्टी काढा."

मिरानं त्यावर पदडा टाकला. तशी तिचीच चूक. परंतू ती स्वतःची चूक कशी मानणार. तसं तिनं म्हणताच विणा चूप बसली.

तो दिवस तसा बोलण्यातच गेला आणि विचार करण्यातही. मात्र आपली आई कुठे असेल याचे विचार विणाला पदोपदी येत होते.

रात्रीला जेवणखावण पार पडलं. मिरानं कसातरी स्वयंपाक केला. तसं ते कुटूंब झोपी गेलं. परंतू विणाला काही बरोबर झोप आली नाही. तिला सारखा आईचाच प्रश्न पडला होता.

सकाळ झाली होती. तशी पाखरं किलबिलायला लागली होती. विणा झोपेतून जागी झाली होती.

ती उठली. तिनं लवकरच प्रातःविधी आटोपला व ती घरी जायला तयार झाली. कारणंही त्याचं तसंच होतं. तिच्या पतीचं दुकान होतं व दुकान जास्त काळ बंद ठेवता येत नव्हतं.

ती लवकरच भावाच्या घरुन रवाना झाली. ती गावी पोहोचली व पुन्हा आपल्या संसारात रमली. परंतू आता तिला सारखा आईचा प्रश्न सतावत होता. तसं पाहता तिच्या आईची तिला सारखी आठवण येत होती. त्यातच तिला आईचा शोध घ्यावा असं वाटत होतं.

*****************************

ती राधा त्या आश्रमात काम करीत होती. तिचे दिवस आनंदात जात होते. परंतू एक खंत होती. ती हाकलून लावणा-या मुलांची. तिला वाटत होतं की कोणत्याही मुलानं कोणत्याही आई वा वडीलाला वृद्धापकाळी हाकलून लावू नये. आपले प्रारब्ध चांगले होते की आपल्याला एका वर्षातच चांगले दिवस मिळाले. नाहीतर आपण आजही त्या रस्त्यावर

भीकच मागत राहिलो असतो आणि मरतांना प्रचंड वेदनांचा सामना करावा लागला असता आपल्याला.

वृद्धापकाळी कुणाला कोणतीही अडचण भासू नये यावर राधा सतत विचार करायची. सतत विचार करता करता तिला वाटायला लागलं की वृद्ध माणसंही सुखी व्हावीत. त्यांनाही कोणताच त्रास होवू नये. यासाठी कायद्यात प्रावधान आहे. परंतू त्यात विसंगती आहे. म्हणूनच आजची मुलं चक्कं हाकलून देतात आपल्या मायबापाला. आपण असं होवू देवू नये. काय करावं. तसा विचारांती तिला मार्ग सापडला. आपण मुकदमा दायर करायचा सरकारवर. त्या याचिकेत म्हणायचं की सरकारनं म्हाता-या मायबापांना पैसा द्यावा. वृद्धापकाळची पेन्शन म्हणून. ती तर सरकार देतेच. ज्यांचं कोणी नाही त्यांना आणि ज्यांची मुलं आहेत, परंतू कमाई कमी आहे त्यांनाही. परंतू आपली याचिका अशी असावी की जो कोणी मायबापाला वृद्धापकाळी हाकलून देईल. त्या मायबापाला सरकारनं पैसा न देता तो पैसा त्यांच्या मुलांकडून जबरदस्तीनं वसूल करावा. तशाच त्यांना सर्व प्रकारच्या सरकारी सुविधांपासून वंचीत करावे. तसं जर झालं तर जगातील सर्वच मुलं सुधारतील.

तिचं विचार करणं बरोबर होतं. कारण ते विचार तिच्या अंतर्मनातून आले होते. तिला वाटत होतं की अशा मुलांना शिक्षा मिळायलाच हव्यात की जे मायबापाची सेवाच करीत नाहीत.

सरकारी सुविधांच्या लाभापासून वंचीत मायबापांना करावं की त्यांच्या लेकरांना असा तिचा प्रश्न. हा प्रश्न अतिशय महत्त्वपूर्ण आणि जिव्हाळयाचा होता.

सरकारी सुविधा.......ह्या सरकारी सुविधा सर्वांनाच मिळत असतात. त्या सुविधा देतांना सरकार विचारच करीत नाही की लोकांचं काय चुकतं. काही सुविधा ह्या मताचे राजकारण करण्यासाठी दिल्या जातात.

सरकारी सुविधा मिळायला हव्या. परंतू कोणाला? ज्याला खरंच गरज आहे त्यांना की गरज नाही त्यांना. आज सर्वच जण, त्यांना गरज नसली तरी सरकारी सुविधांची गरज आहे असं भाषवतात व सरकारी सुविधांचा लाभ घेतात. नेमका गरजू कोण? जे अर्ज करतात ते की जे करीत नाही ते. यात जे अर्ज करतात झोनमध्ये जावून. ते गरजू नसतातच. खरे गरजवंत लोकं ओळखण्यासाठी त्या त्या व्यक्तीच्या घरापर्यंत जावे. म्हणजे लक्षात येईल की तो खरंच गरजू आहे की नाही. तसं पाहता आता सर्वच जण स्वतः गरजू समजून सरकारला अर्ज करीत आहेत.

सरकारनं ह्या सरकारी सुविधा त्या लोकांना द्यायला हव्या. जे अर्ज करीत नाहीत. त्यां सुविधा त्यांना त्यांच्या घरापर्यंत जावून व प्रत्यक्ष शहानिशा करुन द्यायला हव्यात. तसेच त्यांनाही द्यायला हव्यात की जी मुलं आपल्या मायबापाची सेवा करतात.

आज तसा विचार केल्यास मायबापाच्या सेवेची वानवा आहे. कोणीही मायबापाची सेवा करायला पाहात नाही. धजत नाहीत. त्यांना त्रास देत असतात पदोपदी. कोणी कोणी तर त्यांना हाकलूनही देत असतात. त्यातच काहीकाही महाभाग आपल्या मायबापांना वृद्धाश्रमातही टाकत असतात. यात गरीब आणि कमी शिकलेलीच मंडळी नाही तर ब-याच शिकलेल्या मंडळींचाही समावेश होतो. आज ज्या वयात म्हाता-या लोकांना नातवंडासोबत खेळावंसं वाटतं. त्या वयात ती मंडळी नातूसुखापासून वंचीत होतात.

म्हाता-यांनाही वाटतं की आम्हाला आमच्या सुनेच्या हातची चटणी रोटी मिळावी. परंतू ती सून जेव्हा घरात येते. तेव्हा सतत भांडणं होत असतात. अशातच त्यांची रवानगी जेव्हा वृद्धाश्रमात होते. तेव्हा ते वृद्धाश्रम त्यांना एका तुरुंगापेक्षा लहान वाटत नाही.

विशेष गोष्ट अशी की यामध्ये सरकार अशा वृद्धाश्रमात राहणा-या लोकांना पेन्शन म्हणून पैसा देतं. वृद्धाश्रमाला अनुदान देतं. कारण की अशा वृद्धांची व्यवस्थीत सोय व्हावी. बरोबर आहे सरकारचं. वृद्धाश्रमाला हातभार लागावा म्हणून ही सोय. परंतू हे अनुदान वा ही पेन्शन त्या वृद्ध लोकांसाठी ठीक आहे. ज्यांना या जगात कोणीच नाही. ही सुविधा त्या लोकांसाठी नसावी की ज्यांना मुलबाळं आहेत.

महत्वाचं सांगायचं म्हणजे ज्यांना मुलंबाळं आहेत व ज्यांनी आपलं कर्तव्य न करता आपल्या मायबापांना घरातून हाकलून दिले. त्यांच्या मुलांकडून अनुदानाचा हा पैसा व त्यांना देण्यात येणा-या पेन्शनचा पैसा जबरन वसूल करावा. तसंच त्यांना कोणत्याही सुविधांचा लाभही देवू नये. असे जर झाले तर उद्या कोणताच मुलगा वा मुलगी आपल्या मायबापांना वृद्धाश्रमात टाकणार नाही वा मायबाप प्रत्यक्षपणे वृद्धाश्रमात राहायला तयार होणार नाहीत.

आज वृद्धाश्रमाची कैफियत पाहता वृद्धाश्रमाची संख्या वाढत आहे. कारण त्या मुलांनी काहीही केले तरी त्यांना माहीत आहे की त्यांचं कोणीही काही बिघडवत नाही. त्यांनी मायबापांना वृद्धाश्रमात पाठवलं तरी त्यांना कोणीही काही म्हणू शकत नाही. सरकार तर नाहीच नाही. म्हणून ते पाठवतात आपल्या मायबापांना सर्रासपणे वृद्धाश्रमात. परंतू जर यामध्ये

ज्यां मुलांनी मायबापांना घरातून हाकलून दिले, त्या मुलांना मिळणा-या सरकारी सुविधा बंद झाल्या आणि त्या मायबापांना मुलांनी हाकलून दिल्यावर जर त्यांना मिळणारी पेन्शनही मुलांच्याच खिशातून वसूल केली गेली तर बरीच मुलं सुधरतील व कोणीही मायबापांना हाकलून देणार नाही. वृद्धाश्रमाचीही संख्या कमी होईल. परंतू सरकारही ते ऐकत नाही व अशा मुलांना देत असलेल्या सुविधाही बंद करीत नाही.

महत्वपुर्ण वस्तुस्थिती ही की मुलांना मायबाप जन्म देतात. उन्हातून सावलीत नेतात. मोठे करतात. ते मायबाप आपले कर्तव्य पुर्ण करतात. परंतू मुलं काय करतात. ते आपले कर्तव्य विसरुन आपल्या मायबापांना घरातून हाकलून देतात. ही वास्तवता आहे. म्हणजेच ज्या काळात मुलांनी मायबापांना आधार द्यायला हवा. त्या काळात मायबापांना आधार मिळत नाही. मुलं मी आणि माझी पत्नी व माझी मुलं असा उद्देश धरुन वागतात.

महत्वाचं सांगायचं म्हणजे आपल्या मायबापांनी आपल्याला वाढवलेलं असून जीवन जगण्यासाठी योग्य बनवलं आहे. तेव्हा आज म्हातारपणी मायबापांना आपल्या मदतीची गरज आहे. आपण त्यांचे काही देणे लागतो. त्यांनी तर आपले कर्तव्य केले काल. आज आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायचे आहे. सरकारी सुविधा मिळो की न मिळो. कारण आपल्याला त्यांनी लहानाचे मोठे करतेवेळी सरकारी सुविधा

पाहिल्या नाहीत. तेव्हा आपणही तसा विचार न करता आपल्या मायबापाची सेवा करावी. जेणेकरुन आपले मायबाप कृतार्थ होतील. जर अशी कृती आजचे पाल्य करणार नाहीत तर उद्या काळ बदलायला वेळ लागणार नाही. उद्या काळ बदलताच सरकारही तसे निर्णय घेतील. जे निर्णय प्रत्येक मुलांच्या नाकातूनच पाणी काढणारे असतील यात शंका नाही. कारण मायबाप देवापरसही मोठे आहेत. त्यांनीच आपल्याला देवधर्म आणि दानवधर्मही शिकवलेत. हे तेवढंच खरं आहे.

आज राधानं तक्रार दाखल केली होती न्यायालयात. तिचं म्हणणं होतं की मायबापांना मुलं पसंत करीत नसतील. त्यांचं पालनपोषण करीत नसतील तर त्या मुलांकडून त्यांच्या पालनपोषणाचा मुआवजा मिळावा. तोही मुलांच्या संपत्तीतूनच. ती केस चालत होती. खटल्याला पैसा लागत होता. तो पैसा ती ज्या वस्तू आश्रमात बनवीत होती. त्या वस्तू विक्रीतून काढत होती.

विणाही आपल्या आईला शोधत फिरत होती. तिला वाटत होतं की तिची आई जीवंतच असेल कुठंतरी. त्यामुळंच ती तिचा कसोशीनं शोध घेत होती. तसा एकदाचा तो दिवस उजळला.

तो एकदाचा दिवस. त्या दिवशी एक दानशूर व्यक्ती त्या ठिकाणी आश्रमात आला. त्यानं तो आश्रम चालविणा-या व्यक्तीची भेट घेतली. तसं त्यानं आपलं प्रयोजन सांगीतलं. सांगीतलं की तो काही वस्तू त्यांना दान देणार आहे. त्यामुळं त्याला त्या आश्रमातील लोकांच्या नावाची अनुक्रमणिका हवी.

त्या आश्रमातील लोकांनी त्या दानशूर व्यक्तीला अनुक्रमणिका दिली. त्यानुसार त्यानं ती अनुक्रमणिका वाचली. तसं त्याचं राधेच्या नावाकडं लक्ष गेलं. तसं त्याला नाव ऐकल्यासारखं वाटलं. परंतू त्याला ते नाव कुठं ऐकलं होतं. ते काही आठवत नव्हतं.

तो दानशूर व्यक्ती. त्या दानशूर व्यक्तीनं आश्रमात वाटायला काही फळं व वस्तू आणल्या होत्या. त्या वस्तू तो नावानुसार वाटत होता. तसं त्या दानशूर माणसाच्या समोर तिचा चेहरा आला व त्यानं तिला ओळखलं. ती शिक्षीका. ज्या शिक्षीकेनं त्याला शिकवलं होतं.

तो त्याचा चेहरा. तो चेहरा बदलला होता. तसा तो बदललेला चेहरा राधाला ओळखायला येत नव्हता. परंतू राधा त्याला ओळखू येत होती.

त्या दानशूर व्यक्तीनं तिला ओळखताच तो म्हणाला,

"मॅडम, मला ओळखलं का तुम्ही?"

त्यानं तिला म्हटलं व तशी ओळख दाखवली. त्यानंतर तिच्या चरणावर तो नतमस्तक झाला. त्यानं तिला ओळखलं व तो तो तिच्या चरणावर नतमस्तक झाला. तसं त्यानं विचारलं,

"मैडम, आपण इथं कसे? आपल्याला मुलबाळ नाही काय?"

"..........." ती चूप होती. तसा तो म्हणाला.

"मैडम, आपण गप्प का? आपण बोलत का नाही? "

तो बोलत होता. परंतू ती गप्प होती. ते पाहून तो म्हणाला,

"मैडम, आपली जागा वृद्धाश्रमात नाही. आम्हा विद्यार्थ्यांच्या शिरस्त्राणावर आहे. माहीत आहे. आपण शिकवलं, म्हणून आम्हाला हा पैसा आडका कमवता आला. आम्ही जर शिकलो नसतो तर हा पैसाही कुचकामाचा होता आणि महत्वाचं म्हणजे आपण आमच्यावर केलेले संस्कार महत्वपूर्ण आहेत. आपण आम्हाला जे संस्कार शिकवलेत. ते आमच्यासाठी कितीतरी मोठे महत्वाचे आहेत. जर आपण ते संस्कार आमच्यावर केले नसते तर आज जो माझ्याकडं पैसा आहे ना, मग तो पैसा टिकला नसता माझ्याकडं. आता आपणाला एकच विनंती आहे की आपली जागा या वृद्धाश्रमात नाही तर आजपासून ती आमच्या घरी

आहे. माझी विनंती आहे की आपण माझ्या घरी चालावं व फक्त बसूनच राहावं. मी आपणाला बसून पोषणार."

राधानं काय ओळखायचं ते ओळखलं. तशी ती बोलकी झाली. म्हणाली,

"नाही बाळ, तू बोलला तेच पुष्कळ झालं. अरे जिथं आभाळच फाटलं, तिथं थिगळाचं कोणतं काम? मी इथं सुखी आहे. बाळ उठ, उठ पायावरुन उठ."

"मी नाही उठणार. कारण मी तुम्हाला माझ्या घरी नेणारच आहे. तेव्हा आपण माझ्या घरी चालण्यासाठी होकार देईपर्यंत मी आपले पाय सोडणार नाही." तो व्यक्ती अगदी बालिशपणे म्हणत होता.

त्याचं नाव अविनाश होतं. अविनाश हुशार होता. त्याला गतकाळात बाईनं शिकवलं होतं. त्याची लहानपणी शिकायची इच्छा नव्हती. तो रडायचा. शाळेत यायचा नाही. परंतू बाई त्याचा लाड करायची. त्याला समजवायची. हळूच त्याचं आणि बाईचं गुरुशिष्याचं नातं तयार झालं व तो शिकला. हुशार झाला. सगळी बाईचीच कृपा. बाईनं त्याला घडविण्यासाठी घेतलेली मेहनत आज रंगात आली होती. आज बाईनं त्याचेवर संस्कार केले होते. तो संस्कारानं पुढं गेला होता व मोठा व्यक्ती बनला होता.

तिची मुळात इच्छा नव्हती त्याच्या घरी जाण्याची. परंतू तो मागेच लागला होता. तसं वृद्धाश्रम प्रशासन ते गुरुशिष्याचं प्रे◌ेम पाहातच होतं. तसं ते प्रशासन म्हणालं,

"राधा, जावून ये या मुलाच्या घरी चार आठ दिवस. तुझा विरं◌ंगुळाही होईल आणि तुला बरंही वाटेल. मग आहेच जीवनात शेवटपर्यंत वृद्धाश्रम."

राधेला ती गोष्ट पटली. तशी ती तयार झाली. त्याचेकडे जायला. तसं तिनं सांगीतलं वृद्धाश्रम प्रशासनाला की ती लवकरच परत येणार आणि त्यांचेमध्ये रमणार.

ते अविनाशचं घर. ते घर फार मोठं होतं. घरात नोकर चाकर होते. त्याचा विवाह झाला होता. त्याला पत्नी होती. तिही सालस आणि सुंदर होती. तसंच दोन मुलंही होती. तो फार श्रीमंत असावा असं वाटत होतं.

ते दोघंही जण गाडीतून गेले होते. हळूच गेट उघडलं व गाडी आत प्रवेशली. तशी त्यानं गाडी आत घेवून थांबवली. तसा त्यानं आधीच घरी फोन करुन सांगीतलं होतं की काय, ती त्याची पत्नी आणि ती मुलं आरती घेवून तयार होते. जणू आपल्यासोबत त्यानं दे◌ेवच आणला आहे व त्याची पुजा ती मंडळी करीत आहे असा भास होत होता.

राधा गाडीतून उतरली. तशी ती आतमध्ये गेली. तसं त्या परीवारात तिचंं स्वागतही केलं गेलं. अविनाश आणि त्याची पत्नीही चांगल्या स्वभावाची असल्यानं तिच्या आगमनानं त्यांच्या मनात आनंद दरवळत होता.

राधा त्या अविनाशकडे राहायला लागली. त्यानंतर ती तेथील वातावरणाशी रुळली. तो आणि त्याचे नोकर तिची चांगली काळजी घेत असत. तिला कशाचीही कमी पडू देत नसत. अविनाश एक मोठा सरकारी ऑफीसर होता. तो चांगल्या हुद्द्यावर होता.

*******************************

राधाची ती केस. तिनं सांगीतलं होतं अविनाशला खटल्याबद्दल. त्यावर त्यानं म्हटलं होतं की पैशाची तिनं काळजी करु नये. तिला जे करायचं, ती ते करु शकते. अगदी मनमोकळेपणानं तिनं राहावं.

ती खटला लढत होती. फैरीच्या फैरी झडत होत्या. तशातच तिची केस बोर्डावर आली व काही दिवसातच ती केस निकाली निघाली.

राधा केस जिंकली होती. सर्वत्र तिचं अभिनंदन होत होतं. कारण तो खटलाच त्या पद्धतीचा होता. न्यायालयानं निकाल दिला होता. न्यायाधीश महोदय म्हणाले,

'सर्व युक्तीवाद लक्षात घेवून न्यायालय या स्तराला पोहोचले आहे आणि निकाल देत आहे की ज्या गोष्टींची गरज आजपर्यंत वाटली नाही. ती गरज श्रीमती राधाच्या रुपानं न्यायालयाला दिसली. तसं पाहता आज काळ बदलला आहे. या बदलत्या काळानुसार सर्वच मुलं मी, माझी पत्नी आणि माझी मुलं असा संसार थाटतात. ते फक्त त्यात मायबापांना सहभागी करीत नाहीत हे या रुपानं न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. तसंच हेही निदर्शनास आले आहे की मायबाप मुलांना जन्मास घालतात. लहानाचे मोठे करतात. आपले कर्तव्य बजावतात. त्यानंतर ते थकतात. अशा थकत्या काळात त्यांना प्रचंड आधाराची गरज असते. असंच ते वय असतं. परंतू मुलं काय करतात. मुलं अशा वयात आधार देत नाहीत. ते बिनधास्त जगतात मायबापाविना. मायबापांना एकटेच ठेवून. कोणी विदेशात पळतात तर कोणी देशातल्या दूर अशा कोप-यात. ते मायबापाची सेवा तर करीत नाहीत. उलट ज्यावेळेस मायबाप मरतात व वस्तीतील काही संबंधीत माणसं त्यांना फोन करतात आणि सांगतात की तुमचे मायबाप मरण पावले. त्यावर त्यांचं उत्तर असतं की मयत निपटवून टाका. आम्ही चौदावीला येवू.

मग चौदावीही निघून जाते. परंतू कोणीही येत नाही. त्यानंतर त्या म्हाता-यांच्या मालमत्तेचा निकाल असतो. ती लिलावात निघते. तेव्हा त्याबद्दल वर्तमानपत्रात जाहिरात गुंजते. तेव्हा मात्र हीच मंडळी कागदपत्रासह तयार असते. ती गोष्ट त्यांना कशी माहीत होते, ते त्यांनाच माहीत. ही वास्तविकता आहे. त्या मुलांना मायबापाची सेवा करायला लाज वाटते आणि मालमत्ता मिळवायला लाज वाटत नाही.

आज अशीच परिस्थिती निर्माण होत आहे. झालीही आहे. मात्र न्यायालयाच्या ही परिस्थिती लक्षात आली आहे या खटल्याच्या रुपानं. मायबाप अशा वेळेस थकलेले असतात. त्यांना आधाराची गरज असते. वाटल्यास मुलांनी त्यांची सेवा करावी. ते त्यांचे कर्तव्य आहे. परंतू तसे घडत नाही. म्हणून न्यायालय या स्तरावर येवून पोहोचले आहे की प्रत्येक मुलानं आपल्या आईबापाची सेवा करावी. तसं जर कोणी करीत नसेल तर त्यांच्याकडून मायबापांना मोबदला म्हणून काही रक्कम द्यावी वा दरमहा महिना बांधून द्यावा. हा पैसा जबरन वसूल करण्याचा अधिकार न्यायालय स्वतःजवळ ठेवत आहे. त्याचबरोबर न्यायालय हा देखील निकाल देत आहे की जो मुलगा अशी सेवा करीत नसेल वृद्धापकाळी मायबापाची आणि त्यांना वृद्धाश्रमात पाठवत असेल तर त्यांच्या मालमत्तेवरील संपत्तीचा अधिकार नाकारत आहे. त्या संपत्तीवर वृद्धाश्रमाचा अधिकार

बसेल. तसंच न्यायालय हाही निकाल देत आहे की जो कोणी मुलगा मायबापांना घरातून हाकलून देत असेल, त्यांची संपुर्ण मालमत्ता ही त्यांची वृद्धापकाळात जो कोणी सेवा करेल, त्यालाच मिळेल. त्यावर त्यांच्या मुलांचा कोणताही अधिकार चालणार नाही. मात्र तसं सेवेचं प्रमाणपत्र सेवा कर्त्यानं न्यायालयात दाखल करावं. तसंच ज्याप्रमाणे आपण अनाथालयातील मुले दत्तक घेतो. तसेच प्रावधान म्हाता-या मंडळींना दत्तक घेण्याचे असेल. लोकं म्हाता-या मंडळींनाही दत्तक घेवू शकतील. वयोवृद्धांची संपत्तीही हस्तांतरीत करतांना काही नियम असतील. त्यांचं जर त्यांची मुलं करीत नसतील तर ती संपत्ती स्व मुलाव्यतिरीक्त ते कोणालाही हस्तांतरीत करु शकतात. हाच न्यायालयाचा सक्त आदेश आहे. That is truth and truth is end. as well as results is end.

न्यायालयानं निकाल दिला होता. तशी ती बाब एक जाहिरात बनली होती. तो निकाल दुस-या दिवशी वर्तमानपत्रात छापून आला. तो निकाल सर्वांनी वाचला. त्यातच तो निकाल तिच्या मुलीनंही. त्या निकालात स्पष्टपणे राधेचं नाव लिहिलं होतं आणि ती राहात असलेलं ठिकाणही. तसं तिनं ओळखलं. ही आईच असू शकते. कारण ती तडफडी आहे. विणानं तो निकाल वाचला. तशी ती त्या पत्त्यावर गेली.

राधाच्या याचिकेवर सुनावणी होवून लागलेला तो निकाल. त्यातच या याचिकेनुसार राधाला भेटायला व तिचा सत्कार करायला काही लोकांची गर्दी होती. कारण निकाल महत्वपुर्ण होता. काही लोकं मात्र त्या याचिकेवर शिव्याही देत होते.

काही लोकं तिला भेटायला येत होते. त्यात राधाची मुलगी विणाही होती. ती भेटायला आली. तिनं आईला ओळखलं. आईनंही तिला ओळखलं. तशी विणा बोलती झाली.

सुरुवातीलाच इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. त्यानंतर विणा मुख्य मुद्द्याकडे वळली. म्हणाली,

"आई, कशी आहेस?"

"ठीक आहे."

"मी बराच शोध घेतला तुझा. तू निघून गेल्याचे माहीत झाल्यावर."

"हो का."

"होय. परंतू तू गवसली नाहीस. "

"मग आताच."

"आई, आता मी तुला न्यायला आलो आहे. चल माझ्याबरोबर."

"नाही बाळ."

"का बरं?"

"मी इथेच सुखी आहे."

"अगं चल. मी मुलगी नाही का आणि यात माझा काय गुन्हा? तू चल ना माझ्याकडे."

"नाही बाळ, तुझा गुन्हा नाही. परंतू आता मी सुखी आहे ना इथं."

"चल ना गं आई, या पराया माणसाच्या घरी का राहतेस?"

पराया माणूस.....त्या मुलीनं म्हणतात तिच्या आईला विणाचा फारच राग आला. तशी ती म्हणाली,

"पराया माणूस. तू याला पराया माणूस म्हणते. तुला माहीत नाही याचं कर्तव्य. हा पराया का असेना, माझा मुलगा आहे. मुलगी? बेटा, स्व मुलापेक्षा पराया मुलगा मोठा असतो. स्व मुलगा मी पाहिला आहे तुझा भाऊ. तुझा भाऊ कसा आहे माहीत नाही का तुला? त्यानं मला सरळ हाकलून दिलं. आता मला कळतं की जर मी तुझ्याकडे राहायला आली तर उद्या तुही मला हाकलून देशील. पराया माणूस म्हणते. त्यापेक्षा मला इथंच राहिलेलं बरं. मी इथंही सुखीच आहे. कोणताच त्रास नाही मला. माझी सेवा करायला इथं बरेच लोक आहे. हा माझा मुलगा नाही. माझा विद्यार्थी आहे. परंतू त्याचेवर संस्कार आहेत माझे. म्हणूनच तो पोषतो. तुम्हाला माझी

मालमत्ता पाहिजे. मी नाही. परंतू या माझ्या विद्यार्थ्याला मी पाहिजे. माझी मालमत्ता नाही. मी नाही येत आता तुझ्याकडे. राहू दे सुखानं मला इथं."

विणानं आपल्या आईची भरपूर मनधरणी केली. परंतू तिची आई काही मानली नाही. त्यामुळं ती निघून गेली.

तीच बातमी. तीच बातमी जशी तिच्या मुलीनं वाचली. तशी तिच्या मुलानंही वाचली. त्याला वाटलं की आता आई न्यायालयाच्या कायद्यानुसार आपल्याला काहीच देणार नाही. त्यामुळं तो तिला भेटायला निघाला. त्यालाही वाटलं की आईची आपण मनधरणी करु. निदान आपली आई दया दाखवून आपल्याला आपल्या घरी राहू तरी देईल.

विणाप्रमाणे तिचा मुलगाही तिला भेटायला आला होता. तोही तिला घरी चाल म्हणत होता. तशी राधा म्हणाली,

"बेटा, तू मुलगा आहेस म्हणून तुला माफ करावं असं कोणत्या कायद्यात आहे. ज्यावेळी तू मला मारलं व तुझ्या पत्नीनं मला हाकलून लावलं. तेव्हा तुझा मेंदू कुठं गेला होता. तुझी सहानुभूती कुठू गेली होती. तू सहानुभूतीपूर्वक विचार तरी केला का? नाही ना. मी आता सुखात आहे. जा आता."

राधाचा मुलगा आला तसा निघून गेला. तशी भेटणा-यांची रिघही कमी झाली होती. त्यानंतर काही दिवस असेच गेले.

काही दिवसानंतर राधेला विचार आला की आपण आपल्या मुलाला असंच सोडून का द्यावं. आपला मुलगा का असेना. त्याला शिक्षा व्हायलाच हवी. तसाच त्याला धडाही शिकवायला हवा की त्याचेवरुन इतर कोणीही मुलं मायबापाची अवहेलना करणार नाहीत. तसंच त्याला धडाही शिकवता येईल. शिवाय सुधरवताही येईल.

तिचा मुलगा गरीब होता. परंतू तिला त्याची दया नव्हती. तिनं मुलाला स्वतः जन्म दिला. परंतू तरीही तिनं दया दाखवली नाही. फक्त नियमावर बोट ठेवला. नियमानुसार तिचा उद्देश होता की जर मी माझ्या मुलाला शिक्षा दिली तर उद्या त्यापासून बोध घेवून कोणीही आपल्या मुलांच्या भुलथापांना बळी पडणार नाही.

तिनं विचार केला आपल्या मुलावर खटला दाखल करायचा. कारण तिचं तिनं बांधकाम केलेलं घर होतं. ती तिची मालमत्ता होती. तिनं उभी केलेली. ते घर तिचा मुलगा वापरत होता. तिला वाटत होतं की ते घरही त्याला मिळायला नको. वाटल्यास ते घर ट्रस्टला दान द्यावं.

विचारांती तिनं ठरवलं की आपण खटला दाखल करावा. आज तिनं आपल्या मुलावर खटला दाखल केला. त्याबाबत तिनं नोटीस पाठवला व नोटीसमध्ये लिहिलं की ती त्या मुलाची आई असून तो पोषत नसल्यामुळेच ती दुर्बळ आहे. तसंच ती दुर्बळ असून तिला पैशाची गरज आहे. तेव्हा तिच्या मुलानं एक तर तिला पैसा द्यावा वा तिला तिची मालमत्ता परत करावी. जेणेकरुन ती मालमत्ता विकून ती पैसा उभा करु शकेल.

तिचा तो नोटीस. तो नोटीस प्राप्त होताच तिचा मुलगा पक्का घाबरला. त्यानंतर त्या मुलानं न्यायालयात शपथपत्र दाखल केलं. परंतू पैसा नव्हता त्याचेजवळ. म्हणून की काय, त्याला खटल्यात पराभवाचा सामना करावा लागला. त्यात न्यायालयानं निकाल दिला.

"सबब पुरावे साक्षीनिशी पडताळून पाहिले असता सदरची मालमत्ता ही श्रीमती राधाची आढळली आहे. न्यायालयीन कायद्यानुसार सदर व्यक्ती ही खटल्याशी संबंधीत व्यक्तीची आई असून त्या आईची सेवा तो मुलगा म्हातारपणी करीत नाहीत. त्याची आई आता वेगळी राहात असून तिला खर्चासाठी पैसा लागत आहे. त्यामुळं सबब पैसा सदर व्यक्तीनं आपल्या आईला मासीकवार द्यावा वा संपूर्ण रक्कम एकदम द्यावी. जर असा पैसा सदर संबंधीत व्यक्तीनं दिला नाही वा मासीकवार पैसा संबंधीत व्यक्ती

देण्याचं मंजूर करीत नाही तर संबंधीत मालमत्ता विक्रीला काढण्यात येईल. सबब बाबीसाठी पंधरा दिवसाची मुदत देण्यात येत आहे.

न्यायालयानं काढलेला आदेश. तो आदेश पाहता तिचा मुलगा चक्रावला. त्यानं विचार केला की आपण आपल्या आईची भेट घ्यावी. तिची गयावया करावी. कदाचीत तिला यातून दया येवून ती आपल्याला माफ करेल. नाहीतर आपण रस्त्यावर येवू. असा विचार करुन तिचा मुलगा तिला भेटायला आला. गयावया करु लागला. म्हणाला,

"आई, मी तुझा मुलगा ना. तुला कशी दया नाही. वाटल्यास मला माफ कर. मी तुझा गुन्हेगार आहे."

त्याचं ते बोलणं. तशी आई निर्भीडपणे म्हणाली,

"आता गयावया करुन काय उपयोग. आता गयावया करण्याची गरज नाही. काल जेव्हा मला तू हाकलून लावलं. मारलं पिटलं. तेव्हा कुठं गेली होती तुझी आईपणाची भावना. त्यावेळेस मेली होती का तुझी आईपणाची भावना. अन् आज जेव्हा तुझ्या ताब्यात असलेली मालमत्ता जात आहे. तेव्हा आई आठवते व्हयं आणि आता दिसत आहे स्वतःची गुन्हेगारी. आता माझं ऐक. तू आता कितीही चांगलं वागला, गोडगोड बोलला तरी मी तुला माफीनामा देणार नाही. मग तू रस्त्यावर का येईना."

ते आईचे बोल. तसा तो हिरमुसला होवून परत निघाला. वाटेत जातांना त्याच्या मनात बरेच विचार होते.

आज कोर्टाची तारीख होती. न्यायालयात गर्दी होती. कारण न्यायालयात आज वेगळ्याच विषयाची सुनावणी होती. आज त्या विषयानुसार ती सुनावणी ऐकायला बरेच लोकं उपस्थीत होते. अकरा वाजले होते. वकील मंडळी गोळा झाली होती. पक्षकार आपआपल्या आसनावर बसलेले होते. तसा संवाद सुरु झाला. न्यायाधीश महोदय, प्रतिपक्ष वकीलाला म्हणाले,

"आपल्याला जबाबात काही सांगायचे आहे का?"

त्यावर प्रतिपक्ष वकील म्हणाले,

"मा. महोदय, आम्हाला काही सांगायचं नसून एकच मुद्दा मांडतो. तो म्हणजे निकाल असा द्या की जो जगाच्या उपयोगी पडेल."

न्यायाधीशानं ते बोलणं ऐकलं. तसे न्यायाधीश महोदय बोलले.

"सर्व पुरावे ऐकून न्यायालयात या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात येत आहे. न्यायालयीन निकालानुसार हा निर्णय देण्यात येत आहे की गत पंधरा दिवसापूर्वी न्यायालयानं निर्देश दिला होता की पक्षकार ज्या पक्षाची आई आहे. त्या आईच्या खर्चासाठी मासीकवार पैसा द्यावा वा तो पैसा

एकदम द्यावा असं ठरवून यावं. जर तसं देणार नसेल तर मालमत्ता जप्त करण्यात येईल. आता सांगावं व शपथपत्र सादर करावं की आम्हाला ती रक्कम मासीकवार द्यायची की नाही द्यायची वा नेमकं काय करायचं. न्यायाधीश या गोष्टीसाठी आठ दिवसाची मुदत वाढ देत आहे. मात्र आता न्यायालय पुढील तारखेस तारखेसाठी मोहोलत देणार नाही."

न्यायालयानं आपला निर्णय सांगून पुन्हा तारीख दिली होती. तशी त्यांनी प्रतिपक्ष वकीलांना तंबी दिली.

सुनावणीची तारीख यायची होती. तसं प्रतिपक्ष वकीलानं न्यायालयाच्या तंबीनुसार शपथपत्र बनवलं. राधेचा मुलगा ठोस रक्कम देवू शकत नव्हता तिला वा मासीकवार रक्कमही देवू शकत नव्हता. त्यामुळं प्रतिपक्ष वकीलानं शपथपत्रात लिहून घेतलं की ती मालमत्ता त्याची आई जर विकत असेल तर तिला विकता येईल. परंतू त्याला मनोमन वाटत होतं की राधा ही त्याची आई असून तिला आपल्या मुलाची दया येईल. ती मालमत्ता विकणार नाही.

सुनावणीची आज पुन्हा तारीख होती. त्या तारखेवर दरवेळीप्रमाणे आजही गर्दी होती. न्यायालय उघडलं होतं. वकील जमले होते. सर्वजण आपापल्या जागेवर बसले होते. तसे न्यायाधीश महोदय आले. आसनावर

बसले. त्यांनी आपला चष्मा सवारला. त्यानंतर इकडंतिकडं पाहिलं. तसं प्रतिपक्ष वकीलाकडं पाहिलं. तसे ते बोलायला लागले.

"शपथपत्र दिलं का?"

"जी माय ऑनर."

प्रतिपक्ष वकीलानं तसं म्हणताच न्यायाधीश महोदयांनी ते शपथपत्र बाबूंकरवी मागीतलं. वाचलं. त्यानंतर बोलते झाले.

"न्यायालयीन प्रक्रियेनुसार न्यायालय या निर्णयावर पोहोचले आहे आणि मत मांडत आहे की पक्षकार वकीलाच्या म्हणण्यानुसार प्रतिपक्ष वकीलाचे पक्षकार हे पक्षकाराला मासीकवार पैसे द्यायला तयार नाही, तसं प्रतिज्ञापत्रात लिहिले आहे. तसंच कोणतीच रक्कमही भरायला तयार नाही असंही प्रतिज्ञापत्रात लिहिलं आहे. तेव्हा सदर पक्षकार ह्या आई जरी असल्या तरी प्रतिपक्ष पक्षकाराच्या ताब्यातील इमारत ही त्यांची स्वतःची असून ती विकण्याचा अधिकार त्यांना आहे. तेव्हा त्या मालमत्ता विक्रीची तारीख काढून सदर मालमत्ता पोलीस संरक्षणात विकण्याची परवानगी न्यायालय देत आहे. This is a court rule.

न्यायाधीश महोदयांनी आपलं बोलणं संपवलं होतं. तशी मालमत्ता विक्रीची तारीख आली. त्या दिवशी राधा व तिचा मुलगा जातीनं हजर

होता. तसं पाहता मालमत्तेची बोली लागत होती. चढीवर चढीचे डाव लागत होते. राधेच्या मुलाची लेकरं रडत होती. परंतू राधेला काही दया येत नव्हती. शेवटी मालमत्ता विकली गेली व ते सर्व रस्त्यावर आले.

राधेला पैसा मिळाला होता. तसा तो पैसा तिनं ट्रस्ट स्थापन करायला दिला. तिनं वृद्धाश्रम स्थापन केलं होतं. त्यानुसार त्यानंतर तिनं सांगीतलं की या ट्रस्टमध्ये दोन असे स्थान ठेवावे तसेच दोन कमरेही. एक कमरा माझ्या मुलाचा असेल व एक कमरा माझ्या मुलीचा. ही बाब कोणालाही सांगू नये. परंतू माझ्या मरणानंतर ही बाब घोषीत व्हावी व त्या कम-याच्या किल्ल्या त्यांना देण्यात याव्या व म्हणावं की ही तुमच्या आईचं तुम्हाला दिलेलं बक्षीस आहे.

निकाल लागला होता. तसा तो निकाल वर्तमानपत्रात येवून गेला. एका आईनं कोर्टातील न्यायानुसार आपल्या मुलाला मालमत्तेतून बेदखल केलं. असा मजकूर होता. नाव राधेचंच लिहिलं होतं.

दोन दिवस गेले होते. तशी विणानं ती बातमी इतर लोकांसारखी वाचली. तिनं आपल्या आईचंही नाव वाचलं. तशी ती त्या घरी आली. ती भावाला भेटावयास आली होती. परंतू त्या घराला कुलूप लागला होता. तसं तिनं आजुबाजूला चौकशी केली. त्यानुसार तिला कळलं की तिच्या आईनं

ते घर परवाच विकलेलं असून तिनं तिच्या भावालाही घरातून बाहेर काढलं आहे. तो भाऊ आता बाजूच्या फुटपाथवर बस्तान बांधून आहे. पुढं तो कुठं जाईल याची काही शाश्वती नाही.

दिलेल्या पत्त्यावर विणा ताबडतोब गेली. ती तिथं गेली असता तिनं पाहिलं की भाऊ आणि वहिणी त्या फुटपाथवर बस्तान मांडून आहेत भिकारी अवस्थेत. तिनं त्यांना पाहताच तिला रडू आलं. त्यानंतर ती जेव्हा आपल्या वहिणीला भेटली. तेव्हा तिच्या भावजंयकडून तिला माहीत झाली तिच्या आईची कर्मकहाणी. त्यावर तिला तिच्या आईचा भयंकर राग आला होता. परंतू ते तिच्या आईचं ते उचललेलं पाऊल होतं. ते पाऊल बरोबर होतं.

विणाला काहीही सुचलं नाही. तिनं आपल्या भावाला आपल्याबरोबर चालण्याची विनंती केली. सुरुवातीस त्यानं नकार दिला व नंतर त्याला जेव्हा त्याच्या इवल्या लेकराचा वास्ता दिला. तेव्हा तो तयार झाला.

विणानं आपल्या भावाला घरी नेलं. त्याला राहायला जागा दिली. तिनं त्याला आधार दिला. त्याला आपल्या वहिणीसमोरच समजवलं. त्यालाही चूक झाल्याची जाणीव झाली. तसा तो त्या दिवशीपासून सुधरला.

आता विणा व तिचा भाऊ एकत्र राहू लागले होते. आनंदात मजेनं राहात होते. अशातच एक दिवस त्यांना एक पत्र आलं. पत्र कोण्यातरी ट्रस्टचं होतं. पत्रात लिहिलं होतं. सदरील ट्रस्ट ही त्यांच्याच आईची असून त्या ट्रस्टमध्ये तिनं दोन स्थान व दोन कमरे ठेवलेले आहेत. तसं पाहता व्यवहार पाहून ती संपुर्णतः ट्रस्ट तिच्या मुलांचीच होईल. परंतू त्यासाठी निदान पाच वर्ष वाट पाहावी लागेल. सध्या ती ट्रस्ट तिच्या विद्यार्थ्यांच्या नावावर असून पाच वर्षानंतर ती तिची मुलं जर ट्रस्टची चांगली देखभाल कर्ती ठरली तर ती या मुलांच्या नावानं होईल यात काहीच शंका नाही.

त्या ट्रस्टचा मालक तिचा विद्यार्थी होता. त्यानंच तिचा मुलगा सुधरावा म्हणून त्यानं डाव रचला होता. जसे त्याचेवर संस्कार झाले व तो जसा घडला. तशी आपल्या शिक्षीकेचीही मुलं घडावीत म्हणून त्यानं जणू प्रयोग केला होता. त्यानंच तिचं घर विकत घेतलं होतं. ते घर घेवून सुरक्षीत ठेवलं होतं.

विणानं चिठ्ठीत मजकूर वाचला. तो तिनं आपल्या भावालाही सांगीतला. तशी तिनं त्या ट्रस्टची भेटही घेतली. भेटीदरम्यान कोणत्याच गोष्टीचा उलगडा झाला नाही. परंतू समजलं की त्यांची आई ही मरण पावलेली असून त्यांच्या आईनं मृत्यूपुर्वी ही वसीयत तयार केली आहेत मृत्यूनंतर ही वसीयत उघडायला लावली होती. ती उघडली गेली. त्यानुसार

आपल्या आईनं कदाचीत ही योजना आपल्याला सुधारायला बनवली असावी.

त्या दिवसापासूनच नाही तर मागे घडलेल्या प्रसंगापासून राधेची ती मुलं सुधरली होती. ती संपुर्णतः मन लावून त्या संपुर्ण ट्रष्टची जबाबदारी पेलवीत होती. आता त्यांना आईची आठवण येत होती.

पाच वर्ष झाले होते. विणा व तिच्या भावानं संपूर्ण जबाबदारी पेलवली होती वृद्धाश्रमाची. ती सेवा करीत होती त्या वृद्धांची. कारण त्यांना त्या वृद्धांमध्ये त्यांची आई दिसत असे.

पाच वर्ष झाले होते. असाच तो एक दिवस उजळला. वृद्धाश्रमात एकदा एक उत्साह पार पडला. त्या उत्सवात प्रमुख अतिथी म्हणून तो राधेचा विद्यार्थी अविनाश बोलत होता. बोलणं शेवटास आलं होतं. तसा तो म्हणाला,

"एक आई. एक आई स्वतः खटला दाखल करते संपूर्ण जगाला सुधारण्यासाठी. ती खटला जिंकते समाजातील संपूर्ण मुलांना सुधारण्यासाठी. त्यासाठीच कायद्यामध्ये तरतूदही करायला भाग पाडते. ती आई इतिहास घडवते. त्या आईची मुलं बिघडलेली असतात. तीच आई आपल्याही मुलांना सुधारण्यासाठी प्रयत्न करते. असा प्रयत्न करीत

असतांना ती स्वतःच मालमत्तेची केस भांडते. तिही केस जिंकते. त्यातच स्व मुलांना संपत्तीतून बेदखल करते. त्यानंतर मुलं सुधरतात. परंतू तेव्हा वेळ निघून गेलेली असते. खरं तर मला एवढंच सांगायचं आहे यातून की मुलं जर सुधरत नसतील तर त्या मुलांचे लाड करु नये. मग ती स्वतःची मुलं का असेना, त्यांना आपल्या मालमत्तेतूनच बेदखलच करावं. जेणेकरुन ती सुधारायला हवीत. आज त्याच माऊलीनं संस्कार देतांना रक्ताचं पाणी केलं. आज तिच्याच संस्कारानं मी आपल्यासमोर उभा आहे. आज ती आई जगात नाही. परंतू त्या आईनं जी दोन मुलं जन्माला घातली. ती मात्र जगात आहेत. त्या आईनं त्यांना शिक्षा देण्यासाठी त्यांना संपत्तीतून बेदखल केलं. परंतू ही योजना मीच बनवली होती. त्यांना सुधारण्याबाबत. त्यांची आई माझ्याचजवळ राहिली. त्यांच्या आईनं कोर्टाची केस जिंकली व तिनं आपली मालमत्ता विकली. परंतू ती मालमत्ता मी सांभाळून ठेवली. तिनं विकली आणि मी माझ्या मित्राला बोली लावायला लावून विकत घेवून सांभाळून ठेवली. आज त्या आईची मालमत्ता मी तिच्या मुलाच्या सुपूर्द करीत आहे आपल्या सर्वांच्या साक्षीनं. आज ती मुलं सुधारली याचा आनंद मला आहे.

त्यानं आपल्या नोकराला आवाज दिला. त्यानं कागदपत्र आणायला लावले. तसं त्यानं राधेच्या दोन्ही मुलाला म्हणजे विणा आणि तिच्या

भावाला बोलावलं. त्या कागदपत्रावर त्यांच्या सह्या घेतल्या सर्वांसमक्ष व साक्षीदार म्हणून आपली सही मारली. त्यानंतर ती कागदपत्र त्यांच्या स्वाधीन करत म्हटलं,

"आपली आई छान होती. संस्कारदायीनी होती."

विणा व तिच्या भावानं ती कागदपत्रं घेतली. त्यातील मजकूर तसा आधीच समजला होता. तिनं तिचं जुनं घर विकलं होतं. परंतू ते आईचेच संस्कार होते की त्या संस्कारानंच ते घर सांभाळून ठेवलं होतं.

तो कार्यक्रम संपला होता. तशी ती मुलं आपल्या स्वतःच्या जुन्या घरात गेली. ज्या घरात ती लहानाची मोठी झाली होती. ती आता गदगद झाली होती.

ती मुलं........ती मुलं आपल्या मुलांवर संस्कार फुलवीत होती. ती त्यांच्याच आईची प्रेरणा होती. तिनं आपल्या वागणूकीनं प्रेरणादायक इतिहास घडवला होता. असं बीज पेरलं होतं की ज्या बीजातून संस्काररुपी अंकूर बाहेर पडले होते. तिनं स्वतः उपासतापास शोषले होते. परंतू शाळेत संस्काररुपी बीजारोपण केले होते.

आज ती हयात नव्हती. परंतू ती आजही आठवत होती विणा आणि तिच्या भावाला. त्यातच आठवत होती अविनाशला.

अविनाश हा तिचा मुलगा नव्हता स्व पोटातून काढलेला. परंतू त्यानंच आपल्या आईसारखं सांभाळलं होतं तिला आणि भावासारखं सुधरवलं होतं विणा आणि गोविंदाला. आज त्यालाही राधेची आठवण येत होती. आजही तो आजही वृद्धाश्रमात जात होता. अन् आजही तो वृद्धाश्रमात वयोवृद्धांची सेवा करीत होता. त्याला त्यात विशेष असा आनंद येत होता. ती वृद्धाश्रमातील सेवा म्हणजे राधेने त्याचेवर केलेले संस्कार होते.

आज राधा जगात नव्हती. परंतू तिची दोन्ही मुलं जगात होती. त्यांचं घर त्यांना परत मिळालं होतं. त्यामुळंच त्यांच्या मनात आईबद्दल सहानुभूती निर्माण झाली होती.

राधेचा तो महाल. त्या महालात विणाचा भाऊ गोविंद आपल्या मुलासमवेत राहात होता. राधा मरण पावली तरी त्यांनं राधेच्या स्मृती जपल्या होत्या. त्यांनं त्या घराला नाव दिलं होतं राधा स्मृती. तसंच खाली आपलंही नाव टाकलं होतं गोविंदप्रसाद.

ते घर विणाचंही होतं. परंतू विणानं कधीच त्या घरावर दावा केला नाही. ती आपल्या पतीच्याच कमाईवर खुश होती. तिच्या पतीची कमाई चांगली होती.

ते वृद्धाश्रम जोरात सुरु होतं. त्याचा कारभार ते दोघंही पाहात होते. तसे दिवसामागून दिवसही जात होते.

आज गोविंदाची मुलं मोठी झाली होती. त्यांचा विवाहही झाला होता. तसे गोविंदा व त्याची पत्नी सोबत राहात होते. परंतू त्यांना त्यांच्या मुलांचा त्रास होता. ती मुलं सारखी त्यांना मारत होती व घरातून निघून जा देखील म्हणत होती. ते पाहून त्याच्या पत्नीला आपल्या सासूची म्हणजे राधाची आठवण येत होती. तसंच गोविंदाला आपल्या आईची. मुलं मारत असतांना त्यावर मी तुमच्यावर केस करील असं गोविंदा मुलांना म्हणत असे. त्यावर मुलंही मजेशीर उत्तर देत. मुलं वात्रटपणे म्हणत की तुम्हाला नाक तरी आहे का? त्यावर गोविंदा आणि त्याची पत्नी खजील होत असे. कारण ते त्यांच्याच आजीनं म्हणजे राधानं न्यायालयामार्फत मिळवलेलं प्रावधान होतं. तीच गत विणाचीही होती. विणाचीही मुलगी वयात आली होती. तिही पळून जाण्याच्या गोष्टी करीत होती. त्यामुळं अशा गोष्टी तिच्या मुलीनं करताच विणा तिला टोकत असे. त्यावर तिही वात्रटपणे म्हणत असे. तू जेव्हा पळून गेली होती, तेव्हा माझ्या आजीला कसं वाटलं असेल. तेव्हा विणालाही पश्चाताप होत असे व ती आपल्या मुलीच्या बोलण्यानं गप्प बसत असे.

वसंत नुकताच सुरु झाला होता. शरद नुकताच संपला होता. ती उन्हाळ्याची चाहूल लागली होती. गोविंदा वृद्धाश्रमात बसला होता. त्याला सारखी आपल्या आईची आठवण येत होती. त्याला वाटत होतं की आई याच वृद्धाश्रमात असेल एका बाजूनं पहूडलेली. सारखी विचार करीत असेल नातवंडांचा. नातवंड खेळवणं आईला आवडत होतं. परंतू आपण पाप केलं. घोर पाप केलं.ज्या पापाला माफी नाही. आपण आईला हाकलून लावलं. आपण आईला हाकलून लावल्यानंतर आपली आई आपल्या डोळ्याला दिसली नाही. नातवंडासोबत खेळली नाही. त्यांना कधीच भेटली नाही. निघून गेली कायमची. काल मी जे पाप केलं. त्याची शिक्षा देतात आज माझी मुलं. माझी मुलं मारतात आज. इथंच करावं लागतं आणि इथंच भरावं लागतं. इथून काहीच वर स्वर्गात नेता येत नाही. स्वर्ग आणि नरक वर असतात म्हणे. सर्व भ्रामक कल्पना. सर्वकाही इथंच असतं. स्वर्ग आणि नरकही. चांगलं कर्म करावं. चांगले विचार ठेवावे. सर्वकाही चांगलं होतं. माझे विचार वाईट. कर्मही वाईट. कुठून माझं चांगलं होणार. हं, माझी मुलं चांगली निघाली. फक्त मारतात. काहीबाही बोलतात. तो माझ्या कर्तृत्वाचा परिणाम. परंतू कोणालाच दारुचा शौक नाही. ना सट्टयाचा ना गांज्याचा. ना जुव्वा खेळत ते. कोणतंच वाईट व्यसन नाही. सगळी कशी

चांगली. ते माझ्या आईमुळं घडलं. माझ्या आईनं संस्कार केले त्यांच्यावर. अगदी लहान वयात संस्कार. ते आजही लक्षात आहेत त्यांच्या.

गोविंदाचे ते विचार. तो आज पश्चातापाच्या अग्नीत जळत होता. त्याची आई जवळ नव्हती. परंतू तिनं केलेले संस्कार आजही त्याला आठवत होते. तो भोगत होता त्यानं केलेल्या कर्माची कर्मफळं. परंतू त्याच्या आईच्या कर्माच्या परिणामातून त्याची मुलं चांगली निपजली होती.

राधा देखील एक स्रीच होती. तिनंही इतिहास घडवला होता. ती लढली होती आपली हक्काची लढाई. ती घाबरली नव्हती स्री असूनदेखील. तिलाही त्रासच झाला होता. परंतू त्या लढण्यातून तिचं स्वप्न साकार झालं होतं. तिनं म्हातारपणावर तोडगा काढला होता लढाईतून.

आज ती हयात नव्हती. परंतू तिचा तोडगा लोकांच्या कामात येत होता. आज तिच्या लढण्यानं कायद्यानुसार प्रावधान तयार झाल्यानं कोणीच मुलगा म्हाता-या आईवडिलांची सेवा करायला हयगय करीत नव्हता. कारण त्याला माहीत होते की जर त्यानं तशी हयगय केलीच तर उद्या तोच बाप किंवा तीच माय वृद्धाश्रमात जावून त्याचेवर केस टाकेल व त्यातून मनसोक्तपणे बसून राहून मुलांकडूनच पैसा कमवेल व सुखाने जीवन

जगेल वा तेच म्हातारे मायबाप आपली मालमत्ता विकून गोविंदासारखं मालमत्तेतून बेदखल करतील आपल्याला.

यापुर्वीही ब-याच लोकांना अनुभव आणि प्रचिती आली होती राधेनं लढलेल्या केसची. त्या ब-याचशा म्हाता-यांना केस जिंकायला राधेच्या केसचा फायदा झाला होता व ब-याच जणांनी आपली म्हातारपणात सेवा न करणा-या मुलांना केस लढून अद्दल घडवली होती. राधा तर निघून गेली होती या जगातून. परंतू तिनं आपल्या विचारानं म्हातारपणात म्हाता-या पक्ष्यांच्या पंखात बळ निर्माण करुन दिलं होतं. त्यानुसार आज म्हातारी मंडळी खुश होती.

आज म्हातारी मंडळी खुश होती. परंतू यातही काही अपवाद होते की जे आपल्या म्हाता-या आईवडिलांची सेवा करीत नव्हते. ते केसलाही घाबरत नव्हते. कारण त्यांच्या पंखात त्यांच्याच मायबापानं बळ निर्माण करुन दिलं होतं. ते बळ होतं सरकारी नोकरी. म्हाता-यांच्या केसनुसार त्या म्हाता-यांची मालमत्ता जात होती. परंतू सरकारी नोकरी जात नव्हती. कारण ती एकच लढाई राधा लढायची बाकी होती. ती एकच लढाई राधा लढली नव्हती. म्हणूनच सरकारी नोकरदार वर्ग सतत वृद्धाश्रमातच दिसत होता. कारण त्याची पिल्लंही सरकारीच नोकरीवर होती.

****************************

राधानं शिकवलं होतं मुलांना. परंतू ती मुलं शिकली नाही. त्यातच ती वाया गेली व आपल्या अख्ख्या आयुष्याचं नुकसान करुन बसली.

राधाला दोन मुलं होती. एकाचं नाव गोविंद होतं तर दुसरी एक मुलगी होती. तिचं नाव विणा होतं. ते आपल्याआपल्या संसारात खुश होते.

राधा आज मरण पावली होती. परंतू तिचं अस्तित्व आजही जाणवत होतं. तिनं केलेलं कर्तव्य. त्यामुळंच ती जनांच्या मनात बसली होती. तिनं आबालवृद्ध माणसांची मुलांकडून होणारी हेळसांड दूर केली होती. आज राधा नव्हती. तिचा मुलगा होता. तोही आज म्हातारा झाला होता.

गोविंद आज म्हातारा झाला होता. त्याला दोन मुलं होती. ती सरकारी नोकरीवर होती. ती सरकारी नोकरी नोकरी. त्यात आता समस्या निर्माण झाली होती.

गोविंदानं आपल्या आईची सेवा केली नव्हती. त्यामुळं तो जेव्हा म्हातारा झाला, तेव्हा त्याची सेवा करीत नव्हती त्याची मुलं. आज त्यालाही विचार येत होता व तो पश्चाताप करीत होता.

गोविंदाची जी मुलं नोकरीला होती. त्या मुलांना समस्या होती. त्यांची समस्या म्हणजे त्यांना पेन्शन नव्हती. तसं पाहता ती मुलं आपापल्या कामात व्यस्त राहायची की त्यांना वेळच मिळायचा नाही. ती वेळच मिळत नसल्यानं आपल्या आईवडीलाची सेवा करीत नव्हती.

पेन्शनसाठी यल्गार सुरु होता आज. ज्यांना ज्यांना पेन्शन नव्हती, त्यांनी त्यांनी आंदोलन जाहीर केलं होतं. आज ते संपावर गेले होते. त्यातच त्यांच्या संपावर जाण्यानं जनतेचं फार नुकसान होत होतं, तसंच देशाचंही नुकसान होत होतं. सरकारनं पेन्शन बंद केली होती. ते खाजगीकरणावर लागलं होतं.

खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण! होय. खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण. कारण ज्यावेळेस खाजगीकरण होईल. त्यावेळेस माणसाच्या योग्यतेचा विचार केला जाणार नाही. जे ओळखीचे आहेत. जे मालकाजवळ चुगल्या सांगतील. जे मालकासोबत चोपडे वागतील. त्यांनाच त्या काळात भाव येईल.

आज देशात खाजगीकरण होवू घातलेले आहे. जी विद्यूत आपण वापरतो. ती विद्यूत आज खाजगी झालेली असून ते विद्यूत क्षेत्र कंपन्या चालवीत आहेत. त्यातच आता रेल्वेचंही खाजगीकरण झालं.

ज्याप्रमाणे रेल्वे व विद्यूतचं खाजगीकरण झालं. तसाच प्रकार पोलीस, सैनिक व शिक्षण क्षेत्रात आलं आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षणसेवक हा प्रकार आलेला असून त्याला सरकार केव्हा कायम करेल हे त्यांच्या मर्जीवर. तसंच शालेय क्षेत्रात खाजगी शाळा उघडल्या आहेत. त्यात काही काँन्व्हेंटच्या तर काही अनुदानीत परंतू मालीक मौजाच्या शाळा आहेत. ज्या सरकारकडून अनुदान तर घेतात. परंतू त्यावर मालकी सरकारची नाही. मालकाची आहे. अशा शाळा ह्या सरकारी असल्या तरी या शाळेत सर्वकाही मालकाच्या मर्जीवर चालते. त्यातही काँन्व्हेंटचे हाल बघता बघवत नाहीत. काँन्व्हेंटमधील शिक्षकांचा विचार केला तर तेथील शिक्षकांना घरखर्चाएवढेही वेतन मिळत नाही. तुटपुंजे वेतन मिळतं उच्च शिक्षण असलं तरी. कारण आजच्या काळात शिक्षणाला कोण विचारतं अशी देशाची अवस्था. कारण आज बरीचशी मंडळी उच्च शिकलेली असून बेरोजगार आहेत. तसं पाहता या शिक्षण क्षेत्रानं खाजगीकरण करण्याचं पहिलं पाऊल टाकलं ते जुनी पेन्शन योजना बंद करुन. या योजनेंतर्गत त्यांनी सरसकट लोकांच्या लक्षात न येवू देता जुनी पेन्शन योजना ताबडतोब बंद केली व खाजगीकरणाचं पहिलं पाऊल टाकलं. आता काँन्व्हेंटच्या शाळा वाढल्यानंतर शिक्षकांची किंमतही चिल्लर केली आहे. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

सरकार पोलीस क्षेत्र सरकारमालकीचं ठेवते की नाही ही देखील एक शंकाच आहे. यामध्येही होमगार्ड पोलीस आणले आहेत. ज्यांना कॉन्ट्रॅक्ट बेसवर बोलावलं जातं व त्यांच्याकडूनही पोलीसांएवढेच कामं करुन घेतली जातात. निष्काम सेवेच्या रुपात. मात्र वेतन अतिशय अत्यल्प मिळत असतं. ज्यातून घरखर्च भागत नाही. हीदेखील एक शोकांतिकाच आहे.

सैनिक क्षेत्र पाहिले असता त्यातही आता त्यांच्या नियुक्त्याच सरकारी स्तरावरच्या नाहीत. आधी करुन दाखवा. मग तुमचे गुण पाहून आम्ही ठरवू की तुम्ही नोकरीला लायक आहात की नाही अशी त्यांची अवस्था. अशी अवस्था प्रत्येकच सरकारी क्षेत्रात आहे. यात जो मालकाची वा साहेबांची मर्जी राखेल त्यालाच नोकरी मिळेल. मर्जीलाही एक विशेष अर्थ आहे. मर्जी याचा अर्थ साहेबाचे नातेवाईक वा ओळखीचं असणं, साहेबाला ते मागतील तेवढा पैसा देणं वा साहेबांची त्यांचा गुलाम असल्यागत कामं करणं.

आज ही बाब व हे क्षेत्र सरकारी आहे तरी नोक-या मिळवतांना मालकाची वा साहेबांची मर्जी राखावीच लागते. जर याच बाबीचा विचार करुन आज अस्तित्वात असलेल्या खाजगी क्षेत्राकडे वळून पाहिलं तर आपल्या असे निदर्शनास येते की अशा खाजगी क्षेत्रात नोकरदारांना किंमतच राहात नाही. त्यांची सतत हेळसांड करण्यात येते. ते ओरडूही

शकत नाहीत कुणावर. ना वेतनासाठी ना इतर किरकोळ गोष्टीसाठी. त्यातच अशा खाजगी सेवा जनतेलाही लूटलूट लुटत असतात. उदाहरणार्थ खाजगी रुग्णालये. मन मानेल तेवढे शुल्क. खाजगी शाळा. मन मानेल तेवढे शुल्क. म्हणूनच सरकारी क्षेत्र हवं लोकशाही टिकविण्यासाठी. नि:शुल्कात उपचार घेण्यासाठी. तसंच निःशुल्क पैशात आपल्या मुलांना शिकविण्यासाठी.

लोकशाहीत स्वतंत्र्यता आहे. प्रत्येक गोष्टीची स्वतंत्र्यता आहे. त्यात व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे. परंतू समजा खाजगीकरण झालंच तर लोकशाहीचे मुल्यच नष्ट होईल अशा सर्वच क्षेत्रातून. गुलामासारखं काम करणा-या माणसांना राबवलं जाईल. तसंच त्यांना वेळेचं बंधन राहणार नाही. तसंच पैशाचंही बंधन राहणार नाही. मग अल्प वेतनात कितीतरी वेळ काम करावं लागेल. तसंच त्यावर एखाद्या व्यक्तीनं किंवा व्यक्तीसमुदायानं आढेवेढे घेतल्यास त्यांना कामावरुन काढलं जाईल कोणतीही विचारपूस न करता. केवळ हेच होणार नाही तर असा व्यक्ती समजा न्यायालयातही गेला तर त्याला दाद मिळेलच असे नाही. कारण अशी मालकशाही व्यवस्था आपल्या वकिलांमार्फत न्यायाधीशांचीही खरेदी करु शकते ही शक्यता नाकारता येत नाही.

आज सरकारी सेक्टर आहेत म्हणून बरे आहे. कारण देशातील आजचे लोकसंख्येचे विवरण पाहिले तर आज देशात ८०% जनता ग्रामीण भागात

राहते. यातील ७०% जनता गरीब आहे. त्यातील २०% लोकं एवढे गरीब आहेत की त्यांना आपलं पोट भरणंही कठीण आहे. २% लोकं आजही रस्त्यावर भीक मागतात. रस्त्यावरच झोपतात. त्यांना साधं घरदारही नाही. तेव्हा ही आजची आकडेवारी पाहता ही आजची गरीब असलेली मंडळी प्रकृती बिघडल्यास खाजगी रुग्णालयात धड उपचार घेवू शकत नाहीत. कारण पैसे नसतात. ते आपल्या लेकरांना खाजगी शाळेत शिकवू शकत नाही. तशीच ही मंडळी आपल्या मुलांना उच्च शिक्षण देवू शकत नाहीत. कारण पैसा लागतो.

सरकार अलिकडं हळूहळू खाजगीकरणाकडे वळत आहे. अशावेळेस देशात पुढे जावून संपूर्ण खाजगीकरण झालं तर गरीब, शोषीत व ग्रामीण भागातील जनतेनं जायचं कुठं उपचाराला? त्यांनी आपल्या लेकरांना शिकवावं कुठं? लेकरांना शिकवावं की अडाणी ठेवावं? त्यांनी उच्च शिक्षण घेवू नये काय? त्यांनी नोकरीची अपेक्षा बाळगू नये काय? त्यांनी नोकरी मिळवूच नये काय? त्यांना नोकरी करण्याचा अधिकार नाही काय? वैगेरे सारेच प्रश्न आहेत. आज प्राथमिक शिक्षण सोडलं तर शालान्त शिक्षणानंतर शिक्षण हे निःशुल्क उरलेलं नाही. कितीतरी पैसा मोजून शिकवावं लागतं मुलांना. एवढंही करुन एखाद्या गरीबानं आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिलंच तर त्यांना नोकरी लागत नाही. सर्व पैशाचा खेळ.

म्हणूनच आज गरीबांची मुलं जास्त शिकतांना दिसत नाहीत. ते कामापुरते दोनचार वर्ग शिकतात. त्यामुळं निश्चीतच उच्च शिक्षीत होवून नोकरी गरीबांनी मिळवू नये काय? असा प्रश्न उपस्थीत झाला आहे. त्यातूनच एक मोठी विषमतावादी दरी निर्माण झाली आहे. शिक्षीत व उच्चशिक्षीत. यातही समजा खाजगीकरण झालंच तर लोकं आज जे दोनचार वर्ग शिकवतात. तेही शिकवणार नाहीत. कारण जे काही पैसे लागणार. तेवढेही पैसे मायबाप देवू शकणार नाही शिक्षणाला. त्यामुळं शिक्षण धनिकांचं की गरीबांचं असं म्हणण्याची वेळ येईल.

महत्वाचं सांगायचं म्हणजे खाजगीकरण त्यात नोकरी करणा-या घटकाला गुलाम बनविण्याची प्रक्रिया आहे. तसंच त्यातून गरीबांचा जिर्णोद्धार दिसत नाही. याचाच अर्थ असा लागतो की खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण. ही गोष्ट आजमितीस लोकांनी लक्षात घ्यायला हवी. कारण जी प्रक्रिया सुरुवातीस घडते. ती छान वाटते. परंतू नंतर तिचे गंभीर परिणाम दिसतात. तेच आज खासगीकरणाच्या प्रथम पावलात दिसत आहे. त्यासाठी वेळीच सावध झालेलं बरं.

सर्व पेन्शनधारी संप करीत होते. त्यातच काही लोकांच्या प्रतिक्रिया येत होत्या. त्या प्रतिक्रिया होत्या, सत्ताधा-यांचंही व्हावं खाजगीकरण? त्यांचीही बंद व्हावी पेन्शन?

संप सुरु होता. त्या दरम्यान एका शेतक-याची कैफियत ऐकण्यात आली होती. म्हणत होता की कर्मचा-यांनी संप पुकारला. जुन्या पेन्शन विरोधात. मग आम्हालाही का बरं असू नये पेन्शन. त्याचा प्रश्न रास्त होता. कारण अलीकडील काळात त्याचेच फार हालहाल होत होते. निसर्ग करीत होता हाल आणि सरकारही. सरकारही ऐन हंगामात निसर्गाच्या प्रकोपातून उरलेल्या मालाला भाववाढ देत नव्हते.

सध्या कर्मचा-यांचा संप जोरात सुरु होता. सरकार नरमण्याची चिन्हं दिसत नव्हती. त्यातच सरकारनं कुटूंब पेन्शन देण्याचं एक पिल्लू काढलं होतं बाहेर. कर्मचारी चूप बसतील म्हणून. परंतू कर्मचारी चूप कसे बसणार? तसं पाहता काही बेरोजगार संघटना पुढं सरसावल्या होत्या. म्हणत होत्या की आम्ही अर्ध्या पगारावर नोकरी करतो. आम्हाला नवीनही पेन्शन नाही मिळाली तरी चालेल. त्यातच काही महाभाग आपले वेगवेगळे विषय मांडत होते. जेणेकरुन हा संप सरकारनं मोडून काढावा हे यातील पिल्लू.

व्हाट्सअपवर अनेक लेख येत होते. वेगवेगळ्या विषयाचे लेख असायचे व्हाट्सअपवर. असाच एक लेख आला होता संपदरम्यान व्हाट्सअपवर. त्यानुसार एका व्यक्तीची प्रतिक्रिया आली. त्यात झालेला संवाद.

गोविंदाची मुलं नोकरीवर होती. संपात तिही सहभागी होती. त्यांचं नाव निरंजन व रंजन होतं. व्हाट्सअपवर निरंजनशी संवाद झाला होता. संवाद असा होता. म्हणत होते ते गृहस्थ निरंजनला.

"कोरोना काळात केवळ शेतकरी, शेतमजूर शेतात राबून लोकांना अन्नधान्य व भाजीपाला पुरवठा करत होते. पण त्यांनी कधी त्याचा डांगोरा पिटला नाही. म्हणून मनूने चातुर्वर्ण्यात पगारदार लोकांना शुद्र म्हणून संबोधले ते योग्यच म्हणावे लागेल."

"यात मनूचा आणि पगारदार वर्गाचा कोणता संबंध आला. यात म्हणायचं आहे की चांगलं पाहावयास तशी दृष्टी असावी लागते. वाचावयाच्या आधीच जर आपले मत ठरवले असेल तर चांगल्या गोष्टीला सुध्दा आपण वाईट ठरवतो."

त्या व्यक्तीच्या म्हणण्यानुसार त्याचं बरोबर होतं. परंतू निरंजनला वाटत होतं.

"देशात सारेच आहेत पगार घेणारे. कोणी सरकारमध्ये राहून वेतन घेतात तर कोणी खाजगी काम करुन वेतन घेतात. मग सारेच शुद्र का?"

त्यावर तो व्यक्ती म्हणाला,

"शूद्र हा वर्ग आहे जात नव्हे. मी हाडाचा शेतकरी आहे. मला गुलामी करणे आवडत नाही. मी एम.का ॅम आहे. म्हणजे मी शिक्षीत आहे. मला स्वतंत्रपणे जगायला आवडते." त्यावर निरंजननं म्हटलं,

"करा ना मग शेतीचं काम. कोण नको करु म्हणतं. जगा ना स्वतंत्र्य. विरोध कोणाचा आहे. विरोध सत्तापक्षाचा की आमचा आहे. आपणही आवाज उचलायला हवा, कर्मचा-यासारखा. बरोबर की नाही. आपण फक्त बोलू शकतो, करु शकत नाही ना. ते बघा एकाच दिवशी संपावर गेलेत नोकरी गेली तरी फिकीर नाही. तशी संपावर जायची ताकद निर्माण करा. परंतू तुम्ही संपावर जात नाही. तुम्हाला तसा वेळच नाही. तुम्ही संपावर गेल्यास तुमचं मात्र शेत बुडतंय. उपाशी मरतो शेतकरी आणि त्याचबरोबर सर्वच. असं म्हणू नका."

निरंजनला त्या व्यक्तीचा राग आला होता. तसा तो बोलत होता. कारण बाकीच्या जुन्या लोकांना पेन्शन होती. त्याला मात्र पेन्शन नव्हती. त्याचं बोलणं झालं होतं. तसा त्यानंतर तो व्यक्ती म्हणाला,

"आम्हालाही पेन्शन मिळायला हवी. परंतू आम्ही स्वाभिमानी आहोत. आम्हाला भीक मागाविशी वाटत नाही. पगार म्हणजे भीकच."

तो शेतकरी होता. हाडाचा होता की नाही ते माहीत नाही. परंतू तो स्वतःला हाडाचाच शेतकरी मानत होता. त्याच्या बोलण्यातून प्रचंड चीड दिसून येत होती. त्याचंही म्हणणं बरोबरच होतं. कारण आज शेतकरी एवढी मेहनत करतो. परंतू निसर्गाच्या प्रकोपामुळं त्याला पाहिजे तेवढं पीकत नव्हतं, जे काही पिकत होतं. त्यातही त्याच्या निसर्गाच्या प्रकोपातून उरलेल्या मालाला पाहिजे तेवढा भाव मिळत नव्हता.

तो रोष....... तो रोष, तो शेतकरी व्यक्ती कर्मचा-यांच्या संपावर दाखवत होता. तसा तो रोष कर्मचा-यांच्या संपावर दाखवायला नको होता. कारण त्यात कर्मचा-यांचा दोष नव्हता. दोष होता सरकारचा. सरकारच शेतीमालाला भाव देवू शकतो. शेतक-यांच्या मालाबाबत धोरणं आखणी करु शकतो. त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळू शकतो. त्यात कर्मचा-यांचा काहीही रोलकाल नव्हता.

तो शेतकरी केवळ त्याच गोष्टी सांगत नव्हता तर स्वतः स्वाभिमानी असल्याचा दाखला देत होता. त्याचे 'मी गुलाम नाही व मी पगार मागून भीक मागत नाही. मी फार शिकलेला आहे. परंतू मी नोकरीसाठी शिकलो नाही. नोकरी मागीतली नाही सरकारला.' हे म्हणणे संयुक्तीक वाटत नव्हते.

त्या व्यक्तीचं बोलणं संपताच निरंजन म्हणाला,

"आज खरं सांगायचं म्हणजे प्रत्येक जण शिकतो ते सरकारी नोकरी मिळावी म्हणून. मग कितीही काम करुन नोकरी न मिळाल्यास भ्रमनिराश होतो. त्यानंतर आपल्याला ती सत्य परिस्थिती सांगायची लाज वाटते व मग आपण सांगायला लागतो की मी नोकरीसाठी शिकलो नाही. खरं तर शेतकरी राबतात वा मजूरही राबतात. तेही सेवाच करतात देशाची. ते जर नसतील तर सरकारी कर्मचारीही नसतील हे सत्य आहे. परंतू असा रोष दाखवून उपयोग नाही. तुम्हाला नोकरी नाही लागली यात सरकारी कर्मचा-यांचा दोष नाही. तुम्हीही मागावी पेन्शन. त्यालाही कर्मचारी वर्गाचा विरोध नाही. विरोध आहे सत्तेत असणा-या व केवळ आणि केवळ त्यांना मिळणा-या पेन्शन व पगाराचा. आज एका एका आमदार, खासदारांच्या पगाराचा पैसा पाहिला तर तो लाखोंच्या घरात आहे. तशीच त्यांची पेन्शन देखील लाखोंच्या घरात आहे. ज्यांचा पगार देतांना सामान्य माणसांच्या कमवित्या पैशावर प्रभाव पडतो. तसाच प्रभाव देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडतो. कारण तो पैसा सामान्य माणसांच्या खिशातून जातो."

निरंजनचं ते बोलणं. तसा तो म्हणाला,

"मी नोकरीसाठी शिकलो नाही. माहीत आहे. माझी पत्नी विवाहापुर्वी नोकरीवर होती. परंतू मी सोडायला लावली विवाहानंतर नोकरी."

निरंजनला त्याचाही राग आला. त्याला वाटत होतं की हा काय माणूस आहे की ज्यानं त्याच्या पत्नीची नोकरी करायची इच्छा असूनही ती मोडली. तिला पंगू बनवलं आणि आता मी गुलाम नाही. स्वतंत्र आहो असं म्हणत आहे. तो त्याचा विचार. तसा तो त्याला म्हणाला.

"आज महागाई पाहता त्या महागाईनं चरणसीमा गाठली आहे. दररोजची भाववाढ होत आहे. सिलेंडरची किंमत अवाजवी वाढली आहे. तेलाचे भाव अमाप आहेत. गृहिणींना फरक पडत आहे. सर्व जीवन विस्कळीत झाले आहे. मात्र आमदार, खासदारांचे पगार वाढत आहेत. पेन्शनही प्रत्येक निवडणुकीच्या बाद वाढतच आहे. त्यांना तुम्ही काहीही म्हणत नाही आणि आज आम्ही ओरडलो तर आमची पगारवाढ व पेन्शन डोळ्यात खुपते."

तसा तो म्हणाला,

"कर्मचा-याचेही महागाई भत्ते आणि पगार वाढत आहेत. त्यातच तुम्ही आता जुन्या पेन्शनच्या मागं लागलेले आहात. तसं पाहता आज कित्येक लोकं शिकत आहेत. बेरोजगार वाढत आहेत. परंतू नाईलाज आहे. बेरोजगारीवर नियंत्रण नाही. सारेच प्रश्न. त्यात सामान्य माणूस होरपळून निघत आहे. सरकारनं यावरही तोडगा काढला आहे. ते ओरडायला नको.

म्हणून त्यांनाही नि:शुल्क सरकार तांदूळ, गहू देत आहे. पण ते महागाई नियंत्रणात आणू शकत नाही. यावर उपाय म्हणून सरकारनं खाजगीकरणाचं सत्र उभारलंय. तेही बरोबर आहे. मात्र तुम्ही वारंवार पेन्शन मागून सरकारला लाजवता आहात."

निरंजनला आता भयंकर राग आला होता. त्याला वाटत होतं की हा माणूस स्वतःला काय महान समजतो की काय. परंतू तो राग मनातल्या मनात दाबला. तसा तो म्हणाला,

"आज २००४ च्या पुर्वीचा काळ सोडला तर सर्व सेवांचं खाजगीकरण करायला सरकारनं पावलं उचलली आहेत. त्यातून शिक्षक, पोलीस, सैनिक, रेल्वे, विद्यूत आणि इतर सर्व सरकारी सेवांना सोडलेलं नाही. कारण वेतनाचा भार सरकारवर नको. कोणीच ओरडायला नको. परंतू कोणताही आमदार, खासदार आपले वेतन व पेन्शन सोडायला तयार नाही. महत्वाचं म्हणजे सा-याच समस्या सुटू शकतात. जर आमदार, खासदार यांनी सरकारकडून मिळणारी आपली पेन्शन व पगार सोडला तर. परंतू सरकार सर्वांचं खाजगीकरण करीत आहे. आपलं करीत नाहीत. त्यामुळंच सर्व समस्या. यातूनच सरकारला जुन्या पेन्शनची मागणी करणं सुरु आहे. ही मागणी तेव्हापर्यंत असेल. जेव्हापर्यंत सरकारचे सत्तेत असलेले हे घटक उदा. आमदार, खासदार आपली पेन्शन व पगार सोडणार नाहीत. ते जेव्हा

आपली पेन्शन व पगार सोडतील. त्यात खाजगीकरण करतील स्वतःचं. तेव्हाच सरकारी कर्मचारीही आपली जुन्या पेन्शनची मागणी सोडतील. तसंच चूपही बसतील. यात शंका नाही आणि तेव्हाच पैसा वाचेल देशाचा. पगार व पेन्शनवर खर्च होणारा. व्यतिरिक्त यातून अनेक फायदे होतील. महागाई कमी होईल. त्यातूनच देशाचा विकास करता येईल व देश आपोआपच सृजलाम सुफलाम होईल यात तिळमात्र शंका नाही. तसंच जर सरकारनं आपलं खाजगीकरण केलं तर शेतकरी मजूरही काही अंशी चूप बसतील. तेही सरकारला पेन्शनची मागणी करणार नाहीत. हेही तेवढंच खरं आहे."

निरंजनचंही बरोबरच होतं. सरकार काही स्वतःची पेन्शन सोडायला तयार नव्हतं. ते तर आपली पेन्शन वाढवायला तयार होतं. म्हणूनच सा-या समस्या होत्या.

संप........ पेन्शन विरोधात शासकीय कर्मचा-यांनी संप करुन एल्गार पुकारलेला होता. तो बेमुदत होता. याला सरकार जबाबदार होतं. सरकार कोणत्याच प्रकारची पावलं उचलतांना दिसून येत नव्हती. मात्र या संपानं ब-याचशा सरकारी सुविधा प्रभावीत झालेल्या होत्या.

संपाबाबत मत नोंदविताना या संपाच्या दोन बाजू केल्या होत्या लोकांनी. कारण त्यांना नोकरी नव्हती. ज्यांना नोकरी नव्हती असे लोकं म्हणत,

"कशाला हवी पेन्शन. त्यांना ते नोकरीवर असतांनाही भरगच्च पैसे द्या. वरुन पेन्शनही द्या." त्यावर निरंजन म्हणायचा,

"महाशय हो, अहो, वेतन ज्या कालावधीत मिळतं ही त्यांची मेहनत आहे. आम्ही जेवढी मेहनत करतो ना, तेवढाही पैसा वेतनात मिळत नाही. त्या नोकरी दरम्यान एवढा डोक्याला त्रास होतो की आम्ही कर्मचारी रात्रीही सुखाची झोप घेवू शकत नाही. रात्र रात्र जागतो अक्षरशः आम्ही. आम्ही आहोत म्हणून सर्व आहेत. आम्ही जर नसतो तर कोणीही नसतं."

ते नसते तर आपणही नसतो. त्याचं उदाहरण. बघा, कोवीड - १९ चा काळ लोकांनी अनुभवला. या काळात लोकांनाही माहीत आहे की किती भीती होती. लाॅकडाऊन होतं व कोणीही व्यक्ती घराच्या बाहेर पडत नव्हता. अशा काळात नोकरी आहे व आपण या देशाचे देणे लागतो या कर्तव्यानं तर काही लोकं नोकरी जाईल या भीतीनं बाहेर पडले. त्यांनी त्यावेळेस कशाचीही अर्थात घरादाराचीही पर्वा केली नाही. आपल्याला माहीत असेलच की मृत्यूही थयथय नाचत होता. स्मशानागत रांगा लागत

होत्या. त्यावेळेस आपल्यालाही कोवीड होईल व आपणही मरण पावू ही भीती सरकारी कर्मचा-यांना होती. तरीही आपल्या मृत्यूची व घरादाराची पर्वा न करता ते बाहेर पडले. कोणासाठी तर लोकांसाठी. लोकांची सेवा केली त्यांनी. आपल्या जिवाची पर्वा न करता. काही काही कर्मचारी यात मरणही पावले. मग त्यांचा परिवार लोकांनी पोषला का? आज या महामारीत बरेचसे डाॅक्टर काही परीचारीका व आरोग्य कर्मचारी अशाच प्रकारच्या कोवीड महामारीच्या संपर्कात येवून मरण पावले. काहींनी वाचवलं रुग्णांना. कारण त्यांचेजवळ अतोनात पैसा होता. परंतू काही असेही वाचले की त्यांचेजवळ तुटपुंजा पैसा होता. जे गरीबही होते. कोवीडला हारवू शकत नव्हते. माहीत आहे ते कशाच्या भरवशावर वाचले. ते वाचले याच सरकारी कर्मचा-यांच्या भरवशावर. ज्यांच्याजवळ पैसा नव्हता. ते सरकारी रुग्णालयात भरती झाले. तिथं याच सरकारी कर्मचा-यांनी कशाचीही खंत न बाळगता त्यांचेवर उपचार केला.

याबाबत दुसरं उदाहरण ते सैनिकांचं. का गरज आहे त्यांना लढण्याची आणि आपला जीव धोक्यात घालून लोकांना सुरक्षीत ठेवण्याची. परंतू ते केवळ लोकांसाठी देशाच्या सीमेवर तैनात असतात. लोकांना काही होवू नये म्हणून. माहीत आहे जर ते खाजगी असते ना व पेन्शन नसती ना त्यांना. तर केव्हाच पळून आले असते ते सीमेवरुन. त्यातच प्रतिशत्रूनं देशावर

आक्रमण केलं असतं. त्यानंतर लोकांचं काय झालं असतं याचा इतिहास साक्षीदार आहे. अहो, इथं पोलीस कर्मचारीही लोकांचं रक्षण करतात जिवावर उदार होवून. लोकांना माहीत असेल की नाही माहीत नाही, देशावर गतकाळात झालेल्या आंतकवादी हमल्यात तुकाराम नावाचा एक पोलीस शिपाही मरण पावला. परंतू त्याचेचमुळे कसाब हा आतंकवादी सापडला होता. नाहीतर त्या कसाबनं कितीतरी निरपराध लोकांचे प्राण घेतले असते.

उदाहरणं भरपूर आहेत. अहो, कोवीडच्या काळात कितीतरी शिक्षकांनी खपून लोकांच्या मुलांना शिकवलं. एवढंच नाही तर या शिक्षकांनी जिवावर उदार होवून चुंगीनाक्यावर नोकरी केली. कशासाठी तर बाहेरुन कोणताही संसर्गीत रुग्णं येवू नये व आपल्या जिल्ह्यात कोवीडचा प्रसार होवू नये आणि हे करीत असतांना त्यांनी विद्यार्थ्यांचा अभ्यास बुडवला नाही. मोबाईलवर अभ्यास शिकवला. त्यातच ज्यांच्याकडे मोबाईल नव्हता ना. त्यांना घरी जावून वा त्यांच्या वस्तीत जावून दूर दूर बसवून अभ्यास शिकवला. अशी बरीच उदाहरणं देता येतील. परंतू लिहायलाही बंधन आहेत. आता लोकं म्हणतील की कोवीडसारखी महामारी एखाद्या वेळेसच येते. नेहमी येत नाही. त्याबाबतही सांगायचं म्हणजे देशात केवळ कोवीडच नाही तर भूकंप, महामारी, वादळं, आपादग्रस्त परिस्थिती नेहमीच चालत असते. लोकांना माहीत असेल

लातूर उस्मानाबादचा भूकंप. लोकांना माहीत असेल मोवाडचा महापूर. अन् आणखी माहीत असेलच माळीणचं भुस्खलन. त्यावेळेस आठ आठ दिवस काम चाललं. मृतदेह कुजलेले होते. नुसता दुर्गंध येत होता. काम करणं जमत नव्हतं. तरीही सरकारी यंत्रणा काम करीत होत्या. कशासाठी तर लोकांमधील एखादा जीव मरु नये यासाठी. त्यांना माहीत होतं की एखादा जीव या मलब्यात दबून मरु नये. माहीत आहे माळीणच्या मलब्यात एक तीन वर्षाचं लेकरु तीन दिवसानंतर सापडलं. ज्यांचे मायबाप मरुन गेले होते.

या सरकारी यंत्रणेत कोण काम करीत होतं. माहीत नसेल. परंतू हेच सरकारी कर्मचारी काम करीत होते. लोकांना माहीत असेलच की सरकारी कर्मचारी असलेले पोलीस लोकांच्या सुरक्षेसाठी दिवस दिवसभर ताटकळत उभे राहतात. त्यांना साधं लघुशंकेलाही जाता येत नाही.

माहीत नसेल आपल्याला की शिवरायही पेन्शन देत होते आपल्या कर्मचा-यांना. म्हणून त्यांच्यासाठी मावळे जिवाला जीव देत. तानाजी मरण पावल्यानंतर त्यांनी उमरठे गावी जावून त्यांच्या मुलाचं म्हणजे रायबाचा विवाह करुन दिला त्यांनी. तसंच बाजीप्रभूच्याही मुलांना दगा दिला नाही. त्यांनी ब-याचशा विधवांचाही सन्मान केला नव्हे तर त्यांचं पालनपोषण केलं.

माहीत आहे, डाॅक्टर बाबासाहेबांनी लागू केली आपल्याला पेन्शन. एक दिवस डाॅक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कोर्टाच्या बाहेर एका महिलेला रडतांना पाहिलं. ती महिला आपल्या लेकरांना घेवून रडत होती. कारण तिचा पती मरण पावला होता अपघातात. तिचा पती एसटी मध्ये होता. त्यानंतर तिचा मुलगा आजारी होता. त्याचा आजार बरा करायला पैसे नव्हते. तिला डाॅक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी विचारलं की ती अशी का रडते? त्यावर ती म्हणाली,

"माझा पती एस टी महामंडळात होता. मरण पावला. त्यानंतर माझा मुलगा आजारी पडला. त्याचा आजार बरा करायला पुरेसे पैसे नाही. मी गेले होते महामंडळाजवळ. तेव्हा ते म्हणाले की कोर्टात जा. म्हणून मी आले कोर्टात. परंतू इथंही कोणी माझं ऐकेना."

डाॅक्टर बाबासाहेबांनी तिचं ऐकलं. तसं त्यांना वाईट वाटलं. तसं त्यांनी त्याबाबत पिटीशन दायर केली व तिला मदत म्हणून पेन्शन मिळवून दिली. त्यानंतर त्या गोष्टीचा अभ्यास करुन डाॅक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत पेन्शनबाबत कलमांचा समावेश केला. म्हणूनच आज पेन्शन मिळत आहे. नाही तर आजही श्रीमंतांचं राज्य असतं. गरीबांना कोणीही विचारलं नसतं. म्हणूनच लोकांनी सरकारी कर्मचा-यांच्या मागणीचा विचार करावा. अभ्यास करावा. दुषणे देवू नये.

असे हे सरकारी कर्मचारी. सरकार खाजगीकरणाची भाषा बोलतेय. कारण त्यांच्या डोक्याला असा ताप नको. माहीत आहे, सरकारी कर्मचारी निवृत्त झाल्यावर त्यांना त्यांच्या सेवेनं अनेक व्याधीही होतात. त्यावरही उपचार करण्यासाठी पेन्शन हवी असते. तसंच हे सुद्धा विचारात घ्या की सरकारी कर्मचारी नसतील ना देशात. तर तो देश देश राहणार नाही. त्या देशात अवकळा पसरेल. फक्त नि फक्त श्रीमंतांचंच राज्य असेल. तुम्हा आम्हाला कोणीही विचारणार नाही.

आज सरकारी कर्मचारी आहेत, म्हणून मजा आहे. देशात लोकशाही आहे म्हणून सारेच ओरडतात. पेन्शन कशाला हवी म्हणतात. माहीत आहे सरकारी कर्मचा-यांना जेव्हा रेकॉर्ड द्यायचा असतो ना वा पुर्ण करायचा असतो. तेव्हा तुमच्या भल्यासाठी त्यांना रात्रंदिवस जागं राहावं लागतं व रेकॉर्ड पुर्ण करावा लागतो. जेव्हा ते ड्युटीवर असतात ना. तेव्हा त्यांची वेळ केव्हाच संपून जाते. तरीही ते बारा बारा ते अठरा अठरा तास काम करीत असतात आपल्या झोपेची व आरोग्याची त्यातच शरीराची पर्वा न करता. यातूनच त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. मानसीक समस्या वेगळ्याच.

महत्वाचं सांगायचं म्हणजे हे सरकारी कर्मचारी. त्यांच्या अंगात जेव्हा रग असते ना. तेव्हा ते साऱ्यांचीच सेवा करतात. परंतू जेव्हा ते थकतात.

तेव्हा त्यांचीही सेवा व्हायला हवी. त्यावेळी त्यांनाही आधार मिळायला हवा लेकरासारखा. यात वयाची अठ्ठावन वर्ष सेवा म्हणजे मायबापाचं कर्तव्य व पेन्शन म्हणजे मुलांचं कर्तव्य. आता पेन्शन नको म्हणणारी मंडळी केवळ मायबापासारखी सेवा करा म्हणतात आणि पेन्शन नाकारुन त्या मुलाचे कर्तृत्व नाकारतात. अर्थात ज्या मुलांना मायबापानं मोठं केलं. त्या मायबापाला म्हातारपणी मुलांनी जेवणखावण देणं मुलांचं आद्य कर्तव्य नाही का? तरीही ते समजून न घेता पेन्शन नाकारणारी मंडळी अशा सेवा करणा-या व मायबापागत सेवा करणा-या कर्मचा-यांची अवस्था त्या मायबाप कर्मचा-यांची पेन्शन नाकारुन त्यांना वृद्धाश्रमात पाठविण्यासारखी करतात. यात काहीच तिळमात्रही शंका नाही आणि तिळमात्रही असत्यता नाही. महत्वपूर्ण बाब ही की जे मायबाप अगदी म्हातारपणापर्यंत आपल्या मुलांना पोषतात. मग त्यांची अपेक्षा असते की म्हारपणानंतर मुलांनी आपल्याला पोषावं. तीच अपेक्षा सरकारी कर्मचा-यांचीही असते. अगदी त्याच बापागत हे सरकारी कर्मचारी आयुष्याच्या अठ्ठावन वर्षपर्यंत राब राब राबतात, कोणतीच अपेक्षा करीत नाहीत आपल्याकडून. मग त्यांच्या उतारवयात म्हणजे ते निवृत्त झाल्यानंतर आपण त्यांना पेन्शन देणं हा आपला नैतिक अधिकार नाही का? तरीही आपण त्यांचा अधिकार नाकारतो. त्यांना कशाला हवी पेन्शन म्हणतो. त्यांचेवर ताशेरे ओढतो. हे

बरोबर नाही. विचार करा की ते आहेत, म्हणून तुम्ही आहात. तुमच्या जगण्यालाही अर्थ आहे. ते जर नसते तर तुम्हीही नसते आणि तुमच्या जगण्यालाही अर्थ उरला नसता. हे तेवढंच खरं आहे."

आम्हालाही पेन्शन हवी. सरकारी कर्मचा-यांचा आक्रोश होता. त्यातच आता शेतकरीही मागणी करीत होते पेन्शनची. त्यांचंही बरोबरच होतं. कारण शेतकरी मंडळी आजमितीला दुःखी व कष्टी होती.

जुनी पेन्शन योजना. एक लाभाची योजना. वय वर्ष पुर्ण होताच म्हातारपणाचा आधार म्हणून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सरकारद्वारा मिळणारी मदत. सरकारनं ती पेन्शन बंद केलेली होती .

जुनी पेन्शन. सरकार तसेच सर्व पक्षातील लोकं एक दुस-यांना दोषी पकडून आपण दोषी नसल्याचं दाखवत होते. आव आणत होते व एकमेकांवर दोषारोपन करीत होते आणि मी नाही त्या गावचा म्हणत हात झटकत होते नव्हे तर लोकांना फिरवत होते. जुनी पेन्शन योजना. ही कोणी बंद केली. यातही राजकारण. कोणी म्हणत की भाजपनं तर कोणी म्हणत की कॉंग्रेसनं. परंतू ती बंद करण्यात दोघांचाही हात होता. कारण त्या दोन्ही पार्ट्या एकमेकांच्या नातेवाईकच होत्या. फरक हा होता की ते जनतेला समजत नव्हतं आणि लोकंही समजूनही घेत नव्हते.

जुनी पेन्शन योजना बंद करण्याचं सर्वप्रथम पाऊल उचललं ते भाजपानं. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण त्यावेळेस सरकार भाजपाचं होतं. सन १९९८ मध्ये केंद्रीय कर्मचा-यांवर पेन्शन योजना बंद करुन कु-हाड मारण्यात आली. त्यावेळी फक्त केंद्रीय कर्मचारी हे लक्ष होतं. त्यावेळेस कोणी ओरडलं नव्हतं. कारण शो बाजी झाली नाही आणि शो बाजी करणार तरी कोण? हा केंद्रीय कर्मचा-यांचा मुद्दा आहे म्हणून सारेच कर्मचारी चूप बसले.

काही दिवस बरे गेले. काही दिवसानंतर म्हणजे २००४ ला पुन्हा एकदा तुघलकी निर्णय झाला. त्यावेळेस महाराष्ट्रात काँग्रेस सरकार होतं. या सरकारनं कर्मचा-यांच्या पेन्शनवर कुऱ्हाड मारली व राज्य कर्मचा-यांची २००५ पासून जुनी पेन्शन बंद केली. त्यानंतर त्यावर ओरड झाली असता एन पी एस योजना लावून कर्मचारी वर्गाला चूप बसविण्यात आले.

हा खाजगीकरणाचा डाव होता. या डावाअंतर्गत पेन्शन बंद केली गेली ती २००५ पासून. त्यानंतर त्यांचा डाव होता १९९५. परंतू २००५ ची पेन्शन बंद होताच लोकं एवढे चिडले की त्यांना १९९५ पासून पेन्शन बंदचा डाव खेळता आला नाही.

*पेन्शन बंद का केली?*

पेन्शन बंद केली. पेन्शन बंद करण्यामागे उद्देश होता शासकीय कर्मचा-यांची तोंड बंद करणं. समजा ते जर सरकारी कर्मचारी असतील आणि त्यांना कमीजास्त केलं, तर ते संप वा आंदोलन करतात. जसे. आता करीत होते आणि यात खाजगी जर कर्मचारी असले तर ते सरकारचे कर्मचारी नसल्यानं ते सरकारविरोधात ना संप करु शकत होते ना आंदोलन ना हरताळ. ते आंदोलन मालकाविरुद्धही करु शकत नव्हते. कारण त्यांना केव्हा काढून फेकेल, ही त्यांना भीती. ते मालीकमौजा कर्मचारी आंदोलन वा संप करणार नव्हते. कारण त्यांनी संप केल्यास मालक त्यांना काढून फेकेलच. व्यतिरिक्त त्यांना दुसरीकडंही लवकर वा तेवढ्या पैशाचं काम मिळणार नव्हतं. तिही दुसरी भीती. याच भीतीमुळे देशातील कर्मचा-यांचं वातावरण शांततेचं राहील. आपल्या डोक्याला ताप राहणार नाही. म्हणून हळूहळू खाजगीकरणाचा सरकारचा प्रयत्न होता. शिवाय सरकारी कर्मचा-यांचे वेतनही जास्त आणि खाजगी कर्मचा-यांचे कमी. त्यामुळं खाजगीकरण करण्याचे ध्येय सरकार समोर होतं. याच अनुषंगाने त्यांनी एका वस्तीत एक शाळा देण्याऐवजी कॉन्व्हेंटच्या अनेक शाळा दिल्या. त्या शाळांना राजमान्यताही दिली. ही पेन्शन बंद योजना देखील ह्याच खाजगीकरणाचं पहिलं पाऊल होतं.

*पेन्शन बंद बाबत सरकारचं उत्तर*

सरकारला पेन्शन बंद का केली? असं विचारलं असता सरकार सांगत होतं की याचा विकासावर महाभयंकर परिणाम होतो. देशात वा राज्यात विकास करतांना अडचणी येतात. त्या विकासाला पैसा पुरत नाही.

*पेन्शन बंद बाबत कर्मचा-यांचं प्रत्युत्तर*

पेन्शन बंद बाबत कर्मचा-यांचं प्रत्युत्तर होतं की आमदार, खासदार वा कोणतेही नेते आपली पेन्शन का बंद करीत नाहीत. त्यांना तर जास्त पेन्शन आहे आमच्यापरसही.

*पक्षांतर्गत राजकारण*

सर्व वादाचे मुद्दे. कोणी २००५ मध्ये पेन्शन बंद झाल्याने त्यावेळेस राज्यात असलेल्या काँग्रेस सरकारला जबाबदार धरतात तर कोणी १९९८ मध्ये केंद्रीय कर्मचा-यांवर पेन्शन बंदची कु-हाड मारल्यानं त्यावेळेस केद्रात जे भाजपा सरकार होतं, त्यांना जबाबदार पकडतात. काँग्रेसवाले म्हणतात की भाजपानं १९९८ मध्ये पेन्शन बंद केली. आमचा दोष नाही. परंतू काही भाजपवाल्या लोकांचे म्हणणे असे की त्यांनी विहिरीत उडी मार म्हटलं तर आपण मारायची का? याचा अर्थ असा की १९९८ ला भाजपानं जरी पेन्शन बंद केली असली तरी २००४ मध्ये आलेल्या काँग्रेसनं त्यात सुधारणा करायला हवी होती. त्यातच बरेचदा काँग्रेसच आजपर्यंत सत्तेत आली. मग

त्यामध्ये सुधारणा का केली नाही? कॉंग्रेसवाल्यांना विचारणा केल्यास ते त्याचं स्पष्टीकरण देत नव्हते. ते फक्त १९९८ चा हवाला देत. यावरुन असं दिसत होतं की तेरी बी चूप मेरी बी चूप. हम तमाशा देखेंगे. यांना लढू द्या. मग पाहू काय करायचं ते. असं हे पक्षांतर्गत राजकारण. त्यातच ते विकासाचा हवाला देवून पेन्शन दिल्यास विकास करता येणार नाही. विकास मंदावेल असं सांगत.

*लोकांचं म्हणणं*

विकास मंदावेल असं सरकारचं म्हणणं. लोकं म्हणत की जर याचा विकासावर परिणाम होतो तर मग आपली पेन्शन या नेत्यांनी कशी सुरु ठेवली. त्याचा परिणाम विकासावर होत नाही काय? होतो. मग आपली पेन्शन ही नेतेमंडळी का सुरु ठेवतात. याचाच अर्थ असा की आमची पेन्शन जर आपण बंद केली तर आपलीही पेन्शन बंद करा ना. असं कर्मचा-यांचं म्हणणं.

यात लोकांचं म्हणणं बरोबरच होतं. यावर्षीचा म्हणजे सन २०२३ २४ चा बजेट सरकारनं मांडला. त्यात सरकार म्हणत होतं की खर्च ठरलेला आहे. एकूण शंभर पैशामध्ये खालील प्रकारचा खर्च होतो. जसा. महसूल खर्च २५%, कर्ज परतफेड ९%, त्यावरील व्याज १०%, निवृत्तीवेतन

११%, वेतन २४%, भांडवल खर्च १२%, अर्थ सहाय्य ५%, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनुदान वा नुकसान भरपाई यावर ४%. असा जर खर्च आहे तर मग यात आम्ही कुठून पेन्शन देवू. या खर्चात सरकारनं किरकोळ खर्च दाखवलेला नव्हता. त्यामुळं निरंजनला वाटत असे की आता हा बजेट पाहिला की विचार येतो आणि म्हणावंसं वाटतं की एक भिकारी दुस-या भिका-याजवळ गेला आणि काही न मागता परत आला.

यात महत्वाचं सांगायचं झाल्यास सरकार आणि सरकारातील लोकं. काही पक्षवाले सत्तेत असलेले व नसलेले पण सरकारचे जवळचे लोकं एकमेकांवर आगपाखड करत. दोषारोपनही करत. म्हणत की आम्ही दोषी नाही. आम्हाला मागू नका पेन्शन. सरकारजवळ पेन्शन द्यायला पैसा नाही. आम्ही कसं चालवतो सरकार हे आमचं आम्हालाच माहीत. मग आम्ही इतरांना कशी पेन्शन देणार. यावर संपकरी म्हणत होते की ठीक आहे. आम्हाला पेन्शन एकवेळची नाही दिली तर. परंतू आपली स्वतःची पेन्शन बंद करा. जेव्हा तुम्ही आपली स्वतःची पेन्शन बंद कराल, तेव्हा आम्हीही आपणाला पेन्शन मागणार नाही. परंतू आपली जर पेन्शन सुरु ठेवत असाल तर आम्हालाही पेन्शन हवी.

विशेष बाब ही की सरकारात असलेल्या लोकांची ते निवृत्त होताच पेन्शन सुरु होत होती. त्यातच ते जेव्हा जेव्हा निवडून येत, तेव्हा तेव्हा त्यांची

पेन्शन वाढत असे. ते तर मग जनतेची सेवा करो की न करो. अर्थात नोकरी करीत नसत वयाच्या अठ्ठावन वर्षपर्यंत. तरीही पेन्शन आणि हे कर्मचारी आपल्या वयाची अठ्ठावन वर्ष काम करीत. तरीही म्हातारपणाचा आधार म्हणून पेन्शन नव्हती. ती बंद केलेली होती जुन्या स्वरुपाची. ही विसंगती होती. त्यामुळं निरंजन म्हणत असे की विसंगती जर ठेवायची असेल आणि संपूर्ण खाजगीकरण आणायचं असेल तर अवश्य आणा. परंतू आपलीही पेन्शन बंद करा म्हणजे झालं आणि जर आपली पेन्शन बंद करायची नसेल तर आमचीही पेन्शन सुरु करा. मग सरकारच्या तिजोरीवर कितीही भुगतान पडला तरी चालेल. महत्वपूर्ण गोष्ट ही की आमचीच पेन्शन सुरु केल्यानं बोझा पडतो काय? आमचीच पेन्शन बंद केल्यानं विकास खुंटतो काय? आम्हीच सरकारचे शत्रू आहोत काय? अन् आम्हाला जगण्याचा अधिकार नाही काय म्हातारपणात? असे अनेक प्रश्न होते. ते प्रश्न निरंजनला सतावत होते. त्यावर तो सरकारला म्हणत असे की ते प्रश्न आम्हाला मांडायचे नाहीत. तुमच्या पेन्शनबाबत निंदाही करायची नाही. केवळ आमचंच बोलतोय. आम्ही जर वयाची अठ्ठावन वर्ष राब राब राबतो, आपण राबवता तर आम्हाला आमच्या म्हातारपणाचा आधार म्हणून पेन्शन द्या. आमच्या हक्काची पेन्शन द्या. फुकटाची पेन्शन नको. मग तुम्ही सर्व पक्ष तिकडं

कोणतंही राजकारण करा. आम्हाला तुमच्या राजकारणाशी काहीएक घेणंदेणं नाही.

निरंजन एक सरकारी नोकरी करणारा व्यक्ती. तो २००५ पासून सरकारी नोकरीवर लागला होता. ब-याच दिवसापासून त्याच्या मनात जुन्या पेन्शनचा मुद्दा खटकत होता. त्यालाही वाटत होतं की इतरांसारखी आम्हालाही पेन्शन असावी.

निरंजननं पाहिला होता आपल्या आजीचा वृद्धापकाळाचा काळ. त्याची आजी राधा ही जेव्हा म्हातारी झाली होती. त्यावेळी तिची सेवा तिची पेन्शन मिळत असूनही त्याच्या वडीलानं केलेली नव्हती. तिला त्यानं हाकलून दिलं होतं. त्यातच ती आता वृद्धाश्रमात राहात होती. म्हणूनच त्याला विचार होता जुन्या पेन्शनचा. त्याला वाटत होतं की आता तर काळ बदलला आहे. उद्या आपली मुलं मोठी झाल्यावर ती आपल्या वडीलांसारखी आपलीही सेवा म्हातारपणात करणार नाही व आपल्यालाही आपले दिवस वृद्धाश्रमात काढावे लागतील वा रस्त्यावर काढावे लागतील. जर पेन्शन राहील तरच आपण जगू शकू. म्हातारपणाचा काळ सुखात काढू शकू.

*****************************

निरंजन व रंजन गोविंदची मुलं. त्यांनी आपला भुतकाळ अनुभवला होता. त्यांनी पाहिलं होतं की त्यांच्या आजीला तिच्या म्हातारपणात बोलण्याचा अधिकारच नव्हता. ती थोडीशी जरी बोलली तरी घरी कावकाव होत असे. तसं पाहता त्यांचे वडीलच नाही तर त्यांची आईही घर डोक्यावर घेत असे. तिला पेन्शन असूनही तिच्या पैशावर डल्ला मारणारे त्यांचे वडील तिच्याच पैशानं रात्री दारु पिवून येत व तिलाच छळत असत. त्यातच तिला मारतही असत.

निरंजन जेव्हा लहान होता. तेव्हा त्याला त्याची आजी आवडत असे. ती आजीच त्याची तयारी करुन देत असे कधीकधी. जेव्हा त्यांची आई वा वडील घरी नसायचे. तसं पाहता कधीकधी ती मुलं आपल्या आजीजवळ त्यांच्या मायबापांना दिसलीच तर त्या मुलांना रागानं आवाज दिला जाई व तिच्याजवळ बसू नये. तिच्याशी बोलू नये याची सक्त ताकीद दिली जाई.

निरंजन आज लहानाचा मोठा होत होता. त्याचबरोबर त्याचा लहान भाऊही. ते पाहात होते त्यांच्या आजीवर घडत असलेली परिस्थिती. जेव्हा ती आजी वृद्धाश्रमात गेली होती. त्यावेळी तिला हाकलतांना घडलेला

थरारही त्या इवल्याशा मुलांनी अनुभवला होता. ती आजी गयावया करीत होती गोविंदला. रडतही होती. परंतू ना गोविंदला तिची दया येत होती ना त्याच्या पत्नीला. त्यातच त्यांनी त्याच्या आजीचं घर असूनही तिला घराबाहेर काढलेलं पाहिलं होतं.

ते चुकत होतं त्यांच्या वडीलाचं. परंतू ती इवली मुलं काय बोलणार. तसं पाहता ती शिकत होती त्याच काळात बदल्याची भावना. विचार करीत होती की आपणही मोठे झाल्यावर आपले मायबाप म्हातारे होतील ना. तेव्हा आपणही त्यांची अवस्था अशीच करु.

आज ती मोठी झाली होती व मोठी होताच त्यांच्या आजीची जी अवस्था त्यांच्या वडीलांनी त्यांच्या बालपणात केली. तशीच अवस्था तेही आपल्या मायबापाची करीत होते. ते त्याच्या आजीला जसे त्यांचे मायबाप लहानपणी बोलत होते. तसेच आज तेही आपल्या मायबापाला बोलत होते.

ते शब्द.......ते शब्द विखारी होते. ते शब्द आज जहरासमान भाषत होते गोविंद व मिराला. तसे ते शब्द ऐकताच त्यांच्या भुतकाळाची आठवण ताजी होत असे. वाटत असे की आपण आपल्या आईला विणाकारणच त्रास दिला. आज त्या कृत्याची कर्मफळं आपण भोगतो आहोत नव्हे तर भोगावीच लागत आहेत. आज आपण दुःखी आहोत. कारण काल आपण

एका निष्पाप जीवाला दुःख दिलंय. त्याच एकमेव कारणातून ते दुःखही झेलत.

पेन्शन.......एकीकडे पेन्शनसाठी भांडण करीत होता निरंजन. पण घरी मात्र आईवडीलांना त्रास देत होता. तसं पाहता त्यानंही ठरवलं होतं की जसं त्यांच्या वडीलांनी त्यांच्या आजीला त्रास दिला. तसा आपणही द्यायचा. त्याला तसा आनंदच होत होता.

शेतकरी व शेतमजूरांनाही पेन्शन लागू व्हायला हवी. लोकांचा विचार. त्यात बेरोजगार, शेतमजूर यांचाही समावेश आहे. खरं तर सर्वांचाच पेन्शनवर अधिकार आहे. त्यात शेतक-यांनी पेन्शन मागीतली तर काहीच नवल नाही. परंतू सरकार कुणाकुणाला पेन्शन देईल. असा प्रश्न आहे.

पेन्शनबाबत लोकं म्हणतात की सरकारी कर्मचारी वर्गाला का पेन्शन द्यावी? देवूच नये पेन्शन. कारण ते एसीत राहतात. बरोबर काम करीत नाहीत. कोणाचे काम करायचे असेल तर भरमसाठ वेतन असूनही लाच मागतात. साधं झोपडीत राहात नाहीत. नोकरीत लागताबरोबर बहुतेक सरकारी कर्मचा-यांचा महाल तयार होतो. भरपूर पैसा उपलब्ध होतो त्यांच्याजवळ. तो काही गरीब नसतो. पुर्ण रुपात श्रीमंत असतो आणि श्रीमंत होत जातो.

लोकांचं म्हणणं बरोबरच आहे. कारण एकदा का कोणी व्यक्ती सरकारी नोकरीवर चढला की बस त्याची चांदीच चांदी झालेली दिसते. ही वास्तविकता आहे. तसं पाहता सरकारी कर्मचारी मोठं वेतन असूनही व त्यांचं कर्तव्य असूनही जेव्हा सामान्य माणसांची कामं करीत नाहीत.पैसे मागतात. तेव्हा विचार येणं साहजीकच आहे. त्यामुळंच त्यांना म्हणायला जागा मिळते की या लोकांना कशाला हवी पेन्शन? याबाबत महत्वाचं सांगायचं म्हणजे सरकारी कर्मचा-यांनी विचार करायला पाहिजे की आपण कसं वागावं. कसं वागायला हवं. त्यांनी व्यवस्थीत वागायला हवं. त्यांनी असं समजायला हवं की आपण सामान्य लोकांचे देणे लागतो. त्यांनी भरलेल्या करातून आपल्याला वेतन मिळत असतं. म्हणूनच आपण सामान्यांना चिंताग्रस्त करु नये. त्यांच्याकडून पैसे घेवून कामं करु नये. त्यांची कामं व्यवस्थीत व काळजीपूर्वक करावीत. तसंच इमानदारीनं करावीत. परंतू ते तसं करीत नसल्यानं सरकारी क्षेत्र बदनाम झालं आहे. तशीच लोकांना म्हणायलाही जागा निर्माण झाली आहे.

सरकारी नोकरांना बोलावच लागतं. असं काही लोकांचं म्हणणं. काही लोकांचं म्हणणं असं की ते काही गरीब असतात का? त्यांचा इतिहास पाहा. ते श्रीमंतच असतात. होय, तेही बरोबरच. काही काही मंडळी ही नोकरीवर लागतांना अतोनात पैसा मोजत असतात अर्थात आजचा सरकारी नोकरीवर

लागण्याचा दर पाहता पन्नास ते साठ लाखाच्या घरात आहे. आज सरकारी नोकरीवर असणा-या लोकांचा आकडा पाहता एका एकाच्या घरात आज दोन दोन चार चार लोकं सरकारी नोकरीवर असतात. सरकारी नोकरीवर केवळ नोकरी करणा-यांचीच मुलं लागतात असं नाही तर ज्यांच्याकडे शेती आहे. ती शेतक-यांचीही मुलंही लागतात. ते शेतकरी आपली शेती विकून आपल्या मुलांच्या नोकरीसाठी डोनेशन भरतात व त्यांना सरकारी नोकरीवर लावतात. म्हणूनच सरकारी नोकरीबाबत लोकांचा संभ्रम आहे. ही एक बाजू आहे. दुसरी बाजू अशी आहे की सरकारी नोकरीवर केवळ श्रीमंतच लागतात असे नाही तर स्पर्धा परीक्षा देवूच गरीबांची मुलंही लागतात. त्यात विसंगती नाही. अशी बरीचशी मुलं सरकारी नोकरीवर आहेत. मात्र सरकारी नोकरदार वर्ग, बरोबर वागत नसल्यानं आजही लोकं जे ताशेरे सरकारी नोकरदारावर ओढतात. तसं ओढायला नको. कारण त्यात बहुतःश शेतकरी व शेतमजूरांचीच उच्च शिकलेली मुलं आहेत. नोकरीवर असलेल्यांची नाही. कारण स्पर्धा परीक्षेत हीच मुलं टिकतात. बहुतांश नोकरदारांची नाही असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. आता प्रश्न हा पडतो की नोकरदार वर्गाला पेन्शन. मग आम्हाला का नाही? आम्हालाही द्या पेन्शन. शेवटी पेन्शनचा विचार करीत असतांना शेतकरी पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरतो. तो आपल्या व्यथा मांडतो. म्हणतो की त्याला बरोबर पीक

होत नाही. तो जन्माच्या दहा वर्षापासून तर मरेपर्यंत शेतात राब राब राबत असतो. ऊन, वारा, पाऊस सारंच झेलत असतो. तो दिवसाचे चोवीसही तास काम करतो. रात्रीही तो शेताला पाणी द्यायला जातो. रात्रीला शेतात जावून प्राण्यांपासून शेतमालाचं रक्षण करतो. त्याला आराम नाही. कधी त्याचेवर वाघ, सिंह हल्ले करतात. कधी सापासारखे प्राणी चावा घेतात. कधी विंचवासारखे प्राणी चावल्यानं वेदना होतात. कधी त्याला आत्महत्या करावी लागते. उलट सरकारी नोकरदारांना आत्महत्या करावी लागत नाही. त्यांना कोणताही प्राणी चावत नाही. त्यांना रात्री वा उन्हातान्हात वा पावसात कोणताही त्रास सहन करावा लागत नाही. तरीही पेन्शन हा संभ्रमाचा प्रश्न निव्वळ त्यांच्यातच नाही तर अनेकात निर्माण होते. त्यातूनच हा सुर निघतो. नोकरदारांना पेन्शन नको. त्याही पुढे जावून आम्हाला पेन्शन का नाही?

आम्हाला पेन्शन का नाही? या प्रश्नावर विचार करतांना मुख्य घटकाकडे वळतो. सन २०१४ व २०१५ च्या सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या सरकारच्या टिपणीनुसार शेतकरी वर्ग, त्यात शेतमजूर, मजूर, बेरोजगार सर्वच आले. त्यांची लोकसंख्या ९४% आहे व सरकारी नोकरदारांची लोकसंख्या फक्त ६% आहे. अर्थातच शेतकरी व शेतमजूरांची व बेरोजगाराचीच संख्या जास्त आहे. यात मोठे शेतकरी २.३०%, मध्यम

शेतकरी २५.२०%, अल्पभूधारक २७.९०% व लहान शेतवाले ४४.५०% आहेत. यातही समजा शेतकरी वर्गाला पेन्शन दिलीच तर बाकीची मंडळी म्हणजे बेरोजगार व शेतमजूर व मजूर ओरडतीलच. मग सरकार कोणाकोणाला पेन्शन देणार. कोणी महाभाग म्हणतात की आम्हाला फक्त पाचच हजार पेन्शन द्या. आता हिशोब जर लावला गेला पेन्शनबाबत तर ६% टक्के लोकांना पेन्शन देणं परवडेल की ९४% लोकांना. ही विचार करणारी बाब आहे. आता यावर लोकांचं म्हणणं असं की सरकारी सेवकांनाच का देता पेन्शन. त्यांना तर पाचच दिवस आठवड्याचं काम असतं. तसंच सरकारी सुट्ट्याही असतात. परंतू यात जावे त्याच्या वंशा याप्रमाणे असं मेंदूचं काम असतं की तो मेंदू अगदी गरगरायला लागतो. वेडं होण्याचा संभव असतो. तसंच सतत बसावं लागत असल्यानं पोटाचे विकार व अनेक व्याध्या जकडतात. त्यामुळं मेंदू शाबूत तर सारं काही शाबूत याप्रमाणे त्यांच्या मेंदूला आराम मिळावा वा शरीराचा थकवा निघावा म्हणून त्यांना सुट्ट्या असतात वा पाचच दिवस काम असतं. शिवाय त्यांच्या याच मेंदूची झीज झाल्यानं उतार वयात त्यांची प्रकृती बरी राहात नाही. व्याध्या जकडतात. म्हणून उपचारार्थ आधार म्हणून पेन्शन. ती हालत वृद्धापकाळी पाहिजे त्या प्रमाणात शेतकरी वा शेतमजूरांची होत नाही.

त्यांच्या शरीरातून घाम निघत असतो सतत काम करीत असतांना. कारण ते मेहनतीचं काम असतं. त्यामुळं ते म्हातारपणातही थोडे धडधाकट असतात.

महत्वाचं सांगायचं म्हणजे आज सरकारी नोकर पेन्शन जरी मागत असले तरी या सरकारी क्षेत्राकडे कालही लोकं जात नव्हते. आजही लोकं जायला पाहात नाहीत. मध्यंतरीचा काम बरा गेला. साधे एम बी बी एस शिकलेला डा ॅक्टर सरकारी कार्यालयात काम करायला पाहात नाही. तो खाजगी रुग्णालयात काम करतो. परिणामतः सरकारी नोकरीही असेल ती. तरीही सोडतो. तसंच ग्रामीण भागात तर साधा बी ए एम एस डा ॅक्टरही पाय ठेवायला तयार होत नाही. हे झालं डा ॅक्टरी क्षेत्रातलं. परंतू अशी बरीचशी पदं अशी आहेत की ज्या पदावर माणसं काम करायला पाहात नाहीत. प्रसंगी राजीनामे देतात. यात सरकारची कामं अडतात. अशांनी राजीनामे देवू नयेत व सरकारची कामं अडू नयेत. तसंच लोकांनी सहजपणे शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागातही काम करावं म्हणून सरकारनं पेन्शनसारखी योजना आणली. याचा परिणाम हा झाला की सरकारी नोकरीत पेन्शनच्या आवडीनं का होईना लोकांनी यावं म्हणून पेन्शन.

आज सरकारी क्षेत्रात स्पर्धा चाललेली आहे. बहुतांश सरकारी नोक-या लागतांना दिसत नाही. त्यामुळं आज बरीचशी मंडळी सरकारी नोकरी मिळावी म्हणून शिकत नाही. तो आज खाजगी नोकरीच्या मागे लागलेला

आहे. ज्यात पेन्शन नाही. परंतू जास्त प्रमाणात पैसा आहे. त्यातच आजच्या काळात पेन्शनकडे कोणी पाहात नाही. अशावेळेस नोकरीची महकता वाढविण्यासाठी कोणी सरकारी कर्मचारी संप करीत असेल तर त्यात वावगं ठरु नये.

महत्वपुर्ण वस्तूस्थिती ही लक्षात घेण्यासारखी आहे ती ही की सरकारी क्षेत्र आहेत. म्हणून सरकारची कामं होतात. आपलीही कामं होतात. जर ते नसते तर सरकारचीही कामं अधूरी असती आणि आपलीही, यात शंका नाही. त्यामुळं सरकारी क्षेत्राबाबत वा सरकारी नोकरदार वर्गाबाबत कोणीही ताशेरे ओढू नयेत. ते आहेत म्हणून गरीबांपर्यंत काही सरकारी योजना तरी पोहोचतात. त्यामुळं तेच गरीबांचे आधारस्तंभ आहेत. आपले जीवलग मित्र आहेत. शेतकरी, शेतमजूर वर्गाचे मसीहा आहेत असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. ते आहेत म्हणून आपण आहोत. ते जर नसते तर आपल्याला आजही कुणी विचारलेलं नसतं.

शेतकरी व शेतमजूरांनाही पेन्शन लागू व्हायला हवी. लोकांचा विचार. सरकारी कर्मचा-यांचाही विचार. त्यात बेरोजगार, शेतमजूर यांचा समावेश नाही. परंतू तेही पेन्शन मागणार नाहीत कशावरुन? खरं तर सर्वांचाच पेन्शनवर अधिकार आहे. परंतू सरकार कुणाकुणाला पेन्शन देईल. याचाही

विचार व्हायला हवा. निव्वळ पोकळ बोलण्यात काही अर्थ नाही हे निर्वीवाद सत्य आहे आणि सत्य मानावेच लागेल. यात शंका नाही.

********************************

ती पश्चातापाची विचारचक्रे गोविंदच्या मनात निर्माण झाली होती. तसा त्याला विचार येत होता आपल्या आईचा. त्याची आई राधा लढली होती. तिनं प्रत्येक मायबापाला मुलांकडून पेन्शन मिळवून दिली होती. तसंच मालमत्ताही विकण्याचा वा ताब्यात घेण्याचा अधिकार मिळवून दिला होता.

निरंजन सरकारी नोकर होता. परंतू त्यानं ठरवलं होतं की आपण आपल्या बापाला शिक्षा द्यावी. त्याचं कारणही होतं. तसंच त्याला वाटत होतं की जर आपण आपल्या मायबापाला शिक्षा दिली नाही तर जगातील सर्वच मुलं आपल्या मायबापाला त्यांच्या म्हातारपणात त्रास देतील. जर मी त्यांच्या तरुणपणातील कर्माची शिक्षा मायबापाला दिली तर जगातील सर्व तरुण वर्ग त्यापासून बोध घेवून तो तरुणवर्ग आपल्या मायबापांना त्रास

देणार नाही. हे निरंजनचं मत होतं. त्यामुळं तो त्याच स्वरुपाचा त्रास देत होता.

निरंजनचा तो त्रास. शेवटी कंटाळून एक दिवस गोविंद आपल्या पत्नीला घेवून आपल्या लहान मुलाकडे राहायला आला.

लहान मुलगा रंजन. तोही आपल्या भावाच्याच विचाराचा होता. त्यानंही आपल्या डोळ्यासमोर पाहिलं होतं आपल्या आजीला होत असलेला त्रास. त्यामुळंच अगदी लहानपणापासूनच तेच बाळकडू त्याच्या रक्तात भिनले होते. तसा तोही आपल्या मायबापाला त्रास देत होता.

रंजनही सरकारीच नोकरीवर होता. ते शिकले होते त्याच्या आजीच्या कृपेने. ते मोठे होईपर्यंत त्याची आजी त्यांचेजवळ होती. बाप अखंड दारु पिवून राहायचा हेही त्यांनी अनुभवलं होतं.

रोजच भांडण होत होती त्यांच्या घरी. जावं तर कुठं जावं. गोविंद व त्याची पत्नी मिरा. दोघांनाही विचार येत होता. शेवटी आपण केलेल्या कर्माचीच ही शिक्षा होय, असं मानून ती मंडळी झेलत होती त्या वेदना. काय करावं, कसं करावं हा विचार पदोपदी त्यांच्या मनात असायचा. निघून गेल्यास आपण निरंजनकडे जावू शकत नाही. असं त्यांना वाटत होतं.

तो म्हातारपणाचा काळ. काम काही बनत नव्हतं. काय करावं हा विचार यायचा. अशातच एक दिवस रंजनचं गोविंदशी कडाक्याचं भांडण झालं व त्यानंही ज्याप्रमाणे त्याच्या आजीला त्याच्या बापानं घराबाहेर काढलं होतं. तसं त्यानंही आपल्या मायबापाला घराबाहेर काढलं व मागील प्रकरणाची पुनरावृत्ती झाली. असंच त्याच्या बापानं म्हणजेच गोविंदानं त्याच्या आजीला घराबाहेर काढलं होतं.

असाच तो दिवस उजळला. या दिवशी झालेलं गोविंदाचं रंजनसोबतचं भांडण. ते भांडण होताच रंजननं आपल्या बापाला घराच्या बाहेर काढलं. पुन्हा कधीही घरात न घेण्यासाठी. आता मात्र गोविंदप्रसाद व मिरा रस्त्यावर आले होते. त्यांना काहीच सुचत नव्हतं.

तो गर्दीचा रस्ता. तो रस्ता मुळातच विराण वाटत होता गोविंदाला. त्या रस्त्यावर वर्दळ होती. परंतू गोविंदाला दुःख असल्यानं तो रस्ता विराण तर वाटतच होता. परंतू खायलाही धावत होता.

भूक........भूक फारच लागली होती. काय करावं सुचत नव्हतं. वृद्धाश्रम होतं त्याच्या आईचं. तेही लेकराच्या नावावर केलं होतं. मालमत्ता होती. तिही लेकरानं प्रेमाप्रेमानं नावावर केली होती.

ती मालमत्ता.......अगदी प्रेमाप्रेमानं लेकरांनी आपल्या नावावर केली होती. त्यावेळी लेकरांचा डाव समजला नव्हता. परंतू आज ते सारं समजत होतं.

ते त्या शहरातील लोक. सारे भिरभिर पाहात होते त्यांच्याकडे. सरकारनं योजना आणल्या होत्या. परंतू आज काही उपयोग नव्हता. त्यांना ते जीवन कापतांना आत्महत्या कराविशी वाटत असे.

****************************

भारत आत्मनिर्भर बनवूया. स्वतंत्र भारताचं स्वप्न. त्याच अनुषंगानं देशाचे पंधरावे पंतप्रधान यांनी ब-याच योजना आणल्या. त्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले.

आत्मनिर्भर......आत्मनिर्भर याचा अर्थ कोणावरही विसंबून न राहणे. मग तो गैस सिलेंडर असो वा नोकरी असो वा आणखी काही. आता कोणी म्हणतात की सरकारनं उज्वला योजनेंतर्गत सिलेंडर फुकटात दिलं. परंतू आज सिलेंडर आणला असला तरी त्याचे भाव किती वाढवले. त्यामुळंच देशात प्रदुषणमुक्त देशाला करु पाहणा-या देशाला अडचण येत आहे. कारण

गृहिणी सिलेंडर घ्यायला एवढा पैसा आणणार कुठून? हं, एक होवू शकते. पुर्वी जो कोळसा स्वस्त मिळायचा वा पुर्वी लाकडं वापरली जायची स्वयंपाकाला. ती लाकडं वा कोळसा आजही वापरतात सिलेंडर महाग असल्यामुळेच. त्यामुळंच प्रदुषण. मग देशात प्रदुषणमुक्ततेचा सवालच उरत नाही. कारण सिलेंडर महाग आहे.

सिलेंडर जसा महाग आहे. तसंच पेट्रोलही महाग आहे. म्हणून सरकारनं त्यावर पर्याय आणला व प्रदुषणमुक्त देश व्हावा म्हणून चार्जींगच्या इलेक्ट्रॉनिक गाड्या आणल्या. तरीही लोकं महाग पेट्रोल न पाहता गाड्या वापरतात ना. एकीकडं म्हणतात की महागाई आहे आणि दुसरीकडं महागाई दाखवत नाहीत लोक. आजची महागाईची स्थिती पाहता प्रत्येकाचं अकाऊंट आधारकार्डला लिंक आहे. प्रत्येकाच्या खात्यात काही ना काही पैसे आहेत. तसंच जिथं राशन मिळत आहे ना फुकटात. तिथं लोकं मोटारगाड्यावर येतात. त्यावेळेस त्यांच्या कानात हेडफोनची वायरं असतात व हातात स्मार्टफोन असतो. तोही चांगला पंधरा ते वीस हजाराचा. कुठं आहे महागाई?

आता नोकरीचं सांगतो. कोणी म्हणतात की सरकार नोकरी द्यायला यशस्वी ठरलं नाही. सरकारनं कोणालाही रोजगार दिलेला नाही.

रोजगार.......रोजगार सरकार कसं देईल? याबाबतीत उदाहरण द्यायचं झाल्यास सरकारनं आधीच आत्मनिर्भर शब्दाचा वापर केला. म्हटलं की देशाला आत्मनिर्भर बनवणार. मग यात रोजगार देण्याचा प्रश्नच आला कुठून? रोजगार देणे म्हणजे लोकांची बाजू कमकुवत करणे. अर्थातच ज्याचेकडे नोकरी मिळवली. त्याचेकडे गुलाम म्हणून राहणे. याबाबतीत आणखी एक उदाहरण देतो की रोजगार देणे याचा अर्थ बापानं मुलाला जन्म देणं. लहानाचं मोठं करणं. त्याचं लग्न करुन देणं. त्याला नोकरीवरही लावून देणं. अर्थात त्याचं तो मोठा झाल्यावरही सारं पुरं करणं. का? तो मोठा झाल्यावर का त्याला उन्हातून सावलीत न्यायचं? का त्याचे लाड करावे? तो अठरा वर्षाच्या वर झाल्यावर का त्याला दूध पाजल्यागत नोकरी लावून द्यावी? त्यानं स्वतःच्या भरवशावर नोकरी मिळवू नये काय? त्याला मोठा झाल्यावर विचारशक्ती आली नसते काय? त्यानं काहीच करु नये काय? सगळं काय मायबापानंच करावं काय? सरकारचाही विचार तोच आहे. सरकार विचार करते की देशाच्या स्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्ष झाली. तरीही या देशातील युवावर्गानं, देश अर्थात बापाला मला काम द्या म्हणून नोकरी मागावी. का त्या युवावर्गानं आत्मनिर्भर होवू नये काय? सरकार नोकरी देईल म्हणून का सरकारवर विसंबून राहावं?

महत्वाच म्हणजे आपल्या शिक्षणाच्या भरवशावर युवावर्गानं कोणतेही उद्योग उभारावेत. सरकार कर्ज देतेच उद्योगधंद्यासाठी. त्याचा वापर करावा उद्योग थाटण्यासाठी. जसा बाप काही पैसे आपल्या लेकराला त्यानं उद्योग थाटावा यासाठी देतो तसा. याबाबतीत महत्वाचं सांगायचं म्हणजे देशातील युवावर्गानं आता शिकतांना नोकरी वा रोजगार मिळेल म्हणून शिकू नये तर त्यांनी स्वतःच स्वतःच्या पायावर कसं उभं राहता येईल यासाठी शिकावं. तसंच शिक्षण तेवढं घ्यावं. जेणेकरुन कोणीही माणूस आपल्याला मुर्ख बनवणार नाही. हीच आत्मनिर्भरता प्रत्येक तरुणांमध्ये आली पाहिजे. यासाठीच सरकार तरुणांच्या रोजगाराचा विचार करीत नाही.

आता देशातील पेन्शनचा विचार करु. सरकार पेन्शनही समाप्त करण्याच्या मार्गावर आहे. कारण यातही सरकार लोकांना आत्मनिर्भर बनवू पाहात आहे. सरकारला हेच म्हणायचं आहे की आपण म्हातारे झालो तर काय झालं. आपण लेकरांवर अवलंबून राहावं काय? याबाबतीत सांगताना सरकारचा विचार हा की एकतर आपल्या मुलांना संस्कारक्षम बनवा की ती म्हातारपणात आपली सेवा करतील. नाहीतर तुम्ही स्वतः सक्षम बना. याचा अर्थ असा की आपली संपत्ती कमवून ठेवा. मुलांना देवू नका. ती वृद्धापकाळात तुमच्याच कामात येईल. परंतू आपण काय करतो. आपण आपल्या मुलांच्या प्रेमाखातर मुलांना देतो सर्व संपत्ती आणि म्हातारपण

यायच्या पुर्वीच आपली संपत्ती नष्ट करतो. मग म्हातारपण येतं व आपलीच मुलं आपली सेवा करीत नाही. कधीकधी तरुणपण असतं तेव्हाच आपण आपल्या म्हातारपणाची शिदोरी न कमवता आपल्या शौकावर उध्वस्त करतो आपण कमवीत असलेला पैसा. कोणी दारु पितात. कोणी बारमध्ये जातात. कोणी आणखी कुठे कुठे. ते सांगणे कठीण आहे. मग पैसा समाप्त होतो व म्हातारपणात पेन्शन नसल्यानं भीक मागायची पाळी येते. पेन्शनधारी वर्गाचीही तीच हालत आहे. पेन्शन आहे म्हणून ही मंडळीदेखील अगदीच उमेदीच्या काळात त्यांना मिळणारा पगार खर्च करतात. यात्रा करतात. विनाकारण प्रवास करतात. तसंच मोठमोठ्या हाॅटेलात जेवनासाठी पैसा खर्च करतात. ही शोकांतिकाच आहे.

याबाबत विधवांचाही प्रश्न मांडणं गरजेचं आहे. सरकार विधवांनाही आत्मनिर्भर बनवू पाहात आहे. कारण सरकारच्या एक गोष्ट अलीकडील सर्वेक्षणातून लक्षात आली आहे की काही काही विधवा स्रिया आपला विवाह करुन मोकळ्या होतात. परंतू सरकारकडून पैसा मिळते म्हणून त्या विवाहाला जायज करीत नाहीत. काही परितक्ताही याच स्वरुपाच्या आहेत हे कौटुंबिक न्यायालयात दाखल घटस्फोटाच्या करण्यात आलेल्या खटल्यातून दिसून येत आहे.

सरकारनं देशातील नोकऱ्यांचं खाजगीकरण करण्याचं ठरवलं आहे. रेल्वे विद्यूत आणि सा-याच क्षेत्रात हळूहळूच खाजगीकरण आणत आहे आणि म्हणत आहे की देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्ष झाली, आतातरी सुधरा. आत्मनिर्भर बना. केव्हापर्यंत पेन्शनच्या आणि सरकारी नोकरीच्या कुबड्या वापराल.

सरकारचंही म्हणणं बरोबरच आहे. कारण सरकारी नोकरी करणं वा पेन्शन मिळवणं ही सरकारची कुबडीच आहे. परंतू ती जर सोय नसेल ना, तर गरीब दारिद्र्यरेषेखालील वा अनुसूचित जाती जनजातीचे लोकं पुढं कधीच येणार नाहीत. आज देशाला पंच्याहत्तर वर्ष स्वातंत्र्य होवून झाली असली तरी आजही देशातील सोई सुविधांचा लाभ विशिष्ट वर्गानंच घेतला. जो धनीक होता. गरीब आणि अनुसूचित जाती जमातीला अजुनही मिळालेलाच नाही. त्यांना अजुनही सरकारी नोकरी वा पेन्शन ह्या भाकडकथाच वाटतात. ते आजही शिकत नाहीत उच्च शिक्षण. शिक्षणाच्या सोई आहेत तरी आणि पेन्शन सारख्या सुशिधा आहेत तरी. ती मंडळी पेन्शन मिळते म्हणून नोकरीही पत्करत नाहीत. त्यामुळंच आजही काही काही सरकारच्या कार्यालयात उमेदवार मिळाला नाही असं लिहून अनुसूचित जाती जमातीचे उमेदवार वगळून दुसरेच उच्च जातीचे उमेदवार नोकरीवर लावले जातात किंवा जाती बदलवल्या जातात. जसे तेली-

तिरमल, कुंभार-कमार, कोष्टी-हलबा. अशी बरीच उदाहरणं आजही आहेत. आजही काही काही ठिकाणी प्रत्यक्ष या जातीची चांगली कसून तपासणी केली तर आजही बिंग फुटतं. परंतू सरकार यावर मौन बाळगून आहे. त्यामुळंच झाकली मूठ सव्वालाखाची आहे. म्हणूनच खाजगीकरण. कारण प्रत्यक्ष लाभच लाभार्थ्यांना मिळत नाही. परंतू खाजगीकरण केल्यास आज जे काही या समाजाला वा गरीबांना मिळत आहे. ते उद्या मिळणार नाही. त्यामुळंच आज जी स्थिती आहे, ती राहणार नाही. एक श्रीमंत गरीब दरी निर्माण होईल. अनुसूचीत जाती जमाती तर दूरच राहिल्या.

समजा सरकारी नोक-या उद्या नसतील तर श्रीमंत आणखी श्रीमंत व गरीब आणखी गरीब बनतील. आज वाव तरी आहे गरीबांनाही आपल्या हुशारीनं वर जाण्यासाठी. परंतू उद्या सरकारी नोक-या नसल्यानं जी दरी निर्माण होईल, त्यामुळंच स्वतंत्रता संपेल व गुलामगीरी शाश्वत स्वरुपात जोर पकडेल ही शक्यता नाकारता येत नाही.

*******************************

गोविंद विचार करीत होता. आत्महत्या करु नये. आपणही लढावं आपल्या आईसारखं. आपणही आपल्या मुलांना धडा शिकवावा. जशी आपली आई आपल्याला धडा शिकविण्यासाठी लढली आणि लढतांना आपल्याला धडा तर शिकवला, व्यतिरीक्त संपूर्ण जगालाही त्यांच्या मुलाविरूद्ध न्याय मिळवून दिला. आपणही तसंच करावं अगदी. आपणही लढा उभारावा कोर्टात.

त्यांचा तो विचार. विचार होता मुलांवर खटला उभारायचा. परंतू पैसा. पैसा कुठून आणायचा. प्रश्न होता. आपल्याजवळ तर आज घडीला पैसा नाही. काय करावं. आपल्या आईला पेन्शन होती. म्हणून ती लढली. आपण कसं लढावं?

विचार होता पैशाचा. तसा विचार करता करता मार्ग सुचला. मार्ग, आपण प्रसंगी भीक मागावी व तो कोर्टात केस दाखल करावी. त्याच पैशानं लढावं कोर्टात आणि धडा शिकवावा. आपल्या मुलांनाच नाही तर आपल्यासारख्या इतर बेधुंद वागणा-या मुलांना जाब विचारण्यासाठी.

त्याचा तो विचार. तसे ते दोघेही जण भीक मागू लागले रस्त्यारस्त्यावर. थोड्याच दिवसात ब-यापैकी पैसा गोळा झाला. तसा त्यानं एक वकील पकडला व तो लढू लागला केस.

ती केस. आज त्याला केस लढतांना नाकीनव येत होतं. त्यातच कधी भीक मिळायची कधी मिळायची नाही. तसं पाहता भीकंतून आलेल्या पैशातून तो आपला पोट भागवत होता. तसाच उरलेला पैसा तो खटल्यालाही लावत होता.

तो खटला. तो खटला चालत होता. फैरीवर फैरी झडत होत्या. लढा होता आपल्याला आपल्या मुलानं पोषावं यासाठी नाही तर लढा होता जी मुलं आपल्या मायबापाला पोषत नाही, त्यांना सरकारी नोकरी मिळू नये यासाठी. लढा होता, ज्यांची मुलं पोषत नाही, त्यांना असलेली सरकारी नोकरी काढून टाकावी यासाठी.

ती मुलं......... त्यासाठी लढत होती ती मुलं. त्या मुलांना बदला काढायचा होता. तसं पाहता सारा इगो प्राब्लेम.

आज नाकीनवच येत होती मायबापाची केस. वरुन पेन्शनसाठी लढत होती ती मुलं. त्यांना म्हातारपणात पेन्शनचा आधार हवा होता त्यांना पोषण्यासाठी. परंतू कोण पोषणार. त्यांच्या मायबापाचा तर विरोध होता जी मुलं पोषत नाही त्यांच्यासाठी. त्यांना नोकरीच राहू नये यासाठी. पेन्शनचा लढा धार पकडत होता. खाजगीकरणाला विरोध होता त्यांचा. सरकार खाजगीकरण करु पाहात होते. सरकार खाजगीकरणातून साकार करु पाहात

होते नवी ध्येय धोरणं. ते आत्मनिर्भर करु पाहात होते देशाला. आत्मनिर्भरतेचा सरकारचा डाव. तसा नोकरदारांचा पेन्शनसाठी लढा. त्यातच मायबापाचा पेन्शनच नाही तर सरकारी नोकरी हटावचा लढा. सारेच लढे संभ्रम निर्माण करणारे होते. अशातच नवीन असा आदेश आला समन्वय समितीचा. सरकार पेन्शनवर विचार करेल व सरकार पेन्शनबाबत योग्य निर्णय घेईल व लवकर पेन्शनबाबत योग्य निर्णय देईल.

सरकार निर्णय देईल लवकरच असा निर्णय देताच सारे लोकं चूप बसले. त्यांनी पेन्शनचा लढा मिटवला. संप मिटला व सर्व कर्मचारी आपआपल्या नोकरीवर रुजू झाले.

तीन महिने झाले होते. त्यामुळं सरकार काही पेन्शन देण्याच्या मार्गावर नव्हते. तसं पाहता सरकारवर विश्वास ठेवून कर्मचारी वर्गानं गत तीन महिण्यापुर्वी संप मिटवला होता. परंतू आज तीन महिने झाल्यानंतरही सरकार त्यावर मार्ग काढू शकत नव्हते. म्हणूनच आजही कर्मचारी वर्गाच्या मनात रोषच होता.

आज पुन्हा कर्मचारी वर्ग भडकला होता. त्यातच तो पुन्हा संप करण्याच्या तयारीत होता. तोच संप करु नये म्हणून सरकारनं आणखी एक कायद्याचं पिल्लू बाहेर काढलं. जो कोणी संप करेल, त्याला सरकारी

नोकरीवरुन काढून टाकण्यात येईल. कारवाई होईल. तसं पाहता संप करण्याचा कोणालाही अधिकार नाही.

आज कोणीही संप करु नये म्हणून सरकारनं काढलेला फतवा. तसं पाहता कोणीही आपल्यावर कारवाई होईल म्हणून संपावर जावू पाहात नव्हते. मात्र निरंजनला वाटत होतं की संप जर केला नाही तर आपल्याला जुनी पेन्शन देण्याच्या योजना लागू होणार नाही. आपला आवाज दडपण्यासाठी सरकारनं दबाव टाकलेला आहे की जो कोणी संप करेल, त्याला नोकरीवरुन काढून टाकण्यात येईल.

निरंजनला तसं वाटू लागताच तोही चूप बसला काही दिवस. कारण त्यालाही भीती होती की आपली सरकारी नोकरी जावू नये. अशातच निकाल आला.

गोविंद कोर्ट जिंकला होता, जो कोणी आपल्या मायबापाची सेवा करणार नाही. त्याला नोकरीवरुन काढून टाकावं. त्याला सरकारी नोकरीवर ठेवू नये. तसंच जो कोणी मायबापाची सेवा करीत नसेल, त्याला सरकारी नोकरी देखील सरकारनं देवू नये.

तो निकाल........ तो निकाल सरकारसाठी फायद्याचा होता. तसं पाहता सरकार आधीपासूनच खाजगीकरणाकडे वळलं होतं. त्यातच तो

निर्णय. तो निर्णय सरकारला सुगीसारखाच वाटला. सरकारनं त्यावर बडतर्फीचं शस्त्र उगारलं. त्यांनी त्या निर्णयावर देशातील अशा तरुणांची माहिती मागीतली की जे सरकारी नोकरीवर आहेत, परंतू मायबापाची सेवा करीत नाहीत. मायबाप हयात आहेत की नाही आणि आहेत तर नेमके कुठे आहेत. याचं प्रमाणपत्र सरकारनं सर्व सरकारी कर्मचारी वर्गाला सादर करायला लावलं.

ती माहिती. सर्व शासकीय कर्मचारी वर्गानं ती माहिती प्रशासनाला दिली. त्याचबरोबर निरंजन आणि रंजनही ती माहिती दिली. तशी सत्य बाब प्रशासनाच्या लक्षात आली. मग काय, सरकारनं बडतर्फीचं शस्त्र उगारलं व कालांतरानं रंजन व निरंजनला सरकारनं नोकरीवरुन काढून फेकलं. अशी बरीचशी मंडळी सरकारी नोकरीवरुन निघाली. सरकार केवळ यावरच थांबली नाही तर सरकारनं आणखी एक अट आणली. नोक-या काढल्या, परंतू जो कोणी आपले मायबाप जवळ असल्याचं प्रमाणपत्र सादर करीत नाहीत, त्यांना सरकारी नोकरीत घेवू नये असाही आदेश काढला.

सरकारचा तो आदेश. त्यात मायबापाचा फायदा झाला. जो कोणी मायबापाची सेवा करीत नव्हता. त्याला नोकरीवरुन काढून टाकलं जाई. तसंच जो मायबापाची सेवा करीत होता, त्याला नोकरी दिली जाई. तसंच

आपण जर मायबापाची सेवा केली नाही तर आपली सरकारी नोकरी जाईल. त्यातच याच हेतूनं सर्वजण मायबापाची सेवा करु लागले.

***********************

निरंजन व रंजनही नोकरीवरुन खाली बसले होते. सरकारनं त्यांची नोकरी काढून टाकली होती व ताकीद दिली होती की त्यांनी जर मायबापाला शोधून जवळ आणलं तर त्यांना सरकारी नोकरीवर पुन्हा घेवू. अन्यथा त्यांची वाट लावली जाईल. ती सरकारी नोकरी. त्या सरकारी नोकरीचा विचार रंजनच्या मनात होता. तसा निरंजन स्वाभीमानी होता. त्याला वाटत होतं की काहीही झाले तरी चालेल, परंतू आपल्या आजीला ज्या मायबापानं त्रास दिला, त्या मायबापाला जवळ करायचं नाही. परंतू रंजनला वाटत होतं की मायबाप जगणारच किती दिवस. आपण मायबापाला शोधावं. माफी मागावी व जवळ आणावं व मायबापाची सेवा करावी. तोच हेतू अनुसरुन रंजन आपल्या मायबापाला शोधत होता. अशातच तो दिवस उजळला. रंजन एका मंदीरात जात होता. तसा तो उदास राहायचा सरकारी नोकरी गेल्यापासून . तसं पाहता हाताला काम नव्हतंच

त्याच्या. सर्वकाही नशिबाचा फेरा समजून तो जगत होता. अशातच तो आज एका मंदिरात गेला असता त्याला तिथं त्याचे मायबाप दिसले. तसा तो पुरता बदलला होता, त्यामुळं मायबापानं त्याला ओळखलं नाही. परंतू मायबापाला त्यानं ओळखलं. त्याचे मायबाप भिकारी अवस्थेत होते व ते त्या मंदीराच्या पायरीवर भीक मागत होते.

रंजननं◌ं मायबापां◌ंना ओळखताच तो त्यांच्या पायावर नतमस्तक झाला. त्यानं आपल्या मायबापाची माफी मागीतली व त्यांना आपल्या घरी घेवून आला व तो मायबापाची सेवा करु लागला. लवकरच त्यानं आपल्या कार्यालयात तो मायबापाची सेवा करतोय याचं प्रमाणपत्र सादर केलं व तो सरकारी नोकरीवर चढला. तसं पाहता तो नोकरीवर चढल्यानं त्याचा संसार सुखी झाला होता.

रंजन सुखी झाला होता. तो मायबापाची सेवा करीत होता. त्यानं आपला स्वार्थ पाहिला होता. तसा तो सेवा जरी करीत असला तरी त्याच्या मनात स्वार्थ होताच. तो उणेदुणे विसरला होता. तो उणे दुणे विसरताच त्याला सरकारी नोकरीवर घेतले होते. मात्र निरंजन अजूनही ती आग विसरला नव्हता. त्याचे मनात आजही आपल्या मायबापानं आपल्या आजीची सेवा केलेली नसल्यानं आपण का बरं त्यांची सेवा करावी हा प्रश्न होता. तोच प्रश्न त्याला सतावत होता.

तो सरकारी आदेश. सा-यांनी माना टाकल्या होत्या. तो आदेश फार चांगला होता की जो कोणी मायबापाची सेवा करेल. त्यालाच सरकारी नोकरी आणि पेन्शनही मिळणार. पेन्शन कोणती तर आपलेच पगारातील पैसे कापावे अखेरच्या काळात आपल्याला मदत म्हणून. ती पेन्शन निरंजनला विचित्र वाटत होती. त्याला वाटत होतं की ही काय सरकारी नोकरी. ज्यात आपलाच पैसा गोळा करायचा. म्हातारपणाची शिदोरी म्हणून आणि ही काय सेवा झाली मायबापाची. जी मनातून घडत नाही. केवळ सरकारी नोकरी मिळावी वा पेन्शन मिळावी म्हणून मन मारुनमुकटून करायची. त्यातच त्याच्या मनात आणखी एक विचार होता की जी मुलं आपल्या मायबापाची सेवाच करीत नाहीत, आपल्या मायबापासारखे. त्यांची का बरं सेवा करायची. तोच प्रश्न खात होता त्याला. तिही लाचारीच. मायबापाचे गुलाम असण्याची नाही तर सरकारचे गुलाम असण्याची. हा काय कायदा झाला मायबापाची सेवा करण्याचा. सरकारी नोकरी करणा-यांचं ठीक आहे. ज्यांची मुलं सरकारी नोकरीवर लागतात वा ज्यांची मुलं सरकारी नोकरदार आहेत. ती नोकरी सुटेल या धाकानं मायबापाची एवढी सेवाही करतील. परंतू देशातील लोकसंख्या किती. तेवढ्या प्रमाणात सरकारी नोक-या आहेत का? सरकारनं नोकरीबाबत कायदा नक्कीच चांगला केला की सरकारी नोकरी मायबापाची सेवा करण्याचं हमीपत्र

दिल्याशिवाय लागू नये किंवा जो मायबापाची सेवा करीत नाही, त्याला नसावी. परंतू यात त्या मायबापांनी कुठं जावं. ज्यांच्या मुलांना सरकारी नोकरी नाही. त्यासाठी एका घरी एकच नोकरी द्यावी लागेल मायबापाची सेवा घडावी म्हणून. आज देशातील नोकरीचं सर्वेक्षण करता केवळ मायबापाची सेवा करील असं हमीपत्र देवून चालणार नाही तर प्रत्येक नोकरी कर्त्यानं वृद्धाश्रमातील दोन दोन माणसं दत्तक घ्यायला हवीत. कारण असेही काही मुलं असतात की ज्यांना मायबाप नसतात.

मायबापाची सेवा करण्याचा तो कायदा. तो कायदा चांगलाच होता. परंतू तो कायदा ज्याला मायबाप आहेत, त्यांच्यासाठीच ठीक होता. परंतू ज्यांना मायबापच नाही, त्यांनी काय करावं? त्यांनी कोणाची सेवा करावी? हा प्रश्न होता. शिवाय आज सरकारी नोकरीची शहानिशा केल्यास एका एका घरी चार चार जणं नोकरीला होते. त्यातच दोघांच्या पेन्शना सुरु राहात होत्या. जर एका परीवारात दोन मुलं असतील तर दोन मुलं, त्याच्या पत्न्या व त्यांच्या मायबापालाही नोक-या असायच्या वा पेन्शना असायच्या. सरकार यावर बोलत नव्हतं. तसे कायदे करीत नव्हतं सरकार.

निरंजनचे नोकरीबाबत काही नियम होते.

पहिला नियम होता, एका घरी एकच नोकरी द्यावी. दोन मुलं जरी असतील तरी एकाच मुलाला नोकरी द्यावी.

दुसरा नियम होता. विवाह करतांना मुलगी किंवा मुलानं सरकारला लिहून द्यावं की दोघांपैकी कोणं नोकरी करावी. पत्नीनं करावी की पतीनं. जो करणार नसेल, त्याचं हमीपत्र द्यावं. जर दोघंही करायला तयार असतील तर तो विवाह करण्याचा अधिकार ठेवू नये. तसंच दोघंही जर नोकरी करणार असतील तर दोघांच्याही नोक-या काढून घ्याव्यात.

तिसरा नियम होता की मायबापाची सेवा जो करीत असेल, त्यालाच नोकरी द्यावी. जो करीत नसेल, त्याला नोकरीच देवू नये.

चवथा नियम होता की ज्यांना मायबापच नसतील, त्यांनी वृद्ध माणसे दत्तक घ्यावी. कारण समाजात असेही काही वृद्ध आहेत की जे खरंच निराधार आहेत. ज्यांना मुलंबाळं नाहीत. त्यातही सर्वे व्हावा. कारण लोकांना मुलंबाळं असतात. परंतू पेन्शन मिळवता यावी म्हणून लोकं खोटं बोलतात.

पाचवा नियम होता, तो म्हणजे जे मायबापाची सेवा करीत नसतील, त्याला विदेशबंदी असावी. मायबापाची सेवा करण्याची वा एखादं वृद्ध निराधार दांपत्य दत्तक घेतल्याशिवाय विदेशवारीची परवानगी नसावीच.

पेन्शन देतांनाही नवीन नियम बनवावे. त्याच्या मते पहिला नियम होता. ज्यांच्या घरी सरकारी नोकरी असेल, त्याच्या मायबापाला पेन्शन देवूच नये. कडक बंधन ठेवावं की मायबापाची सेवा म्हणजे सेवा. जो करणार नाही, त्याला नोकरीच नाही. त्याला यात राजीनामा मागूच नये. त्यांची नोकरीच काढून टाकावी.

दुसरा नियम होता की एका घरी एकच पेन्शन असावी. मग ती विधवा पेन्शन असो, निराधार पेन्शन असो वा नोकरीची पेन्शन असो वा अनाथ, अपंगाची पेन्शन असो.

तिसरा नियम होता तो म्हणजे पेन्शनची सीमा असावी. सर्वांसाठी एक सीमीत रक्कम. मग तो कितीही शिकलेला का असेना. निश्चीत रक्कम सरकारनं ठरवावी व एवढीच रक्कम पेन्शन म्हणून द्यावी.

त्याचंही बरोबरच होतं. कारण पेन्शनच्या नावावर लोकं सरकारला लूटत होते. त्यात कितीतरी पैसा हा देशाचा खर्च होत होता. जो पैसा गरीबांकडून कर रुपात आकारल्या जात होता. जो देश विकासासाठी तर होता. व्यतिरीक्त तो पैसा गरीबांच्या घामाचा पैसा होता.

पेन्शन, संप आणि वेतन याच चक्रव्यूहात फसून सरकारनं खाजगीकरण आणलं होतं. जे देशाला व देशहिताला मारक होतं.

*****************************

संप.......सर्व कर्मचा-यांनी संपाचं शस्त्र उगारीत संप केला. त्यानुसार संपुर्ण देशात खळबळ माजली. त्या अनुषंगानं सरकारची झोप उडाली व त्यांनी ताबडतोब ज्या गोष्टी विचारात होत्या. खाजगीकरण करण्याच्या. त्या गोष्टी विचारात घेऊन सरकारनं पुर्ण स्वरुपात खाजगीकरणाचा जी आर पास केला. त्यावरुनच दिसून येत होतं की सरकारी कर्मचा-यांना संपाचा अधिकार नसावा. संप जर करायचाच असेल तर सरकारी नोकरी सोडावी.

एक बाजू पाहिली की सरकारी नोकरी करणारे सरकारचे गुलामच. कारण ती नोकरी सरकारनं दिलेली होती आणि गुलामाला बोलण्याचा अधिकारच नसतो. हं, गुलामीचा फरक म्हणजे ते सरकारी नोकर होते. त्यामुळं ते सरकारविरुद्ध बोलत होते.

यात दुसरी बाजू ही होती की सरकारविरुद्ध बोलण्याचा त्यांना अधिकार होता. कारण ते सुशिक्षीत होते. अन्याय सहन करणं त्यांच्या रक्तात नव्हतं. म्हणून ते बोलत असत. तेही बरोबरच होतं. यावर सरकार म्हणत होतं की अशांनी नोकरीच करु नये. सरकारला जे काही बदल करायचे

आहेत. ते करणारच. ध्येय धोरणं राबवणं हा सरकारचा अधिकार आहे. सरकारला शासन चालवावं लागतं. म्हणून ते, त्यांना जे स्फुरतं ते करणारच. ती गोष्ट देशहितासाठी असते. देशहिताला मारक नाही. देशहिताला तारक असते. देशाचा त्यातून विकास करता येतो. म्हणून याला कर्मचा-यांचा विरोध नसावा. यालाच विचारात घेत सरकारनं खाजगीकरण आणायचं ठरवलं असून त्यांनी खाजगीकरण आणलं आहे. परंतू सरकारला माहीत नव्हतं की खाजगीकरण ही देशविकासाला व देशहिताला मारक गोष्ट होती.

खाजगीकरण........ही गोष्ट सरकारनं एका विशिष्ट घटकाची ताकद कमी करण्यासाठी अस्तित्वात आणलेली गोष्ट होती. विशेष कारणासाठीही जाणूनबुजून आणलेली गोष्ट होती. मात्र त्यांनी आपलं स्वतःचं खाजगीकरण केलेलं नव्हतं.

याबाबतीत एक जुनी गोष्ट होती. पुर्वी शुद्र समजल्या जाणारा वर्णही स्वतंत्र होता. त्या वर्णातील लोकं उच्च वर्णीयांचंही ऐकायचे नाहीत. तेव्हा काही उच्च वर्णातील लोकांनी मनूकडे तक्रार केली. तक्रारीत मनूला या उच्च वर्णीयांनी म्हटलं की हा वर्ण आपलं काही ऐकत नाही. तेव्हा त्यांनी काहीतरी करावं. जेणेकरुन या शुद्र वर्णीयांना आपल्याला दाबता येईल. ती उच्चवर्णीयांची कुरघोडी. मनूनं ती ऐकली व नियम बनवले. त्या नियमानुसार शुद्र वर्णीयांना दाबता आलं.

हे खाजगीकरण.......ह्या खाजगीकरणाबाबत असं समजत होतं की तो नियम म्हणजे त्याच मनूनं तयार केलेलं संविधान होतं. जे संविधान देशातील स्त्रिया वा संपूर्ण नोकरीवर असलेल्या लोकांना घातक होतं. तसंच येणा-या संपूर्ण नोकरीवर लागणा-या लोकांना घातक होतं. सरकारनं तयार केलेल्या अध्यादेश क्र. काआआ-२०१३/प्र क्र२३३/कामगार-८ दि.१४मार्च २०२३ नुसार हेच सिद्ध होत होते की सरकारनं खाजगीकरणाचं हत्यार आणलेलं आहे.

निरंजननं खाजगीकरणाबाबत एक व्हाट्सअपवर मेसेज वाचला होता. मेसेजमध्ये खंत होती. खंत ही होती की देशात बेरोजगार आहेत. याच बेरोजगारीचा फायदा घेवून जर दहा हजार रुपये वेतन असेल तर कंत्राटदार म्हणेल की पाचहजार वेतन देतो. यायचं असेल तर ये नोकरीवर. नाहीतर तूझी इच्छा. त्यावर बेरोजगार व्यक्ती बेरोजगारी असल्यामुळे पाच हजार रुपयावर नोकरी करायला तयार होईल. त्यातच कंत्राटदार त्या कर्मचा-याची दहा हजार रुपयावर सही करुन आपण दहा हजार रुपये कर्मचा-याला देतो हे घोषीत करेल. त्यातच त्या कंत्राटदाराला विरोध केल्यास तो नोकरीवरुन काढून टाकेल वा काढून टाकण्याची धमकी देईल. ही कर्मचा-यांना धमकी होती. यात कंत्राटदार अतिशय गर्भ श्रीमंत बनत जाईल ही देखील एक शंकाच होती. आज हीच वस्तुस्थिती वास्तविक स्वरुपात खाजगी

अनुदानीत शाळेत दिसून येत होती. याही शाळेत मिळत असलेले संपूर्ण वेतन शिक्षकांना मिळत होतं. परंतू ते वेतन उचलल्यावर त्यातील काही ठराविक रक्कम देण म्हणून खाजगी मालक असलेल्या संस्थाचालकांना द्यावी लागत होतं. हे खाजगीकरणच होतं.

आजघडीला मालीक मौजा असलेल्या अनुदानीत शाळेत शिक्षक आणि संस्थापक यांची अशी स्थिती होती सरकार अनुदान देवून सुद्धा. तीच अवस्था भविष्यात कंत्राटदार व कामगार यात असेल. ही सत्यता नाकारता येत नव्हती.

खरं तर सरकारनं खाजगीकरण करायला नको होतं आणि खाजगीकरण करण्यात आलेल्या सर्व क्षेत्राला सरकारी क्षेत्रात रुपांतरीत करायला हवं होतं. कारण वेतन सरकारच देत असतांना देखरेख म्हणून हा कंत्राटदार नावाचा मध्यस्थ वा त्रयस्थ व्यक्ती कशाला हवा? असं निरंजनला वाटत होतं. परंतू सरकार करीत होतं खाजगीकरण. यावरुनही सिद्ध होत होतं की या प्रकारानुसार सरकारमध्ये असलेले आमदार, खासदार कमाईचं माध्यम पाहात होते. कंत्राटदारी पद्धतीनं नोक-या दिल्यास कमाई चांगली करता येईल. कारण त्यात टक्केवारी असेल व तो पैसा विदेशी बँकेत ठेवून लपवताही येवू शकतो. त्याचं मोजमाप करता येणे शक्य नाही. कारण तो सरकारी पैसा नाही. खाजगी स्वरुपाचा पैसा आहे. सध्या सरकारी

मालमत्तेतून वा सरकारीकरणातून पैसे कमवता येत नाही. तसं जर आज केलं गेलं तर उद्या सरकार गेल्यावर इडीची चौकशी लागेल. हे सरकारलाही माहीत होतं. हा पैसा लपवता येवू शकणार नाही. कारण हा सरकारी असल्यानं ह्याचं मोजमाप करता येवू शकेल. हेही सरकारला माहीत होतं. म्हणूनच ते खासगीकरणाच्या पाठीमागं लागले होते.

सध्या इडीची चौकशी सुरु होती. इडी सरकारनंच आणली होती. त्यामुळंच सरकारला भीती होती की आज आपण इडीचे छापे मारुन लोकांनी केलेला भ्रष्टाचार बाहेर काढत आहोत. उद्या आपली सरकार गेल्यावर विपक्ष देखील असेच इडीचे छापे मारेल व आपल्यावर चौकशी लावेल. तेव्हा आपण सापडू नये म्हणून सरकारनं उपयोजीलेला उपक्रम म्हणजे आजचं खाजगीकरण. हे सरकारला माहीत होतं. हे खाजगीकरण नेत्यांसाठी असायला हवं होतं. सामान्यांसाठी नको होतं. परंतू त्यात सामान्य माणसांनाच वेठीस धरलं गेलं व कंत्राटदार पद्धतीनं त्याला वागविण्यासाठी खाजगीकरणाची योजना आखण्यात आली होती.

खरं तर वेळ निघून गेलेली नव्हती. कायदा फक्त संसदेत पारीत झाला होता. राष्ट्रपतीची स्वाक्षरी व्हायचीच होती. त्यामुळं सरकारनं खाजगीकरण करु नये. अध्यादेश बदलवावा. कारण खाजगीकरणाची कु-हाड

देशविकासाला मारक आहे. तसंच लोकांच्या हितालाही मारक आहे. असं जनतेचं म्हणणं होतं.

काही दिवस गेले होते. काही दिवसानंतर खासगीकरणाच्या मसुद्यावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी झाली व तो अध्यादेश संपूर्ण देशात लागू झाला. सरकारनं पुर्ण स्वरुपात खाजगीकरण कर्मचा-यांसाठी आणलं होतं. परंतू त्यातून आपली सुरक्षा केली होती. त्यांनी त्यात जनतेचं मत विचारात घेतलं नव्हतं. आपल्याच मनानं कारभार केला होता.

हे पुर्ण स्वरुपात झालेलं खाजगीकरण होतं. देशातील कानाकोपऱ्यात हे खाजगीकरण लागू झालं होतं. आता लोकं नोकरीवर लागत होते. मात्र त्यांना दबून काम करावे लागत होते.

खाजगीकरण......खाजगीकरणापुर्वी नोकरी सामान्यांसाठी नव्हतीच. नोकरीत लागतांनाही वशिला लागत नव्हता. बरेच जण ओळखीनं लागत नव्हते नोकरीला वा नोकरीला लागतांना योग्यता लागत होती. स्पर्धा परिक्षा संपली होती.

पैशाला फार महत्व आलं होतं. पैसा हाच नातेवाईक ठरला होता. जो जास्त पैसा देईल, त्यालाच नोकरी मिळत होती. त्यातच सरकारी खात्यातून पैसा मिळूनही कर्मचा-याला मात्र तेवढा पगार मिळत नव्हता. सरकार पुरेपूर

पैसा वेतनाच्या स्वरुपात देत होते. कर्मचारीही वेतनाच्या स्वरुपात पुर्ण पैसा उचलत होते. कारण वेतन बँकेतून होत होतं. मात्र ते वेतन उचलल्यावर त्यातील बरीचशी रक्कम कंत्राटदार आपल्या ताब्यात घेत असे. ती रक्कम कंत्राटदाराला न दिल्यास तो कंत्राटदार त्या कर्मचा-यांवर कोणत्याही स्वरुपाचे गंभीर आरोप लावत असे व त्या कर्मचा-यांना नोकरीवरुन काढत असे.

कर्मचा-यांना कंत्राटदारानं नोकरीवरुन काढताच दाद मागण्याचा अधिकार होता. तो न्यायालयातून दाद मागत असे. परंतू यातही एक समस्या होती. कंत्राटदार हुशार होता. तो अशी परिस्थिती निर्माण करायचा की कर्मचारी वर्गाला न्यायालयातून न्यायही मिळणार नाही. यातूनच कर्मचारी वर्गाला न्यायालयातून न्याय मिळत नसे.

सरकारनं केलेलं हे खाजगीकरण त्या लोकांसाठी फायदेशीर होतं, ज्या लोकांकडे अतोनात पैसा होता. ती मंडळी कंत्राटदाराला पुरेसे पैसे देवून नोकरीला लागत होते. तसेच ते कंत्राटदाराला आपली नोकरी टिकविण्यासाठी पै पै पैसा देत होते.

नोकरी मिळविण्यावर मर्यादा नव्हती. आज नोकरीवर कुटूंबातील बरेच जण लागत होते. प्रसंगी एका एका घरचा पुर्ण परिवार नोकरीवर राहायचा.

नोकरीबाबत सांगायचं झाल्यास एका एका परिवारातील बरेच जण नोकरीवर असायचे. नात्यांना जास्त महत्व आले होते. नोकरीवर लावतांना जे कंत्राटदाराचे नातेवाईक असायचे, ते लवकर नोकरीवर लागायचे व जे नातेवाईक नसत. त्यांचे उच्च शिक्षण शिकूनही हालहाल होते. दर्जा शिक्षणाला नव्हता तर दर्जा ओळख आणि पैशाला प्राप्त झाला होता.

समाजात काही उच्च शिकलेले व होतकरु लोकं होते. परंतू त्याच्या शिक्षणाला महत्व नव्हतं. त्यांना कोणी मोजत नव्हतं. त्यामुळं देशात सुशिक्षीत बेरोजगारीची फळी निर्माण झाली होती. शिकलेले भरपूर लोकं सारे गावभर फिरत होते. त्यामुळं शिक्षणाचं महत्व आपोआपच कमी झालं होतं.

कंत्राटी कामगार सहजच उपलब्ध होत होते. गुणवत्तेला वाव नव्हताच. कधी कधी बेरोजगार लोकांचं आंदोलन होई. परंतू त्या आंदोलनाला दडपून टाकलं जाई. कारण मालीकमौजा काम होतं.

सरकारनं खाजगीकरण केलं. त्यातच सरकार आता आत्मनिर्भरतेच्या गोष्टी सांगत होतं. ते पाहून काही काही उच्चशिक्षीत तरुणांनी कर्ज घेवून छोटे मोठे उद्योग उभारुनही पाहिले. परंतू ते यशस्वी ठरले नाहीत. कारण देशात उद्योगाचीही स्पर्धा होती. अगदी गल्ली गल्लीमध्ये एकसारखे अनेक उद्योग उभे ठाकले होते. त्यामुळंच ते चालत नव्हते. त्यातच तरुणांनी उद्योग धंद्यासाठी उचललेलं कर्ज. त्या कर्जाचे हप्ते उद्योग चालत नसल्यानं व भरता येत नसल्यानं त्यावर चक्रवाढव्याज लावल्यानं प्रसंगी तो उद्योग विकावा लागत असे तरुणांना. तशीच संपूर्ण मालमत्ता जात असे त्या कर्जात. म्हणून तो कर्जाचा फटका पाहून कोणताही तरुण उद्योग टाकायला वा तो उभारायला धजत नव्हता.

श्रीमंत आणखी श्रीमंत होत चालले होते. गरीब आणखी गरीब होत चालले होते. निरक्षराची संख्या वाढत चालली होती.

मोबाईलचा काळ होता. ऑनलाईन खरेदी विक्री सुरु होती. त्यामुळं तर आणखीनच उद्योग ढेपाळला होता. एकंदरीत सांगायचं झाल्यास संपूर्ण देशात भुकमरीची परिस्थिती निर्माण झाली होती. तसंच हाताला काम नसल्यामुळेच देशात चो-या, डकैती, लूटमारीची स्थिती निर्माण झाली होती.

निरंजनचे नोकरीबाबतचे नियम व पेन्शनबाबतचे काही नियम होते. आज ते नियम सरकारनंच खाजगीकरण आणून धाब्यावर बसवले होते. त्यातच त्याला सरकारनंच नोकरीवर न घेतल्यानं त्याच्या मनाचा तीळपापड झाला होता. कारण आज एकाच कुटूंबातील नोकरीवर लागणा-यांची संख्या जास्त होती, त्यामुळंच त्याला त्या सरकारच्या खाजगीकरणाविरुद्ध लढणं आवश्यक होतं.

निरंजनला वाटत असलेली गोष्ट........त्यातच सरकारनं खाजगीकरणातून साकार केलेली बाब. तसं पाहता एकाच कुटूंबातील अनेकांना लागत असलेल्या नोक-या, त्यामुळंच त्याची वाताहत होत होती. त्यामुळंच त्यानं ठरवलं की आपण आता लढावं. न्यायालयात जावं. त्यानं पीटीशन तयार केली. ती वकिलामार्फत न्यायालयात दाखल केली व न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली की सरकारी पैसा या कंत्राटदारपणात कशा स्वरुपानं उध्वस्त होतो. सरकार अशा खाजगीकरणानं काहीही साकार करीत नसून खाजगीकरणानं सरकारातील मंत्रीगण कसे मालामाल होत आहेत, तेही तो दाखवू लागला होता न्यायालयात. त्यातच एका घरी एक नोकरी कशी फायदेशीर आहे? नोकरीचे नियम कोणते असावेत? तसेच पेन्शनसाठी कोणते निकष असावेत? तेही निरंजननं न्यायालयाला समजून सांगीतलं होतं.

निरंजननं सांगीतलेल्या गोष्टी न्यायालयाला पटत होत्या. त्यानं सांगीतलेलं खाजगीकरणाचं महत्व तसंच खाजगीकरणाचा नुकसानदायकपणा आज न्यायालयाला पटला होता. त्यातच त्यानं मांडलेले नोकरीचे व पेन्शनचे निकषही न्यायालयाला पटण्यासारखे होते. एका घरी एक नोकरी कोणाला द्यावी व ती कशी द्यावी. तिही गोष्ट पटली होती न्यायालयाला. त्यातच मायबापाची सेवा करावी. पण मायबापांनं त्यासाठी कोणता आदर्शपणा ठेवावा. ह्या गोष्टीदेखील उदाहरण देवून त्यानं न्यायालयाला सांगीतल्या होत्या.

*******************************

अलिकडे आपण पाहतो की मुलं मायबापाची सेवा करीत नाहीत. त्या मायबापांना त्यांची मुलं चक्कं वृद्धाश्रमात पाठवतात. शिवाय आजच्या काळात त्यांचं बोलणंही ऐकून घेत नाहीत. कोणी याला कुसंस्कार असं नाव दिलेलं आहे. लोकांचं म्हणणं असं की जे मायबाप मुलांवर संस्कार करीत नाहीत, कुसंस्कार करतात. त्यांची मुलं अशी वात्रट निघतात. जी मायबापाची सेवा करीत नाहीत. मायबापाला वृद्धाश्रमात पाठवतात.

वरील स्वरुपाचं मुलांचं वागणं पाहिलं की आपल्याला त्यात मुलांचा वात्रटपणा दिसतो ती परिस्थिती पाहून दयाही येते आणि विचारही येतो की मुलं अशी का वागत असावीत. परंतू त्यावेळी मुलांचं चूकत असेल का? त्याचं उत्तर नाही असच आहे.

महत्वाचं म्हणजे मायबाप मुलांवर कुसंस्कार करीत नाहीत. त्यांना कधीच आपली मुलं कुसंस्कारी बनावी असं वाटत नाही. तरीही मुलं कुसंस्कारी बनतात. असं चित्र पाहायला मिळत असतं आज. याबाबत एक उदाहरण देतो. एका प्रसिद्ध वर्तमानपत्रात एक बातमी प्रसिद्ध झाली. ती बातमी म्हणजे एका मुलीनं तिच्या आईच्या चेह-यावर सोल्युशन टाकलं. त्यात आई गंभीर जखमी झाली. मुलगी लोकांना चकमा देवून पळाली. पोलीस स्टेशनला तक्रार झाली. पोलीस शोधात होते. आज पेपरला बातमी येते की मुलानं बापाची हत्या केली. कधी येतं पेपरला की आईची हत्या झाली. ह्या गोष्टी मायबापानं केलेल्या कुसंस्काराच्या आहेत की संस्काराच्या? ह्यावर प्रश्नचिन्हं उभं ठाकतं. जी आई आपल्याला जन्म देते. त्या आईवर सोल्युशन टाकणं हा अपराधच. परंतू का टाकलं? या प्रश्नांची शहानिशा केल्यास असं दिसून येतं या प्रकरणावरुन की आईचं चुकलं.

हेच प्रकरण नाही तर अशी बरीच प्रकरणं आहेत, त्या प्रकरणावरुन दिसतं की मुलगी लहान असते, तेव्हा आई किंवा बापाचं भांडण होते. मग

आई किंवा बाप दुसरी चूल मांडते. कधी यापैकी एकजण पळून जातो. त्यात मुलांचा दोष नसतो. शिक्षण आणि यात ब-याच गोष्टीचं नुकसान होतं. त्यातील ते मूल कधी बापाकडे तर कधी आईकडे राहात असते. ती मुलगी जेव्हा तरुण होते. तिला सारं काही समजू लागतं, त्यावेळी ती आपल्या आई आणि वडीलानं एकत्र राहावं. म्हणून दोघांनाही समजवू लागते. परंतू त्यावेळी ना आई समजत समजत, ना बाप समजत. हे जेव्हा घडते, मग तेच मूल आईच्या अंगावर सोल्युशन टाकते. यात मुलीचा अपराध नसतो. कधीकधी मालमत्तेसाठी होत असलेली आबाळ पाहून मुलगा बापाची हत्या करतो. यातही संस्कार चुकतो. खरं तर मायबाप जर आदर्श वागत असतील तर त्यांची मुलं ही देखील आदर्श वागू शकतात. ही सत्य बाब आहे. परंतू जिथं मायबाप सत्य वागत नसतील तर मुलं देखील त्यांचच अनुकरण करीत वागत असतात.

काही मुलांना आपले मायबाप सोबत राहात असलेले पाहायचे असतात. परंतू त्याच्या मनाला फाटा देवून व त्यांची इच्छा विचारात न घेता मायबाप वेगवेगळे राहात असतात. त्यात मुलांचा दोष कोणताच नसतो. परंतू मुलांना नाईलाजास्तव विनाकारण ते लहान असल्यानं मायबापाच्या विलगीकरणाचा त्रास झेलावा लागतो. शोषावा लागतो. याचाच परिणाम होतो मुलांवर व मुलेही बदल्याच्या भावनेने वागत असतात त्यांचेशी. ती

जेव्हा मोठी होतात व त्यांना जेव्हा समजदारी येते, तेव्हा तीच मुले आपल्या मायबापाच्या एकत्रीकरणासाठी प्रयत्न करीत असतात व एकत्रीकरण न झाल्यास तीच मुले मग कोणी सोल्युशन टाकतं. कुणी हत्या करतं. कुणी ॲसीड फेकतं.

जर मायबापांना विलगीकरणाने राहायचे असेल भविष्यकाळात तर त्यांनी मुलं का पैदा करावीत? करुच नये मुलं पैदा. जेणेकरुन त्यांच्या मनावर असा सोल्युशन फेकण्यासारखा परिणाम होणार नाही. हं, संसार फुलत असतांना होतेच भणभण. कधी किरकोळच भांडणही. त्याचा हा अर्थ नाही की त्या मायबापांनी एकमेकांपासून विभक्त राहावं. सोबत राहू नये. ज्याचा परिणाम मुलांवर होईल. तसं जर करायचं असेल तर मुलं पैदा न केलेली बरी.

मायबाप.......मायबापांनी आदर्श राहायला हवं. त्यांनी व्याभीचारी पद्धतीनं वागू नये. परंतू आजचे मायबाप मुलांवर कुसंस्कार वा संस्कार होत आहेत की नाही होत आहेत याचा विचारच करीत नाहीत. ते अगदी मुलं लहान असतांना व्याभीचारी पद्धतीनं वागत असतात. तो व्याभीचारपणा मुलं पाहात असतात. त्यांच्यावर परिणाम होत असतो वात्रटपणाचा.

खरं तर मायबापानं आदर्श असावं. व्याभीचारी नसावं. संस्कारी असावं. कुसंस्कारी नसावं. सुकृत्य करावे. दुष्कर्म करु नये. चांगलं वागावं. अयोग्य वागू नये. ते जर चांगले वागतील. आपल्या आचरणातून चांगूलपणा दाखवतील. तेव्हाच त्यांची भावी पिढी आदर्श, संस्कारी, सुयोग्य, सुविचारी बनेल यात शंका नाही. जेणेकरुन त्यातून मायबाप आदर्श तर त्यांची मुलंही आदर्श हे तत्व वाढीस लागेल.

निरंजननं न्यायालयात टाकलेली केस. तो लढत होता ती केस. तसं पाहता खाजगीकरण बंद करा अशी ती केस होती. त्याचं फार महत्व होतं जनतेला. म्हणूनच लढत होता तो.

सरकार बदलली होती. नवी सरकार आली होती. त्यातच निरंजननं खाजगीकरणाबाबत खटला दाखल केला होता. दरमहिण्यातच केस लागत होती. तारीख पर तारीख चालत होती. तसं तारीख पर तारीख पाहून निरंजनला कंटाळवाणं वाटत होतं.

सा-याच नोक-या खाजगी झाल्या होत्या. त्यांना पेन्शन नव्हतीच. तसं पाहता कंत्राटदार लुटत होता त्यांना. परंतू आज उपाय नव्हता.

कोणीच ओरडत नव्हतं कंत्राटदारीवर. सारेच कसे खुश असल्यागत. बेरोजगार तर आम्हाला कमी वेतन दिलं तरी चालेल, नोकरीवर घ्या म्हणत होते. ते अतिशय कमी वेतनात काम करीत होते.

विषय भरपूर होते. निरंजन तरी कोणकोणत्या विषयावर भांडणार. सारेच प्रश्न होते आणि सा-याच समस्या होत्या. समस्या सुटत नव्हत्या.

निरंजन कंटाळला होता. तसाच तो आशेचा एक किरण त्याच्या जीवनात आला. एका प्रकरणावर सुनावणी झाली. मायबापानं आदर्श राहावं.

मायबापाची सेवा प्रत्येक मुलानं का करावी यावर निर्णय देतांना न्यायालय म्हणालं की प्रत्येक मायबापानं आदर्श राहावं. त्यांनी मुलं जन्मल्यानंतर फारकत घेवू नये. जो कोणी फारकत घेऊन राहील. त्यानं आपला वारस आपली सेवा करीत नाही अशी कुरकूर करु नये. तसंच प्रत्येक मायबापानं मुलांकडून अपेक्षा करणं साहजीक आहे. परंतू त्या मायबापानंही तसंच वागावं, जे मुलांना अभिप्रेत असेल. मायबापांना सर्व मुलं समान असावीत. त्यांनी हा मुलगा ही मुलगी असा भेदभाव करु नये. जर मायबाप आदर्श वागत नसतील तर त्या मायबापाची सेवा मुलानं केली नाही तरी त्याला दोषी धरु नये वा दोषी धरुन त्याला नोकरीवरुन काढू नये

वा त्याची पेन्शन बंद करु नये. मात्र त्या मुलांना त्याचे मायबाप दोषी असल्याचं सिद्ध करावं लागेल.

निकाल लागला होता. निकालानुसार निरंजनच्या मनात आस निर्माण झाली होती नोकरीची. त्याची नोकरी अशाच कारणानं गेली होती. जी त्याच्या मायबापाची सेवा तो करीत नव्हता.

निकाल लागताच निरंजन त्या निकालाचा आधार घेवून न्यायालयात गेला. तो आता आपल्या नोकरीची केस लढू लागला. तो सांगू लागला आपल्या मायबापाचं तरुणपणाचं कर्तृत्व. त्यातच न्यायालय त्याला पुरावे मागत होते.

पुरावे.......पुरावे कुठून आणायचे. तो पुराव्यासाठी विचार करु लागला. कुठून आणावे पुरावे. तसं त्याला आठवलं. माझी आजी वृद्धाश्रमात होती. तिची नोंद असेलच वृद्धाश्रमातील. तो वृद्धाश्रमात गेला. ज्या वृद्धाश्रमात त्याची आजी होती. तिथं त्यानं शोध घेतला. शोधांती त्याला ती आजी राधा त्या वृद्धाश्रमात असलेली आढळली. शिवाय निरंजन तेवढ्यावरच थांबला नाही तर त्याला आठवलं की त्याची आजी न्यायालयात गेली होती त्याच्या बापाविरुद्ध. तसा त्यानं तिच्या केसचीही छानबीन केली व न्यायालयातून त्याला काही धागेदोरे मिळाले.

निरंजननं आपल्या मायबापाच्या विरुद्धचे धागेदोरे गोळा केले व तो न्यायालयात गेला. तेच धागेदोरे व काही पुरावे न्यायालयानं तपासले व पुराव्याअंती निकाल दिला की निरंजननं आपल्या मायबापाची सेवा केली नाही म्हणून आधीच्या निर्णयानुसार त्याला बरखास्त केलं गेलं. परंतू तो दोषी नाही. तो बेकसूर आहे. त्यामुळं कोर्टाला त्याची नोकरी गोठवण्याचा अधिकार नाही.

ही वस्तुस्थिती आहे की न्यायालयानं आज मायबाप तरुणपणात आपल्या कर्तृत्वानं मुलावर अत्याचार करतात. त्यांच्या भावनेची हत्या करतात. त्यांच्यातील संस्कारांना तिलांजली देतात. यावर कटाक्ष टाकलेला असून सर्व साक्षीपुरावे तपासलेले आहे. त्यानुसार निरंजनचे मायबाप दोषी आढळले आहेत. खरं तर त्यांनी आपल्या आईची म्हणजेच निरंजनच्या आजीची सेवा करायला हवी होती. परंतू तसं घडलं नाही. त्यात त्याचे मायबाप दोषी असून न्यायालय त्यांना दोषी करार देत आहे व निरंजनला दोषमुक्त करीत आहे. तसंच यापुढं असा प्रकार कोणीही करु नये. म्हणून न्यायालय त्याच्या मायबापांना एक वर्ष कैद व पाचशे रुपयाच्या दंडाची शिक्षा करीत आहे. हाच न्यायालयाचा अंतिम निर्णय आहे.

न्यायालयानं निकाल दिला. तसं पोलिसांनी त्या म्हाता-या आईवडीलांना ताब्यात घेतलं. त्यावर त्याच्या आईवडीलाच्या डोळ्यातून अश्रू निघाले. ते अश्रू निरंजनच्या लक्षात आले.

निरंजनला क्लीन चीट मिळाली होती. मात्र त्याला वाईट वाटत होतं की त्याच्या जन्मदात्या मातापित्याला एक वर्षाची शिक्षा झाली. तसा शिक्षेचा निर्णय ऐकताच तो म्हणाला,

"मा. न्यायाधीश महोदय, मी न्यायालयात आलो माझ्यावर लागलेला कलंक धुवून निघावा म्हणून. त्यात माझ्या मायबापाचा कोणता दोष? त्यांना शिक्षा कशाला? हवं तर आम्हाला शिक्षा द्या. कारण आम्ही आमच्या मायबापाच्या पोटातून जन्म घेतलाय. तीच चूक झाली आमची. कृपया आमच्या आईवडीलांना सोडून द्या. मला आपला निर्णय नको. मी माझी केस परत घेत आहे."

निरंजननं म्हटलेलं कोर्टासमोरचं बयाण. परंतू न्यायालय काही भावनेवर चालत नव्हतं. त्यांनी आपला निकाल अबाधीत ठेवला. तसं पाहता त्या निकालानंतर त्याच्या आईवडीलांना एक वर्षासाठी कैदेत ठेवलं गेलं. त्यातच त्याचे मायबाप एक वर्षापर्यंत तुरुंगात होते.

ती एक चपराक होती मायबापांना की जन्म द्यायचा. परंतू मुलांना संस्कारीत करायचे असेल तर. तसं पाहता त्या निकालानंतर प्रत्येक मायबाप निरंजनला शिव्याही हासडत होता की त्याला मायबापानं जन्म दिला. उन्हातून सावलीत नेलं.

त्याच्या मायबापाला कैद झाली होती. परंतू तेथून समाज सुधरला होता. समाजात क्रांती झाली होती. आता लोकं आपल्या स्वतःच्या मुलांवर संस्कार करीत होते. कोणीही आपल्या मुलाला दाईच्या भरवशावर टाकत नव्हते. काही महाभाग भांडण करीत होते. परंतू फारकत घेत नव्हते. कारण पुढचं भविष्य त्यांना माहीत होतं. ते भविष्य म्हणजे आपली मुलं आपली सेवा करणार नाही. मात्र काही काही महाभाग भविष्याची पर्वा वा चिंता करीत नव्हते. ते आजही संस्कारानं वागत नव्हते नव्हे तर कुसंस्कारी पद्धतीनंच वागत होते. ज्याचा परिणाम आजही त्यांच्या मुलांवर होत होता.

एक वर्ष झाला होता. त्याचे मायबाप सुटले होते न्यायालयातील कैदेतून. परंतू ज्या मुलामुळं त्यांना कैदेत जावं लागलं. त्या मुलांचा राग होता त्यांच्या मनात. अजूनही त्यांना स्वतःच्या कर्तृत्वावर पश्चाताप नव्हता.

खटला सुरुच होता निरंजनचा. आता तो नितीनियमानं न्यायालयीन निकालानुसार नोकरीवर रुजू झाला होता. आता खटला सुरु होता एका

घरात एक नोकरी. त्याला वाटत होतं की एका घरी अनेक नोक-या राहू नये. यामुळंच बेरोजगारीवर मात करता येत नाही. बेरोजगारी निर्माण होते व ती वाढतच जाते.

तो खटला. त्या खटल्यात तो वकीलाद्वारे आपली बाजू मांडत होता. तसं पाहता त्याचं बरोबर होतं. कारण एका घरी एक नोकरी नसल्यानं सा-या समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळंच निरंजनला विचार यायचे. ते विचार होते. आज देशात जास्त उद्योग नाहीत. काही उद्योग आहेत. जे उद्योग आहेत, ते सर्व खाजगी स्वरुपाचे आहेत. ज्या ठिकाणी शोषण होतं. वेतन म्हणून मिळणारा पगारही अत्यल्प असतं व वरुन कामाच्या तासाला काही मर्यादा नसतात. अर्थात बारा ते चोवीस तास काम करावं लागतं. सरकार जे कराच्या स्वरुपात पैसे घेत असते. त्यातून सरकार रस्ते बांधते. रेल्वेलाईन टाकते. परंतू उद्योग निर्मीतीवर जास्त पैसा खर्च करीत नाही. शेतीवर पर्यायी व्यवस्था आणत नाही. शिक्षणाला वाव देते. परंतू उच्च शिक्षण निःशुल्क देत नाही. तरीही मुलं शिकतात. परंतू देशात सरकारी उद्योगधंदे नसल्यानं सारेच मुलं बेरोजगार म्हणून ओरडतात. कारण खाजगीमध्ये सुशिक्षीत बेरोजगारांना पाहिजे त्या प्रमाणात वाव मिळत नाही. तिथं शिकलेला व्यक्ती काम करायलाही तयार होत नाही.

संप सुरु होता. त्या काळात शेतकरीच नाही तर बेरोजगारही ओरडत होते. आम्हाला नोकरी द्या. पेन्शन नाही दिली तरी चालेल, अर्ध्याच वेतनात आम्ही काम करु.

देशात बेरोजगारी आहे. बेरोजगारीवर नियंत्रण सध्यातरी आणणे शक्य नाही. त्याचं कारणही तसंच आहे. देशातील लोकसंख्या अति वाढत असून त्याची वाढ भुमितीच्या पद्धतीने होत आहे. त्यामानानं भुमी वाढत नाही. तसंच उद्योगधंदेही वाढत नाहीत. खरं तर देशानं बेरोजगारीवर मात करण्यासाठीच उद्योगधंद्याची देशात निर्मीती करावी. ते उद्योग आपल्या नियंत्रणात ठेवावे.

सरकार उद्योग निर्माण करतं. परंतू ते उद्योग स्वतःच्या कक्षेत ठेवत नाही. उद्योग निर्माण करण्यासाठी कर्ज म्हणून अतोनात पैसा देतं. जो पैसा बुडतो. उद्योगपती उद्योगाच्या नावावर बुडवतात.

सरकार सर्वकाही देतं. परंतू स्वतः कोणतेही उद्योग उभारायला पुढे पाऊल टाकत नाही. शासकीय उद्योग निर्माण करण्यासाठी देशात टाळाटाळ करीत असते.

सरकार पेन्शनवर अकरा प्रतिशत खर्च करतो. रेल्वे गाड्या आणतो, त्यावर खर्च करतो. रस्ते बांधकाम करीत असते. त्यावर खर्च करतो. परंतू

जे अपेक्षीत आहे आणि जे करायला पाहिजे ते करीत नाही. एक उदाहरण देतो. सरकारनं महिलांना अर्धी तिकीट दिली. महिला वर्ग खुश व्हावा आणि आपल्याला मतदानात फायदा व्हावा. कारण सरकारलाही माहीत आहे की घरी पुरुष वर्ग महिलांचंच ऐकतो. म्हणून ही फुशारकी. यानं काय झालं. तर यानं नुकसान झालं देशाचं. एका व्हाट्सअपवर ग्रुपवरील मेसेजनुसार सिलेंडरमध्ये महिलांना सूट दिली असती तर बरे झाले असते असं लोकांचं म्हणणं. त्याही पुढे जावून लोकं म्हणतील की अशा तिकिटात सवलत देवून नुकसान करण्याऐवजी त्याच पैशानं देशाचा विकास करावा अर्थात मोठमोठे उद्योगधंदे उभारावेत व बेरोजगारीवर मात करुन बेरोजगारांना रोजगार द्यावेत.

सरकार असं काहीच केलं नाही. उलट सरकारनं खाजगीकरण आणलं. या खाजगीकरणानुसार सरकारनं सर्वांची वाट लावली. असे म्हटल्यास आतिशयोक्ती ठरणार नाही.

सरकार उद्योगधंदे उभारत नाही. उलट सरकार उद्योगधंदे देशातील श्रीमंत लोकांना उभारा म्हणत असतं. त्यांना सरकार कर्जही देतं. ते आपले उद्योगधंदे चालवतात. यात सरकारला काय मिळतं.

सरकारला निवडणूकीत फायदा होतो. निवडणूकीत अतोनात पैसा देतात हे देशातील उद्योगपती. ज्या पैशाचं मोजमाप नसतं आणि दुसरा फायदा म्हणजे कराच्या रुपानं पैसा मिळतो. प्रोफेशनल कर आणि इनकम टॅक्स. अलिकडील काळात हा इनकम टॅक्स ही लपवला जात आहे. ज्याला काळा पैसा मानल्या गेला आहे. आज देशात सरकारचे कमी आणि उद्योगपतींचे जास्त उद्योग आहेत. ज्यातून रोजगार मिळतो. परंतू वेतन तुटपुंजं मिळतं. तसंच त्या लोकांना जास्त वेळंही राबवलं जातं. त्यातच कोणाची कटकट नाही. संप नाही वा कोणतीच आंदोलनं नाहीत. हा सरकारचा फायदा. परंतू यातून बेरोजगारीवर मात करता येवू शकतं का? तर याचं उत्तर नाही असंच येईल. कारण या कारखान्यात, शिकलेल्या लोकांना हे उद्योगपती पाहिजे त्या प्रमाणात वाव देत नाहीत. ज्या बेरोजगार यादीत सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या सर्वात जास्त आहे. त्यातील अर्धे प्रतिशतही नोकरीवर लागत नाहीत.

महत्वाचं म्हणजे सरकारनं लोकांना रोजगार द्यावा. त्यासाठीच कारखान्याची निर्मीती करावी. तसेच निर्माण करण्यात आलेले कारखाने हे उद्योगपतींच्या मालकीचे न ठेवता सरकारनं आपल्या मालकीचे ठेवावेत. तसंच देशात जास्तीत जास्त उद्योगधंद्याची निर्मीती करावी. तेव्हाच देशातील सुशिक्षीत बेरोजगारांना न्याय देता येईल व देशातील निर्माण

झालेल्या सुशिक्षीत बेरोजगारांची समस्या दूर करता येईल. त्यासोबतच इतर बेरोजगारांचाही प्रश्न सोडवता येईल.

तो बेरोजगारीवरही लढत होता. तसा एक दिवस न्यायालयानं बेरोजगारीवर निकाल दिला. तो निकाल होता. एका घरी एकच नोकरी द्यावी. दुसरी नको. तसंच विवाह करायचा असेल तर कोणीतरी एकानं नोकरी सोडावी. तसंच एका घरी एकच पेन्शन असावी. अर्थात दोन मुलं जरी असली तरी एका कुटूंबात एकच नोकरी.

न्यायालयानं दिलेला निकाल. तो निकाल लागताच लोकं ओरडत होते. पुंजीपती लोकं जास्तच ओरडत होते. म्हणत होते की एका घरी एक नोकरीचं मिशन नको. प्रत्येकाला स्वतंत्र्यता आहे. त्यामुळं शिकण्याचा अधिकार आहे. तसाच नोकरी मिळविण्याचाही अधिकार आहे. त्यानुसार न्यायालयानं एका घरी एक नोकरी देण्याचा विचार केल्यानं लोकांच्या स्वातंत्र्यावर न्यायालयानं बंधन घातलेलं आहे.

तो निकाल. तो निकाल लोकांच्या विचारस्वातंत्र्यावर गदा आणणारा होता. त्यानंतर लोकांनी त्यावर जनहीत याचिका टाकल्या. परंतू ती न्यायालयीन बाब होती. त्यात सर्वच गोष्टीचा विचार करण्यात आला होता. काहींनी पुनर्विचार याचिका टाकल्या. परंतू त्या सर्व फोल ठरल्या.

न्यायालयानं सांगीतलं की यामुळं सुशिक्षीत बेरोजगारांची देशात हेळसांड होत असून प्रत्येक शिकलेल्या उमेदवारास नोकरी करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार न्यायालयाला मान्य आहे. याचा अर्थ असा नाही की एका घरी एकाच कुटूंबातील अनेक जण नोकरीला राहावेत आणि दुस-या एका कुटूंबातील कोणीही नोकरीला राहू नये. त्या घरातील सर्व लोकं शिकलेले असले तरी. आजचं वास्तविक चित्र पाहता एका कुटूंबातील अनेक जण नोकरीवर राहतात. तसंच दुसरीकडं कोणीही नोकरीला राहात नाही. हे चित्र न्यायालयाला दिसत आहे. यावर उपाय म्हणून न्यायालय विवाहसंस्थेतही काही नियम आणत आहे.

पहिला नियम असा की विवाह करतांना ज्यांना जोडीदार शिकलेला हवा असेल, त्यापैकी एकानं नोकरी करणार नाही असं लिहून द्यावं. आजपासून त्याच विवाहाला मान्यता देण्यात येईल.

निरंजन खाजगीकरणावर लढत होता. त्याला वाटत होतं की देशाचं खाजगीकरण होवू नये. देशात सरकारी नोकऱ्यांचं प्रावधान असावं. सरकारनं ज्या काही नोकऱ्यांचं खाजगीकरण केलं. त्या सर्व नोक-या सरकारी बनाव्या. सरकारी कक्षेत याव्या. शिवाय सरकारनं बेरोजगारीवर मात करण्यासाठी सरकारी उद्योगधंद्याची निर्मीती करावी. उद्योग क्षेत्र वाढावं. तसंच बेरोजगारीची समस्या कायमची मिटविण्यासाठी सरकारनं

वाटल्यास एका कुटूंबात एकाच व्यक्तीला नोकरी द्यावी. विवाह कायद्यातही बदल करावे. जो विवाह करेल, त्यामध्ये जोडीदार नोकरी करणार नाही असं लिहून घ्यावं. जो लिहून देईल. त्यालाच सरकारी नोकरी द्यावी. पेन्शनही तशीच एका कुटूंबातील एकालाच द्यावी.

न्यायालयात निरंजननं मांडलेले निरनिराळे विचार. ते विचार त्यानं वेगवेगळे दाखले देत मांडले होते. त्यातच त्याच्या विचारानं न्यायालय भारावलं व न्यायालयानं निकाल दिला. जो निकाल बेरोजगारीवर आधारीत होता. बेरोजगारी समाप्त करणारा निकाल होता.

निरंजन खाजगीकरणावर व बेरोजगारीवरही लढत होता. तसा एक दिवस न्यायालयानं खाजगीकरणावर निकाल दिला. म्हटलं की देशातील खाजगीकरण पुर्णतः समाप्त करण्यात येत आहे. मात्र काही अटी आहेत. पहिली अट म्हणजे सरकारी नोकरी कुटूंबातील एकाच व्यक्तीला देण्यात यावी. याचं कारण म्हणजे एकाच कुटूंबातील अनेक जण सरकारी नोकरीवर असतात. तर दुसरीकडे कोणीच नोकरीवर नसतात. दुसरी अट अशी की विवाह करतांना जोडीदारानं बेरोजगार व्यक्तीशी विवाह करावा. पुरुष किंवा स्रीपैकी कोणीही एकजण नोकरीला असावं. तसाच विवाह करायचा असेल तर कोणीतरी एकानं नोकरी सोडावी. तसंच एका घरी एकच पेन्शन असावी.

अर्थात दोन मुलं जरी असली तरी एका कुटूंबात एकच नोकरी व एकाच व्यक्तीला पेन्शन असावी.

न्यायालयानं दिलेला निकाल. तो निकाल लागताच लोकं ओरडत होते. पुंजीपती लोकं जास्तच ओरडत होते. म्हणत होते की एका घरी एका नोकरीचं मिशन नको. प्रत्येकाला स्वतंत्र्यता आहे. त्यामुळं शिकण्याचा अधिकार आहे. तसाच नोकरी मिळविण्याचाही अधिकार आहे. त्यानुसार न्यायालयानं एका घरी एक नोकरी देण्याचा विचार केल्यानं लोकांच्या स्वातंत्र्यावर न्यायालयानं बंधन घातलेलं आहे.

तो निकाल. तो निकाल लोकांच्या विचारस्वातंत्र्यावर गदा आणणारा होता. त्यानंतर लोकांनी त्यावर जनहित याचिका टाकल्या. परंतू ती न्यायालयीन बाब आहे. ती बाब देशहिताला मारक नसून तारक आहे. बेरोजगारीवर मात करणारी आहे. असा असा दृष्टीकोण अंगीकारुन न्यायालयानं त्या सर्व याचिका फेटाळून लावल्या.

तो निकाल. त्यात सर्वच गोष्टीचा विचार करण्यात आला होता. काहींनी पुनर्विचार याचिका टाकल्या. परंतू त्या सर्व फोल ठरल्या.

न्यायालयाच्या निर्देशानुसार यामुळं सुशिक्षीत बेरोजगारांची देशात हेळसांड होत असून प्रत्येक शिकलेल्या उमेदवारास नोकरी करण्याचा

अधिकार आहे. हा अधिकार न्यायालयाला मान्य आहे. याचा अर्थ असा नाही की एका घरी एकाच कुटूंबातील अनेक जण नोकरीला राहावेत आणि दुस-या एका कुटूंबातील कोणीही नोकरीला राहू नये. त्या घरातील सर्व लोकं शिकलेले असले तरी. आजचं वास्तविक चित्र पाहता एकाच कुटूंबातील अनेक जण नोकरीवर राहतात. तसंच दुसरीकडं कोणीही नोकरीला राहात नाही. हे चित्र न्यायालयाला दिसत आहे. यावर उपाय म्हणून न्यायालय विवाहसंस्थेतही काही नियम आणत आहे. विवाह करतांना ज्यांना जोडीदार शिकलेला हवा असेल, त्यापैकी एकानं नोकरी करणार नाही असं लिहून द्यावं. आजपासून त्याच विवाहाला मान्यता देण्यात येईल. या व अशा प्रकारच्या न्यायालयीन निकालानुसार सामान्य जनता सुखी झाली होती. गरीब होतकरु लोकं नोकरीवर लागत होते. बेरोजगार वर्गही खुश होता. मात्र तो वर्ग निराश होता. ज्यांच्या घरी पती पत्नी दोघंही नोकरीवर होते.

न्यायालयीन निकालानुसार सरकारनं खाजगी नोकरीचं सरकारी नोकरीत रुपांतर त्या लोकांसाठी केलं होतं. जे वंचीत घटक होते. ज्यांनी आतापर्यंतच्या आपल्या आयुष्यात कधीच नोक-या पाहिल्या नव्हत्या. परंतू एक शोकांतिका होती की आजही काही काही क्षेत्रात खाजगीकरणच होतं. स्पर्धा होत्याच व महागाई आजही होती. त्याच महागाईवर मात

करण्यासाठी काही लोकांमध्ये पती पत्नी दोघंही जण आजही नोकरी करीत असायचे. एक सरकारी नोकरी तर दुसरा खाजगी नोकरी. तसं पाहता आता खाजगी नोकरीतच जास्त वेतन होतं आणि भत्तेही. बेरोजगारांनी शिक्षण केवळ सरकारी नोकरी मिळविण्यासाठी घेवू नये तर खाजगी नोकरी मिळविण्यासाठी घ्यावं यासाठी.

निरंजनचे सर्व न्यायालयीन खटले संपले होते. त्याचे आईवडीलही खुश होते लेकराच्या कर्तृत्वावर. त्यांना आज अभिमान वाटत होता. कारण त्यांनी एक कर्तृत्ववान मुलगा जन्मास घातला होता.

निरंजनचे आईवडील मरण पावले होते. तसा तो म्हातारा झाला होता. आज त्याला पेन्शन नव्हती. तो कोर्टात लढला होता पेन्शनच्या विरोधात. त्यानं विरोध केला होता पेन्शनचा. त्यानुसार न्यायालयानं निकाल दिला होता की एका कुटूंबात एकच पेन्शन. त्यानुसार ते दोन भाऊ असल्यानं रंजनला पेन्शन होती. निरंजनला पेन्शन नव्हती. परंतू तो खूश होता. कारण त्याची मुलं चांगली निघाली होती. सुसंस्कारी होती. तशीच ती मुलं निरंजनला पोषत होती. हे त्यानं केलेल्या चांगल्या कर्तृत्वाचा परिणाम होता. तशीच त्याचेवर त्याची आजी राधाची छाया होती.

रंजनला पेन्शन मिळत होती. परंतू तो खुश नव्हता. त्याची मुलं ही संस्कारी निघाली नव्हती. कारण त्यानं जीवनभर स्वार्थच पाहिला होता. तो स्वार्थीच जीवन जगला होता बापासारखा. त्यामुळंच त्याची मुलं संस्कारी नसणं हे त्याच्या स्वार्थी जीवन जगण्याचाच परिपाक होता.

***********समाप्त***********



# *अंकुश रा. शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

## *प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***


१)आक्रमण


***प्रवासवर्णन***

१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*


**अंकुश शिंगाडे**
**यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके**
**ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.**





















अंकुश शिंगाडे

यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.




















http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bappa_rawa
df





























अंकुश शिंगाडे
भुताटकी



राजा दाहिर
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
घटस्फोट



अंकुश शिंगाडे
महाराणी संयोगीता आणि पृथ्वीराज


अंकुश शिंगाडे
मार्ग अर्जूनचा


अंकुश शिंगाडे
लेखक


अंकुश शिंगाडे
लिखीत
गोविंद गोपाळ गायकवाड
कादंबरी


अस्तित्व
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
कामगार

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
## श्री अंकुश शिंगाडे यांचे ईसाहित्यवर हे बत्तीसावे पुस्तक.
## या कादंबरीसाठी त्यांचे अभिनंदन

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ

मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (९), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (६), जयश्री

पटवर्धन(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।